रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८९| अंक २५७ | पृष्ठे ८ | RGD/016/2026-28 www.krushival.in

# कृषीवल

रायगड, मंगळवार, दि. २४ फेब्रुवारी २०२६

किंमत ४ ₹

## रोह्यात दुचाकीस्वाराकडून चाकू हल्ला

**रोहा :** तालुक्यातील चणेरा भागातील खारखर्डी पारंगखार गावात एक खळबळजनक घटना घडली. एका भरधावर दुचाकीस्वाराने एका दाम्पत्त्यावर धारदार चाकूने सपासप वार करून त्यांना गंभीर जखमी केले. या हल्ल्यात आणखी एक जण जखमी झाला आहे. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. दोन्ही हल्लेखोर फरार असून पोलीस त्यांचा शोध घेत आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, मुरुड तालुक्यातील सावरोली-वेताळवाडी येथील अविनाश मंगेश शेळके व गीतेश महादेव घाणेकर पान २ वर

रिसॉर्टमध्ये कामासाठी एका जोडप्याची किंवा मुलाची आवश्यकता आहे.
ठिकाण : सासवणे
संपर्क: +91 9607102357

# मे 2027 पर्यंत खड्ड्यातूनच प्रवास

**अलिबाग-रोहा मार्गावरील प्रवाशांचा वनवास कधी संपणार?**

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा महामंडळ मार्फत अलिबाग बायपास ते रोहा तालुक्यातील तळेखार (साळावमार्गे) या सुमारे ३० किलोमीटर रस्त्याचे रुंदीकरण व काँक्रीटीकरणाचे काम सुरू आहे. तब्बल १७१ कोटी रुपयांचा निधी मंजूर असतानाही प्रवाशांना मात्र धूळ, खड्डे आणि वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. उपलब्ध माहितीनुसार, या रस्त्याचे काम मे २०२७ पर्यंत पूर्ण होणार आहे. म्हणजेच अलिबाग, रोहा आणि मुरूडकरांना आणखी दीड वर्ष खड्ड्यातूनच प्रवास करावा लागणार, असे चित्र सध्या दिसत आहे.

रस्त्याच्या दुतर्फा झाडांची मोठ्या प्रमाणात तोड करण्यात आली असून ठिकठिकाणी खोदकाम सुरू आहे. सहाण बायपासपर्यंत रस्ता खोदून ठेवल्याने प्रवाशांची अक्षरशः धुळधाण उडत आहे. नाकातोंडात मातीचे कण जात असून दुचाकीस्वार, विद्यार्थी आणि रुग्णवाहिका यांना सर्वाधिक त्रास सहन करावा लागत आहे. या रस्त्याच्या दुतर्फा असलेली झाडांच्या कटाई करण्याबरोबरच ठिकठिकाणी खोदाई करण्यात आली आहे. त्यामुळे या मार्गावरून प्रवास करताना धूळखात जाण्याची वेळ प्रवाशांवर आली आहे. मात्र, हा त्रास कधी कमी होणार? असा प्रश्न प्रवाशी वर्गाकडून विचारला जात आहे. मे २०२७पर्यंत प्रवाशांना खड्ड्यातून प्रवास पान २ वर

### राजकारणात रस्ता, प्रत्यक्षात खड्डा

अलिबाग-रोहा मार्गावरून राजकीय श्रेयवाद रंगला होता. भाजप आणि शिंदे गटात कामाच्या श्रेयासाठी चुरस दिसली. नारळ फोडीचे कार्यक्रम झाले, आश्वासने दिली गेली. 'स्वखर्चाने रस्ता करणार', अशीही घोषणा करण्यात आली. मात्र, दोन कार्यकाळ उलटूनही रस्ता पूर्णत्वाला पोहोचलेला नाही.

### प्रवाशांची धुळधाण

या रस्त्याच दुतर्फा असलेल्या झाडांची मोठ्या प्रमाणात तोड करण्यात आली आहे. तसेच, हा रस्ता सर्वत्र खोदून ठेवल्यामुळे प्रवाशांची अक्षरक्षः धुळधाण उडत आहे. प्रवाशांच्या नाकातोंडात मातीचे कण जात असून विशेषतः दुचाकीस्वार आणि पादचाऱ्यांना याचा सर्वाधिक त्रास सहन करावा लागत आहे. रस्त्यावरील खडी आणि बारीक दगडांमुळे अपघाताची देखील शक्यता आहे.



## वेधक

### विनयभंग करणाऱ्या चालकाला सक्तमजुरी

**नवीन पनवेल :** मोठा खांदा सेक्टर १८ येथील सागर चव्हाण हे स्कूल व्हॅनवर चालक म्हणून काम करत होते. त्यावेळी एक दहा वर्षीय पीडित मुलगी चालकाच्या मागच्या सिटवर बसली होती. त्यानंतर चालकाने तिला पुढील सीटवर बसायला सांगितले आणि तिच्यासोबत गैर कृत्य केले. हा प्रकार तिच्या आई-वडिलांना समजल्यानंतर चालकाविरुद्ध खांदेश्वर पोलीस ठाण्यात २०२३ मध्ये गुन्हा दाखल करण्यात आला. या गुन्ह्याचे दोषारोपपत्र न्यायालयात सादर करण्यात आले आणि पनवेल येथील विशेष न्यायालयात या खटल्याची सुनावणी पूर्ण झाली. विशेष सरकारी वकील प्रतीक्षा वडे-वारंगे यांनी काम पाहिले. यावेळी सहा साक्षीदार तपासण्यात पान २ वर

### प्रोपिलीन गॅस टँकरचा अपघात

**खोपोली :** बोरघाट परिसरात सोमवारी (दि.२३) सकाळच्या सुमारास एक संभाव्य भीषण दुर्घटना थोडक्यात टळली. कोचीहून गुजरातकडे २१ टन क्षमतेचा प्रोपिलीन गॅस वाहून नेणाऱ्या टँकरचे ब्रेक निकामी झाल्याने चालकाने प्रसांगवधान राखत रस्त्याच्या कडेला असलेल्या भिंतीला जाणीवपूर्वक धडक दिली. त्यामुळे टँकर जागीच थांबला आणि मोठी दुर्घटना टळली. घटनेची माहिती मिळताच महामार्ग वाहतूक पोलीस बोरघाट, आयआरबीची पेट्रोलिंग, देवदूत यंत्रणेची फायर ब्रिगेड, डेल्टा फोर्स, महाराष्ट्र सुरक्षा बलचे जवान तसेच हेल्प फाऊंडेशनची टीम आणि पेट्रोलिंग वाहनांचा पान २ वर

### अल्पवयीन मुलींची सुटका

**पनवेल :** नवी मुंबई पोलीस आयुक्तालय अंतर्गत गुन्हे शाखेने सेक्टर ११ परिसरात सापळा रचत कारवाई करत दोन पीडित मुलींची सुटका करण्यात आली असून त्या अनुक्रमे १६ व १४ वर्षांच्या असल्याचे समजते. गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी बनावट ग्राहकाच्या माध्यमातून आरोपीला बोलावून छापा टाकला. या कारवाईत हरिष विकास छारी (२५) याला अटक करण्यात आली. तो अल्पवयीन मुलींना ग्राहकांना पुरवत असल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकरणी सीबीडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे.

### साळाव रस्त्याला कोंडीचे ग्रहण

**मुरुड :** रायगड जिल्ह्यातील अलिबाग-मुरूड या मार्गावर रस्ता रूंदीकरणाचे काम सुरू आहे. त्यामुळे या मार्गावर मोठ्या प्रमाणात वाहतुक कोंडी होत आहे. अवजड वाहने समोरासमोर आली की दीड तासाचा प्रवास चार चार तासांवर पोहोचत आहे. त्यातच ठिकठिकाणी खड्डे खोदल्याने अपघातांच्या प्रमाणात देखील वाढ झाली आहे. अशातच रुग्णवाहिकेलाही अलिबागमधील शासकीय रूग्णालयात पोहोचायला विलंब होत असल्याने रुग्णांचे प्रचंड हाल होत आहेत. त्यामुळे पर्यायी वाहतूक व्यवस्था करण्याची मागणी प्रवासी वर्गातून जोर धरत आहे. रेवस-रेड्डी महामार्गावरील अलिबाग-मुरूड या पान २ वर

# अलिबाग नगरपरिषदेची सर्वसाधारण सभा

- शहराच्या सर्वांगिण विकासासाठी महत्वपुर्ण निर्णय
- बांधकाम, आरोग्य अशा विविध विषयांवर चर्चा

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

अलिबाग नगरपरिषदेची सर्वसाधारण सभा सोमवारी (दि.२३) नगराध्यक्षा अक्षया नाईक यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या सभेमध्ये बांधकाम, आरोग्य, पाणीपुरवठा अशा विविध विषयांवर चर्चा करून महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. स्व. ॲड. नमिता प्रशांत नाईक क्रीडासंकुल लवकरच नागरिकांसाठी खुले होण्याबरोबरच अनेक कामे लवकरच मार्गी लागणार आहेत. नगरपरिषदेच्या या पहिल्या सर्वसाधारण सभेला उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला.

नगराध्यक्षा अक्षया नाईक यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या सभेत अनेक महत्त्वाच्या विषयांवर चर्चा झाली आणि बांधकाम, आरोग्य, पाणीपुरवठा संबंधित विविध विषयांवर चर्चा करून महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. सर्वात महत्त्वाचे म्हणजे श्रीबागमधील नमिता नाईक क्रीडासंकुलाचे बहुतांशी काम पूर्ण झाले असून अपूर्ण कामाचा आढावा घेऊन आवश्यक त्या गोष्टींची पूर्तता करून शक्य तेवढ्या लवकर क्रीडासंकुल नागरिकांसाठी खुला करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. त्याचे नियम आणि इतर वापराचे दृष्टीने आवश्यक गोष्टी ठरविण्यासाठी बांधकाम सभापती प्रशांत नाईक यांचे अध्यक्षतेखाली समिती बनविण्यात आली. पुढील १० दिवसांत ही समिती आपला अहवाल नगराध्यक्षांना सादर करणार आहे. शहरातील हातगाड्यांबाबत चर्चा करून विनापरवानगी हातगाड्यांवर कारवाई करून नागरिकांना होणारा त्रास कमी कसा होईल या दृष्टीने प्रशासनाने कार्यवाही करावी, अशा सूचना प्रशांत नाईक यांनी प्रशासनाला दिल्या आहेत. अधिकृत हातगाड्यांबाबत धोरण निश्चित करून त्यांच्या जागा आणि इतर बाबतीत निश्चित धोरण ठरविले जाणार आहे. नमो उद्यान योजनेअंतर्गत नगरपालिकेला १ कोटी एवढा निधी प्राप्त झाला असून त्याअंतर्गत हिराकोट तलाव सुशोभीकरण आणि नमो उद्याननिर्मितीचा महत्वपूर्ण निर्णय सर्वानुमते घेण्यात आला. त्यावेळी श्रीबाग येथील ॲड. काटकर यांच्या समोरील राखीव जागेत उद्यान निर्मितीचा विषय नगरसेवक प्रदीप नाईक यांनी मांडला. वीज व बांधकाम सभापती प्रशांत नाईक यांनी येथील रहिवाशांनी आवश्यक त्या गोष्टींची पूर्तता केल्यास पुढील कार्यवाही करता येईल, असे आश्वासन दिले.

शहरात येणाऱ्या वाहनांकडून वसूल केली जाणारी पर्यावरण फी मधील अडचणींबाबत सविस्तर चर्चा केल्यानंतर सदस्यांनी शहरात येणाऱ्या मालवाहतूक, व्यापारी वाहतुकीचे गाड्यांकडून वसूल केली जाणारी रक्कम कमी करावी, अशी सूचना मांडली. त्यामुळे वसुली अधिक प्रभावशाली होईल, असे मत मांडले. यावर प्रशासनाने सकारात्मक भूमिका घेण्याचे मान्य केले.

हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे नागरी लोककल्याण अभियानाअंतर्गत निधी प्राप्त झाला आहे. प्राप्त होणाऱ्या एक कोटी निधीतून शाळा क्रमांक.१, २ आणि ६ च्या पान २ वर

# सभागृह गहिवरलं

**राज्याचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू**

| मुंबई | प्रतिनिधी |

राज्याचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सोमवार दि.२३ फेब्रुवारीपासून सुरू झाले आहे. अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी दिवंगत नेते अजित पवार यांच्या निधनंतर विधानसभेत शोकप्रस्ताव मांडण्यात आला. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे व आमदार रोहित पवार यांच्यासह अनेक महत्त्वाच्या नेत्यांनी अजितदादांना श्रद्धांजली अर्पण करून त्यांच्या स्मृतींना उजाळाला दिला.

राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला सुरूवात करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत शोकप्रस्ताव मांडला.



त्यांनी अजित पवार जेव्हा विरोधी पक्ष नेते होते तेव्हा काय म्हणाले हे देखील सांगितले आहे. ते पुढे म्हणाले की, महाराष्ट्राला एक जो चांगला मुख्यमंत्री मिळाला असता तो अजित दादांच्या रुपाने. ते आता आपल्यामध्ये नाहीत आणि मला विश्वास आहे की शेवटी नियतीने त्यांचे स्वप्न पूर्ण केले असते. त्यांच्यामध्ये ती क्षमता नक्की होती. शेवटी राजकारणामध्ये वेगवेगळ्या प्रकारची गणीतं असतात. पण क्षमतेचा जर विचार केला मुख्यमंत्री पदाकरीता पूर्णपणे क्षमता असलेले नेतृत्त्व अजित दादांचे होते, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले.

यावेळी शरद पवार यांच्या राष्ट्रवादीचे नेते आमदार रोहित पवार यांनीदेखील भाषणात अजितदादांविषयीच्या आठवणी ताज्या केल्या. त्यांनी, अजित पवार हे सभागृहात पहिला येणारा आणि शेवटी जाणारा नेता असायचे. चुकले तर कान पकडायचे व चांगले बोललो की स्तुती करायचे. व्यक्तिगत, बेकायदेशीर विषय घेऊन आलेल्यांचा त्यांना राग यायचा, अशी आठवण रोहित पवार यांनी काढली. दादांवर नको नको ते आरोप झाले. दादा तेव्हा अस्वस्थ व्हायचे. पण एकही आरोप सिद्ध करता आला नाही. दादा आता नाहीत, त्यामुळे ते आरोप व ते डाग आता पुसले पाहिजेत. आरोपांचे गाठोडे समुद्रात टाकले गेले तर ती त्यांना आदरांजली ठरेल, अशी मागणीही पान २ वर

### तलावात बुडून बालकाचा मृत्यू

| नेरळ | प्रतिनिधी |

कर्जत तालुक्यातील अंभेरपाडा येथील तुंगी गावातील तलावात बुडून १३ वर्षीय बालकाचा मृत्यू झाल्याची घटना घडली. घरातून बाहेर पडलेला हा मुलगा घरी परत न आल्याने त्याची शोधा शोध सुरू झाली. त्यांनतर तब्बल दीड दिवसांनी हा बालक तलावात शोध घेत असताना सापडला. मिळालेल्या माहितीनुसार, तुंगी या उंचावर वसलेल्या दुर्गम भागातील गावात पूर्वीपासून ग्राम तलाव असून त्याची खोली कमी असल्याने उन्हाळ्यात आटते. येथे नळपाणी योजना राबविली जात असताना जलजीवन मिशन अंतर्गत या जुन्या ग्रामतलावाची खोली वाढविण्यात आली. त्याचवेळी पान २ वर

# मुरूडमधील पर्यटन विकास कधी?



- सनसेट पॉईंट वनखात्याच्या परवानगीत अडकला
- विद्यमान आमदारांचे दुर्लक्ष

| मुरुड-जंजिरा | प्रतिनिधी |

दरवर्षी लाखो पर्यटक मुरूड तालुक्यातील जंजीरा किल्ल्याला भेट देत असतात. या किल्ल्याकडे जाणारा रस्ता उंच अश्या डोंगरातून जात असून त्याच्या एका बाजूला अथांग समुद्र आहे. या ठिकाणी सूर्यास्ताचे विलोभनीय दृश्य पहाण्यासाठी पर्यटकांची नेहमीच गर्दी असते. मात्र, या ठिकाणी पर्यटकांची मोठी गैरसोय होते. शेतकरी कामगार पक्षाच्या दिवंगत नेत्या मा.आ. मिनाक्षी पाटील यांनी या पर्यटन स्थळाचा विकास करण्यासाठी प्रयत्न केले होते. त्यासाठी निधी देखील मंजूर करून घेतला होता. मात्र, हा प्रकल्प गेली ७ वर्षे वनखात्याच्या पान २ वर

# रायगड जिल्हा परिषद कर्मचारी उतरले रस्त्यावर

**जय महाराष्ट्र शासकीय निमशासकीय संघटनाचा लढा**



• (छायाचित्र : समीर मालोदे)

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

जूनी पेन्शन लागू करा, चौथ्या वेतन आयोगापासून वेतन श्रेणीत असलेली तफावत दुर करून सुधारित वेतन श्रेणी लागू झाली पाहिजे, अशा अनेक मागण्यांसाठी राजिप कर्मचारी सोमवारी (दि.२३) रस्त्यावर उतरले. हे आंदोलन अलिबागमधील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर करण्यात आले. जय महाराष्ट्र शासकीय निमशासकीय अधिकारी व कर्मचारी संघटनेच्यावतीने करण्यात आलेल्या या आंदोलनात असंख्य अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले होते. यावेळी शासनाविरोधात निषेध व्यक्त करीत सुरु असलेल्या अधिवेशनात मागण्यापूर्ण होतील, अशी अपेक्षा ही व्यक्त केली.

यावेळी जिल्हा पालक अध्यक्ष सचिन पाटील, जिल्हा अध्यक्ष मंगेश ठाकूर, जिल्हा उपाध्यक्ष संजीवनी घरत, तुषार म्हात्रे, कार्याध्यक्ष प्रमोद पाटील, सचिव प्रशांत जुईकर, प्रसिध्दी प्रमुख विजय कासार, महिला प्रतिनिधी असावरी भोसले, इतर संघटनेचे पदाधिकारी व सदस्य आदी लेखा आणि लिपीक संवर्गातील कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सुरुवातीला जिल्हा परिषद कार्यालय कुंटेबाग येथून मोर्चा काढण्यात आला. त्यांनतर या मोर्चाचे हिराकोट तलावजवळ सभेत रुपांतर झाले. 'आमच्या मागण्या पुर्ण करा', 'वेतन त्रुटी दुर करा', अशा अनेक घोषणा देत या प्रशासनासह शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करण्यात आला. पान २ वर

### नेपाळमध्ये भीषण बस अपघात

| काठमांडू | वृत्तसंस्था|

नेपाळमध्ये प्रवाशांनी भरलेली बस नदीत कोसळल्याने भीषण अपघात झाला आहे. या अपघातात १८ जणांचा मृत्यू झाला असून २६ जण जखमी आहेत. नेपाळच्या धाडिंग जिल्ह्यात गजुरीजवळ हा अपघात घडला. ही बस पोखराहून राजधानी काठमांडूला जात होती. बसमध्ये ४० पेक्षा अधिक प्रवासी होते. काठमांडूपासून जवळपास ९० किलोमीटर दूर असलेल्या पृथ्वी हायवेवर गजुरीजवळ बस नदीत कोसळली. मृतांमध्ये २ परदेशी पर्यटकांचा समावेश आहे. ते दोघे न्यूझीलंडचे रहिवासी असल्याची माहिती धाडिंग जिल्हा वाहतूक पोलीस कार्यालयाचे प्रमुख शिशिर थापा यांनी दिली.

**कोकण विभागात घडला अभूतपूर्व इतिहास | बेस्ट ऑफ इंडिया रेकॉर्डमध्ये नोंद**

# ५१ लाख विद्यार्थ्यांनी गायले 'हिंद-दी-चादर'

| रायगड | प्रतिनिधी |

हिंदुस्थानी संस्कृती आणि मानवी मूल्यांच्या रक्षणासाठी आपल्या प्राणांची आहुती देणारे श्री गुरु तेग बहादूर यांच्या ३५० व्या शहिदी समागम निमित्ताने सोमवारी (दि.२३) कोकण विभागात एक अभूतपूर्व इतिहास रचला गेला. कोकण विभागातील २० हजार शाळांमधील तब्बल ५१ लाख विद्यार्थ्यांनी एकाच वेळी सुप्रसिद्ध गायक सतिंदर सरताज यांनी गायलेले 'हिंद-दी-चादर' हे गीत सादर केले. या ऐतिहासिक उपक्रमाची दखल 'बेस्ट ऑफ इंडिया' रेकॉर्डने घेतली आहे.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला ठिक ९.०० वाजता शाळेतील विद्यार्थ्यांनी अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने सामूहिक गायन केले. प्रास्ताविक करताना उपसंचालक मनोज सानप यांनी सांगितले की, महाराष्ट्र शासनाच्यावतीने राबविण्यात येत असलेली ही मोहीम आता केवळ व्हिडिओ कंटेंट न राहता एक संस्कारांची डिजिटल चळवळ बनली आहे. गुरुबचन सिंह यांनी गुरु तेग बहादूर यांच्या जीवनपटावर प्रकाश टाकत मुलांचे प्रबोधन केले. कोकण विभागीय माहिती कार्यालयाच्या सहायक संचालक संजीवनी जाधव-पाटील यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. नेरुळ येथील पान २ वर



### गौरवास्पद बाब

विभागीय आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी विद्यार्थ्यांच्या या विक्रमी सहभागाचे कौतुक करताना, श्री गुरु तेग बहादूर यांचे जीवन धैर्य, करुणा, समता आणि अन्यायाविरुद्ध निर्भयपणे उभे राहण्याचा एक तेजस्वी आदर्श आहे. ५१ लाख विद्यार्थ्यांनी एकाच सुरात गायलेले हे गीत सामाजिक बांधिलकी अधिक घट्ट करणारे असून, जागतिक स्तरावर याची नोंद होणे ही गौरवास्पद बाब आहे.

VACANCY
ACCOUNTS EXECUTIVE
Fantaxtick Advisory Pvt. Ltd., Alibag, requires Accounts Executive.
Qualification: Graduation / Post-Graduation in Commerce.
Experience: Minimum 2–3 years.
Must have working knowledge of Tally, and should be able to handle GST & TDS compliances independently.
Location: Alibag
Interested candidates may email their resume to connect@fantaxtick.in or contact 7249118562. (Preferably male candidates.)

# नवीन गाड्यांची प्रतीक्षा

## ॥ प्रवाशांचे हाल वाढले; राज्य परिवहन विभागाचे दुर्लक्ष

। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।

श्रीवर्धन एसटी आगाराची अवस्था सध्या अत्यंत दयनीय झाली असून भंगार अवस्थेतील बसगाड्यांमुळे प्रवाशांचे हाल वाढले आहेत. अनेक वर्षांपासून नवीन बसगाड्या न मिळाल्याने आगारातील बहुतांश बस जुनाट, वारंवार बिघडणाऱ्या आणि प्रवासासाठी असुरक्षित ठरत आहेत. परिणामी दररोज प्रवास करणाऱ्या प्रवाशांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे.



श्रीवर्धन आगारातून मुंबई, नालासोपारा, रोहा, माणगाव, महाड, आदी मार्गांवर दररोज मोठ्या प्रमाणावर प्रवासी वाहतूक होते. मात्र बसांची खराब स्थिती, वारंवार होणाऱ्या तांत्रिक बिघाडांमुळे अनेक फेऱ्या रद्द केल्या जात आहेत. काही बस रस्त्यातच बंद पडत असल्याने प्रवाशांना तासन्‌तास अडकून राहावे लागत आहे. याचा फटका विद्यार्थी, नोकरदार, ज्येष्ठ नागरिक आणि रुग्णांना विशेषतः बसत आहे.

आगारातील अनेक बसांचे आयुष्य संपले असूनही त्या तात्पुरत्या दुरुस्त करून रस्त्यावर चालवल्या जात आहेत. बसमधील आसने तुटलेली, खिडक्या खराब, पावसाळ्यात गळती, तसेच ब्रेक आणि इंजिनसंबंधी तक्रारी वारंवार पुढे येत आहेत. त्यामुळे अपघाताचा धोका वाढल्याची भीती प्रवाशांकडून व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, बीएस-६ बसमध्ये प्रवाशांसाठी आरामदायी आसने, सीसीटीव्ही कॅमेरे, मोबाइल चार्जिंग पॉईंट, डिजिटल डिस्प्ले, सुरक्षितता आणि आधुनिक सुविधा उपलब्ध असल्याने अशा बस श्रीवर्धन आगारात तातडीने देण्यात याव्यात, अशी जोरदार मागणी होत आहे.

### आश्वासनाचा विसर?

राज्य परिवहन महामंडळाकडून बीएस-६ प्रकारच्या आधुनिक बसगाड्या देण्याचे आश्वासन देण्यात आले होते. मात्र, अनेक महिने उलटूनही श्रीवर्धन आगाराला एकही नवीन बस मिळालेली नाही. त्यामुळे 'आश्वासनाचा विसर पडला की काय?' असा सवाल प्रवाशांकडून व्यक्त केला जात आहे.

### खासगी वाहतुकीकडे ओढ वाढण्याची भीती

नवीन बसगाड्या लवकरात लवकर उपलब्ध न झाल्यास प्रवाशांचा एसटीवरील विश्वास डळमळीत होईल आणि खासगी वाहतुकीकडे ओढ वाढेल, अशी भीती व्यक्त केली जात आहे. त्यामुळे राज्य परिवहन विभागाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन श्रीवर्धन आगाराला तातडीने नवीन बसगाड्या मंजूर कराव्यात, अशी जोरदार मागणी प्रवासी आणि स्थानिक नागरिकांकडून होत आहे.

**जाहिर नोटीस**

तमाम लोकांस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमच्या अशिलांने मौजे श्रीवर्धन, ता. श्रीवर्धन, जि. रायगड येथील गट नं. व उपविभाग क्र.१५६/२, एकूण क्षेत्र ००-०७-६०, आकार २.३७ लागवड घरपड, इतक्या क्षेत्राची मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक श्रीम.मंदा महादेव केळस्कर सर्व राहणार मु.पो. श्रीवर्धन, ता. श्रीवर्धन, जि. रायगड. यांच्याकडून जाण्या-येण्याच्या रस्त्याच्या हक्कासह कायम विकत घेणेची ठरवली आहे. तशा आशयाची बोलणी आमच्या आशिलांनी संबंधीत जमिन मालकांन सोबत केलेली आहे. सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत असल्याबाबत मिळकत मालकांचे म्हणणे असून ती त्यांच्या आजपर्यंत ताबेकब्जात व वहिवाटीत आणि मालकी हक्कात असुन प्रत्यक्ष कसवणुकी खाली आहे. तसेच सदर मिळकतीबाबत कोणत्याही न्यायालयात दिवाणी अथवा फौजदारी स्वरूपाचा दावा दाखल नाही.

वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचीही कुळ, वहिवाट, ताबा, बयाणा, पावती, अखत्यारपत्र, साठेकरार, गहाण, बोजा, भाडेपट्टी, मृत्यूपत्रांकित दान, जप्ती, लीन, लीज, बक्षिसी, ट्रस्ट, पोटगी, वारसा किंवा कोणत्याही प्रकारच्या दस्ताने अथवा अन्य कोणत्याही प्रकारची कायदेशीर हक्क व हितसंबंध असल्यास, तसेच नमुद मिळकतीच्या हद्दी खुणांवरुन कोणाचीही हरकत असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसाचे आत संबंधीतांनी आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासहीत (समक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने) खाली सही करणार खरेदीदस्ताने वकील यांचेकडे पाठवावे व वकिलांची खात्री पटवून द्यावी.

विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाराहीत आहे. असे समजून सदर मिळकतीवर आता कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत. असे गृहीत धरुन आमचे अशिल संबंधीत मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर मागाहून उपस्थित करण्यात येणारी कोणाचीही हरकत आमचेवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया सर्वानी नोंद घ्यावी.

श्रीवर्धन
दिनांक : २३/०२/२०२६

सही/-
**ॲड.अतुल अरविंद चौगुले**
B.L.S. LL.B
खरेदीदाराचे वकील
मो.९२७६५६३६६७

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

**२४ फेब्रुवारी**

१) श्री.गजानन सखाराम पाटील
पोयनाड, अलिबाग
२४-०२-१९३५

२) श्रीम.जगदीश पांडुरंग कवळे
श्रीबाग-२, अलिबाग
२४-०२-१०५२

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ **(बीपीन राठवा)** ९२२६०५५१५५ **(अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**



**स्व. डॉ. श्री. अरविंद पाटणकर, स्मरणार्थ अलिबाग**

पान १ वरून

## मे २०२७ पर्यंत खड्ड्यातूनच प्रवास

करण्याची वेळ येणार असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे आणखी दीड वर्षांचा वनवास या मार्गावरील प्रवाशांना भोगावा लागणार आहे. अलिबाग-रोहा मार्गावरील रस्त्याचे राजकारण करून विद्यमान आमदारांनी मतदारांची मते मिळविली. स्व खर्चाने रस्ता तयार करणार, असे त्यांनी सांगितले होते. अनेक वेळा नारळ फोडीच्या स्पर्धा झाल्या. भाजप विरूद्ध शिंदे गट यांच्यामध्ये कामाचा श्रेयवादही झाला होता. मात्र, दोन वेळा आमदार होऊनही हा रस्ता आमदार पूर्ण करू शकले नाही. आजही या रस्त्यावरून धुळखात प्रवास करावा लागत आहे. ठिकठिकाणी असलेल्या खड्ड्यातून प्रवास करताना जीव मुठीत घ्यावा लागत आहे. महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा महामंडळाच्यावतीने अलिबाग बायपास ते रोहा तालुक्यातील तळेखार (साळावमार्गे) हा ३० किलो मीटरचा रस्ता मंजूर झाला आहे. या रस्त्यासाठी १७१ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. साळावपासून काँक्रीट रस्त्याचे काम मागील वर्षी पावसाच्या अगोदर करण्यास सुरुवात केली. मात्र, पावसाळ्यात चिखलातून प्रवास करावा लागला. अजूनही हा रस्ता अपूर्णस्थितीत आहे. मागील २ महिन्यांपासून अलिबाग बायपासपासून रस्त्याचे काम सुरु करण्यात आले आहे. सहाण बायपासपर्यंत रस्ता खोदून ठेवण्यात आला आहे.

ठिकठिकाणी रस्ता खोदून ठेवल्याने वाहतूक कोंडीचा फटका बसत असताना खड्ड्यातून प्रवास करण्याची वेळ प्रवाशांना येत आहे. धुळ, मातीचे कण नाकातोंडात जात आहेत. त्यामुळे प्रवाशांना प्रचंड त्रास होत आहे. हा रस्ता कधी होणार, पावसाळ्यात पुन्हा चिखलात प्रवास करावा लागणार का? असा प्रश्न प्रवासी करीत आहेत. रुंदीकरणासह काँक्रिटीकरणाचे सुरु असलेले काम १७१ कोटी रुपयांचा आहे. या रस्त्याचे काम मे २०२७ पर्यंत पूर्ण होईल, अशी माहिती उपलब्ध झाली आहे. त्यामुळे अलिबाग-रोहा व मुरूडकरांना मे २०२७ पर्यंत खड्ड्यातून प्रवास करावा लागणार असल्याचे चित्र आहे.

## अलिबाग नगरपरिषदेची सर्वसाधारण सभा

आवारातील उपलब्ध जागेत मुलांच्या कार्यक्रमासाठी स्टेज आणि इतर सोयी करण्याचा सुद्धा निर्णय घेण्यात आला. मारुती नाका परिसरात इ-टॉयलेटची निर्मिती करण्याची सुचना उपाध्यक्षा ॲड. मानसी म्हात्रे यांनी मांडली. ही सूचना सर्वानुमते मान्य करण्यात आली. शहरातील खराब, निकामी झालेले विद्युत खांब काढणे, रस्त्यावरील बंद दिवे चालू करणे याबाबत सुद्धा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. शहरातील पाणीपुरवठा संबंधातील अडचणी व नवीन योजनेतील अडचणींबाबत प्रशासनाने योग्य लक्ष घालून जबाबदार अधिकारी यांची नेमणूक करण्याची सूचना अनिल चोपडा यांनी केली. त्यांची सूचना मुख्याधिकारी यांनी मान्य केली. अशाप्रकारे निवडणुकीनंतरची कामकाजाची पहिली सभा चांगल्या वातावरणात पार पडली. यावेळी नगराध्यक्ष अक्षया नाईक, उपनगराध्यक्ष मानसी म्हात्रे, प्रशांत नाईक, सर्व सभापती, नगरसेवक आणि नगरसेविकांनी कामकाजात सहभाग घेतला.

## सभागृह गहिवरलं

त्यांनी केली. अजितदादा मला झिपऱ्या कमी कर म्हणायचे. राजकीय वजन वाढवत जा. शारीरिक वजन कमी कर अे बोलायचे, अशी आठवण सांगताना रोहित पवार भावुक झाल्याचे पाहायला मिळाले. त्यानंतर बोलताना आता मी जो लढा लढतोय, या लढ्याबद्दल दादाही मला शाबासकी देतील, असे म्हणत दादांच्या मृत्यूबद्दल आरोपींना तुरूंगात टाकल्याशिवाय हा लढा थांबणार नाही, असा निश्चयही त्यांनी व्यक्त केला. तसेच, यावेळी बोलताना सुनेत्रा पवार यांच्या मदतीला मी कायम उभा असेल, असे आश्वासनही त्यांनी दिले.

त्यानंतर उद्धव ठाकरे म्हणाले की, विधिमंडळाचे या वर्षीचे हे पहिले अधिवेशन आहे आणि या अधिवेशनाची सुरुवात आपण सर्वजण एका दुःखी अवस्थेमध्ये करत आहोत. आजपर्यंत नेहमी सभागृहात दिसणारे, आपले वाटणारे अजितदादा आज या सभागृहात किंवा या विधिमंडळात दिसत नाहीत. ही खंत आपल्या सगळ्यांच्या मनात आहे. माणसं येतात, माणसं जातात. माणसं असताना त्यांचे महत्त्व कधी कळत नाही आणि ती नसतात तेव्हा त्यांचे महत्त्व कळून काही उपयोग होत नाही. अनेक जण असे असतात की जी जवळ असताना कळत नाहीत; पण काही जण असे असतात की जी जवळ आल्यानंतर आपल्याला व्यवस्थित कळतात. या विधिमंडळामध्ये अनेकांच्या राजकीय कारकिर्दीची सुरुवात अजित दादांसोबत झाली असेल. काळ एकच आहे, साहजिकच आहे. विशेषतः माझ्या कारकिर्दीची सुरुवात ही अजित दादांच्या पक्षाच्या आणि त्यांच्या विचारधारेच्या विरोधातली होती. आम्ही कधी एकत्र येऊ, असे ध्यानीमनी सुद्धा वाटले नव्हते. अजित दादांबद्दल म्हणायचे झाले तर दोन सकाळी अशा होत्या, त्यातली एक सकाळ ही महाराष्ट्राला त्यांच्या कृतीने धक्का देणारी होती आणि दुसरी सकाळ ही महाराष्ट्राला चटका देणारी होती, अंतःकरणाला चटका देणारी होती, असे उद्धव ठाकरे म्हणाले.

## रायगड जिल्हा परिषद कर्मचारी उतरले रस्त्यावर

इतर संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये लिपीकाच्या वेतन श्रेणीच्या तुलनेत भरमसाठ वाढ झाली आहे. त्यामुळे लिपीक संवर्गावर झालेला अन्याय दुर करून सुधारित वेतन श्रेणी लागू करण्यात यावी, चौथ्या वेतन आयोगापासूनची वेतन त्रुटी दूर करून सुधारित वेतन श्रेणी लागू करणे. पदनामात बदल करणे, पदोन्नतीची साखळी कमी करणे. जूनी पेन्शन योजना सर्वांसाठी लागू करणे. गोदावरी महामंडळास स्वायत्त करत असताना तीन व चार वर्गातील कर्मचाऱ्यांचे वेतनपूर्वी प्रमाणे कोषागार कार्यालयातमार्फत करणे. १ नोव्हेंबर २००५ पूर्वी अनुकंपाच्या प्रतिक्षा सुचीवर असलेल्या सर्वांना जूनी पेन्शन लागू करणे. जिल्हा परिषदेमधील अधिकारी व कर्मचाऱ्यांचे समावेशन मृदव जलसंधारण विभागामध्ये न करणे अशा अनेक मागण्यांसाठी या कर्मचाऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सोमवारी आंदोलन केले. या आंदोलनाला कर्मचाऱ्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे नागाव, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत सदरहू मिळकतीचे विद्यमान मालक यांचेकडून कायमस्वरुपी खरेदीखताने विकत घेणेच्या ठरविलेले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

| अ.क्र. | मौजे | गट नं. | क्षेत्र हे.आर. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| १ | नागाव | २१८४ | ०-१९-५५<br>पो.ख.०-०२-३०<br>एकूण ०-२१-८५ | ४.८१ |

वर नमूद वर्णनाची मिळकत ही निर्वेध व निंजोखीम असल्याची खात्री विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना करुन दिलेली आहे. या गोष्टीची पडताळणी करणेकरीता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध करणेत येत आहे.

तरी सर्व लोकांस असे कळविणेत येते की, वर नमूद केलेल्या मिळकतीमध्ये विद्यमान मालकांव्यतिरिक्त अन्य कोणाचेही साठेकरार खरेदीखत दान, लिन, बक्षीसपत्र, वहिवाट वगैरे अन्य कोणताही कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्यासंबंधी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह आपली लेखी हरकत खाली सही करणार यांचेकडे आठ दिवसांचे आत आणून द्यावी. सदर विहीत मुदतीत जर कुणाचीही कसलीही हरकत खाली सही करणार यांचेकडे तसेच मुळ मालकांकडे न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व निंजोखीम आहे असे समजून आमचे अशिल सदर विद्यमान मालकांबरोबर खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील अशा परिस्थितीत मग मागाहून येणारी कोणाचीही कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व ती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे
अलिबाग
दि. २४-०२-२०२६

सही/-
**श्री. संतोष एकनाथ म्हात्रे**
ॲडव्होकेट
'देवगिरी', कामत आळी,
अलिबाग-रायगड

## तलावात बुडून बालकाचा मृत्यू

या तलावात मोठ्या प्रमाणात मासे सोडण्यात आले आहेत. त्यामुळे गावातील तरुण वर्ग या तलावावर मासेमारी करून उदरनिर्वाह करतात. यादरम्यान, तुंगी येथील १३ वर्षीय मुलगा दुपारच्या वेळेस घरातून बाहेर पडला तो परत घरी आलाच नाही. ओमकार ज्यावेळी घरातून बाहेर पडला तेव्हा घरात कोणीच नव्हते. त्यामुळे गावातील लोकांनी त्याची शोधाशोध सुरू केली. ग्रामस्थांनी रात्रभर शोध घेतला असता तो सापडला नाही. त्यामुळे नेरळ पोलिसांना याबाबत कळविण्यात आले. त्यानंतर सोमवारी (दि.२३) ग्रामस्थांनी ग्राम तलावाच्या आजुबाजूला शोध घेतला. लोखंडी जाळी लाकडी काठीला बांधून तलावाच्या खोल पाण्यात शोध घेण्यात आला. अनेक प्रयत्नानंतर ओमकार आसवले याचा मृतदेह ग्रामस्थांच्या हाती लागला. त्या तलावाचे मागील दोन वर्षांपूर्वी खोदकाम करताना निघालेले दगड तेथेच ठेवल्यामुळे हा अपघात घडला असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

## मुरूडमधील पर्यटन विकास कधी?

परवानगीमध्ये अडकला आहे. त्यामुळे याकडे विद्यमान आमदारांचे दुर्लक्ष होत असल्याचे स्थानिकांकडून बोलले जात आहे.

मुरुड तालुक्याला पर्यटनाचा 'ब' दर्जा प्राप्त आहे. त्यासाठी पर्यटन स्थळ विकसित करण्यासाठी शासनाकडून निधी मिळणे खूप आवश्यक आहे. येथील जंजिरा किल्ला पाहण्यासाठी दरवर्षी लाखो पर्यटक येत असतात. जंजिरा किल्ला हा राजपुरी गावात असल्यामुळे या किल्ल्यावर जाण्यासाठी डोंगरी गावाला वळसा घालून जावे लागते. हा मार्ग उंच अशा डोंगरातून जात असून एका बाजूला अथांग समुद्र असल्याने येथे सूर्यास्ताचे विलोभनीय दृश्य पहाण्यासाठी पर्यटकांची नेहमीच गर्दी असते. मात्र, या ठिकाणी पर्यटकांना बसण्यासाठी बाकडे आणि उंच चौथरा नसल्याने त्यांची मोठी गैरसोय होते. डोंगरी-राजपुरी रस्त्यावर सनसेट पॉइंटचे सुशोभिकरण केल्यास एकदरा, डोंगरी, माझेरी व राजपुरी येथील स्थानिकांना रोजगार मिळणार आहे. या पॉईंटचा विकास झाल्यास किल्ल्यावर जाणारा अथवा परतणारा पर्यटक येथे क्षणभर विसावा घेऊ शकेल. त्यामुळे स्वयंरोजगाराला आपोआप चालना मिळेल.

शेतकरी कामगार पक्षाच्या दिवंगत नेत्या माजी आमदार मीनाक्षी पाटील यांनी या प्रकल्पाचा प्रस्ताव तयार करून १ कोटीचा निधी मंजूर करून आणला होता. मात्र, या प्रकल्पसाठी लागणारी काही जागा वनखात्याची असल्यामुळे वनविभागाकडून अद्यापही परवानगी मिळालेली नाही. ७ वर्षांपूर्वी या परिसरात प्रकल्पातील काही जागा वनखात्याची निघाली आणि आलेला निधी व प्रकल्प वनखात्याच्या परवानगीसाठी अडकला आहे. या पॉईंटच्या विकासासाठी ७ मीटर रस्त्यापासुन एक फूट उंचीची संरक्षक भिंत, सेफ्टी गटर, रेलींग, ४ स्वच्छता गृहे, १५ ते २० गाड्यांसाठी वाहनतळ, हाय मास्ट दिवे, गार्डन इत्यादी सुविधा प्रस्तावित करण्यात आल्या होत्या. परंतु, प्रत्यक्षात मात्र या पॉईंटच्या विकासासाठी विद्यमान आमदारांकडून कोणतेही प्रयत्न होताना दिसत नाही. त्यामुळे या स्थळाचा विकास होणे कठीण होऊन बसले आहे.

## '५१ लाख विद्यार्थ्यांनी गायले हिंद-दी-चादर'

गुरु गोविंदसिंग एज्युकेशन अकॅडमीमध्ये आयोजित करण्यात आलेल्या मुख्य कार्यक्रमाला महापौर सुजाता पाटील यांच्यासह उपमहापौर दशरथ भगत, विभागीय आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे, प्रशासन सहआयुक्त विजय म्हासाळ, कोकण विभागाचे माहिती उपसंचालक मनोज सानप, सहायक आयुक्त डॉ. सागर घोलप, शिक्षणाधिकारी अशोक कडूस, नवी मुंबई महानगरपालिका शिक्षण विभागाच्या सहायक आयुक्त दिपाली दिवेकर, नवी मुंबई महानगरपालिका जनसंपर्क अधिकारी महेंद्र कोडे, तसेच गुरुबचन सिंग सिंघल, जसपाल सिंग नागरा, नगरसेवक कुलदीप सिंग सुरी, जसविंदर सिंग, मुख्याध्यापिका अमरजित कौर सेनी आणि ज्येष्ठ पत्रकार बी.पी. नायर यांची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी बोलताना महापौर सुजाता पाटील म्हणाल्या की, श्री गुरु तेग बहादूर सिंग जी यांचे बलिदान केवळ शीख समाजासाठी नसून संपूर्ण मानवजातीसाठी प्रेरणादायी आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून खारघर, सेक्टर २९ येथे आयोजित होणाऱ्या या भव्य समागमात जगभरातून १५ ते २० लाख भाविक उपस्थित राहण्याची शक्यता आहे. अशा विश्वविक्रमी उपक्रमात सहभागी होण्याचे भाग्य लाभल्याचे मनस्वी समाधान मिळाले असल्याचे त्यांनी नमूद केले. विभागीय आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी विद्यार्थ्यांच्या या विक्रमी सहभागाचे कौतुक करताना सांगितले की, श्री गुरु तेग बहादूर जी यांचे जीवन धैर्य, करुणा, समता आणि अन्यायाविरुद्ध निर्भयपणे उभे राहण्याचा एक तेजस्वी आदर्श आहे. ५१ लाख विद्यार्थ्यांनी एकाच सुरात गायलेले हे गीत सामाजिक बांधिलकी अधिक घट्ट करणारे असून, जागतिक स्तरावर याची नोंद होणे ही गौरवास्पद बाब आहे.

## प्रोपिलीन गॅस टँकरचा अपघात

ताफा घटनास्थळी दाखल झाला. सुरक्षेच्या कारणास्तव मुंबईकडे जाणारी वाहतूक काही काळ पूर्णतः बंद ठेवण्यात आली होती. टँकरची तांत्रिक स्थिती, दाब, गळतीचा धोका इत्यादी बाबींची तपासणी करून सुरक्षिततेची जबाबदारी सांभाळली. क्रेन आणि पुलरच्या सहाय्याने टँकर अपघातस्थळापासून सुमारे २ किलोमीटर अंतरावरील मोकळ्या जागेत हलविण्यात आला. खोपोली पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सचिन हिरे आणि महामार्ग वाहतूक पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक स्वप्निल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ही प्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण झाली. आरटीओ अधिकारी रावते यांनी वाहनाची तांत्रिक तपासणी केली. खोपोली पोलीस स्टेशनमध्ये या अपघाताची नोंद करण्यात आली आहे.

**- जाहीर नोटिस-**

सर्व जनतेस कळवण्यास येते की, आमचे आशिलांनी मौजे धोकवडे, ता.अलिबाग येथील खालील वर्णनाची जमिन मिळकत, मिळकतीचे विद्यमान मालक निता राजेंद्र खानोलकर व श्रीनिवास सदाशिव गद्रे यांचेकडून विकत घेण्याचे ठरवून तसा विक्रीचा व्यवहार आमचे अशिल व विद्यमान मालक यांचेमध्ये ठरलेला असून सदरहू मिळकतीची विक्रीची किंमत सुद्धा ठरली आहे व त्याप्रमाणे विद्यमान मालक यांनी आमचे अशिलांस सदरहू मिळकतीमध्ये स्वखर्चाने मोजणी करण्यास, स्वखर्चाने दगडी कंपाउंड बांधण्यास व मिळकतीच्या कागदपत्रांचे टायटल सर्च घेणेबाबत लेखी परवानगी दिलेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

मौजे धोकवडे, ता.अलिबाग, भूमापन क्रमांक व उपविभाग ५६८, जिरायत क्षेत्र ०-४६-६० हे.आर., वरकस क्षेत्र ०-०३-०० हे. आर., एकूण पो.ख. ०-०६-९०, एकूण क्षेत्र ०-५६-५० हे. आर., आकार रु.१२.१९/- ही मिळकत हा या जाहिर नोटिसचा विषय आहे.

तरी वर वर्णन केलेली जमिन मिळकत विद्यमान मालकांच्या ताबे कब्जाची, वहिवाटीची, निर्वेध, बोजाविरहित, विकण्यायोग्य असल्याची हमी विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिली आहे. तरी वरील जमिन मिळकती संबंधी कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, मालकी, गहाण, दान, बक्षिस, विक्रीचा करार, दावा, लिज, अन्नवस्त्र, हवाला, पोटगी, चार्ज, ताबा, वहिवाट, भाडेपट्टा, वाटणी, बोजा असल्यास अथवा त्यांची या व्यवहारास हरकत असल्यास आपली हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहीत नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ दिवसांचे कालावधीत लेखी नोंदवावी. या कालावधीत कोणतीही हरकत न आल्यास आमचे अशिल सदरहू मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेली कोणतीही हरकत आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग
दि. २४.०२.२०२६

**ॲड. मिलिंद चव्हाण**
८. आनंद अपार्टमेंट, श्रीबाग-३, अलियाग

## साळाव रस्त्याला कोंडीचे ग्रहण

रस्त्याचे काम जोरदार सुरू आहे. या कामामुळे पर्यायी वाहतूक व्यवस्था न केल्याने वाहन चालकांना शारीरिक, मानसिक व आर्थिक त्रास सहन करावा लागत आहे. तसेच, अतिदक्ष अशा रुग्णांना वाहतूक करताना रुग्णवाहिका या मार्गावर चार चार तास अडकून पडत आहेत. त्यामुळे रुग्णांचे प्रचंड हाल होत आहेत. या मार्गावर खोदलेल्या रस्त्यांमुळे दुचाकी स्वारांना अपघात होत आहेत तसेच रुग्णवाहिकेचे टायर सुद्धा फुटत आहेत. या मार्गावर होणाऱ्या वाहन चालकांच्या मनस्तापासाठी साळाव-मुरुड व साळाव-सुपेगाव या मार्गाचा एकेरी वाहतूकी साठी वापर करण्यात यावा, जेणेकरून साळाव, काशीद व मुरुड या ठिकाणी होणारी वाहतूक कोंडी रोखता येईल, अशी मागणी सर्व वाहन चालक स्थानिक ग्रामस्थ नागरिक यांच्यावतीने जोर धरीत आहे.

## विनयभंग करणाऱ्या चालकाला सक्तमजुरी

आले. त्यामध्ये पीडिता व पीडितेचे वडील यांच्यासह तपासीक अधिकारी एपीआय अमोल खाडे यांची साक्ष महत्त्वाची ठरली. विशेष सरकारी वकील प्रतीक्षा वडे- वारंगे यांनी न्यायालयासमोर केलेला युक्तिवाद ग्राह्य धरून न्यायालयाने सागर चव्हाण याला शिक्षा सुनावली. त्याला पोक्सो कायदा कलम आठ अन्वये ३ वर्षे सक्तमजुरीची शिक्षा आणि ५ हजार रुपये दंड, तसेच पोक्सो कायदा कलम १० अन्वये ५ वर्षे सक्तमजुरीची शिक्षा आणि ५ हजार रुपये दंड अशी शिक्षा ठोठावली.

## रोह्यात दुचाकीस्वाराकडून चाकू हल्ला

हे दोघे शनिवारी (दि.२१) सायंकाळच्या सुमारास दुचाकीवरून रोह्याकडे जात होते. ते चणेरा भागातील खारखर्डी-पारंगखार येथील मनोहर रामा गुंडे यांच्या घराजवळून सुसाट वेगाने गेले. त्यावेळी मनोहर यांच्या पत्नी मयुरी गुंडे यांनी त्यांना हळू जा, असे सांगितले. या गोष्टीचा राग मनात धरून दुचाकीवरील अविनाश शेळके याने धारदार सुरा काढून मनोहर गुंडे यांच्यावर वार केले. त्यानंतर मयुरी गुंडे यांच्यावर देखील वार करून या दाम्पत्याला गंभीर जखमी केले. यावेळी अविनाश शेळके याला रोखण्यासाठी राकेश भोईर हे आले असता त्यांच्यावर देखील वार करून त्यांना जखमी केले. त्यानंतर गीतेश घाणेकर याने हाता बुक्क्याने मारहाण करुन शिवीगाळी व दमदाटी करुन मारण्याची धमकी दिली आणि दोघेही फरार झाले. याबाबत मनोहर गुंडे यांनी रोहा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून पोलीस निरीक्षक मारुती पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार नरेश मोरे अधिक तपास करित आहेत.

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस कळविण्यात येते की, माझे अशिलांनी खालील वर्णनाच्या जमिन मिळकती ह्या सदर जमिनींचे विद्यमान मालक श्री.मुकेश मांगीलाल जैन, श्री. हितेश अमृतलाल जैन व श्री.महेंद्र चुनिलाल बाफणा रा. बाजारपेठ, पेण-रायगड यांचेकडून रजिस्टर खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले असून त्याबाबत उभयतांमध्ये सविस्तर बोलणी सुरु आहेत.

**मिळकतीचे वर्णन-** जिल्हा रायगड, तालुका पेण, पंचायत समिती पेण, मे. दुय्यम निबंधक पेण, तलाठी सजा-आंबेघर, ग्रामपंचायत सावरसई येथील

| मौजे | गट नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु. पैसे |
|---|---|---|---|
| अ) सावरसई | १२/१ | ०-१९-६० | ३-३६ |
| ब) गौळणवाडी | १/४९ | ०-७१-००<br>पैकी ०-४२-०० | ०-७६ |

वरील जमिनी या जाहीर नोटीसीचा विषय आहे.

सदरच्या जमिनी ह्या निर्वेध व बोजा विरहीत असल्याची ग्वाही विद्यमान मालकांनी माझे अशिलांना दिली आहे. तरी वरील जमिन मिळकती संदर्भात जर कोणाचा साठेकरार, गहाण, दान, जप्ती, लिन, लीज, चार्ज, जामिनकी, कब्जा, वारसाहक्क अगर कायदेशिर हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाले दिवशी पासून १५ (पंधरा) दिवसांचे आत खाली सही करणार ॲडव्होकेट यांचे पत्त्यावर रजिस्टर्ड पोस्टाने कळवाव्यात.

जर वरील मुदतीत कोणाचीही लेखी हर-हरकत न आल्यास सदरच्या जमिनी ह्या निर्वेध व बोजाविरहीत आहेत व त्यावर इतर दुसरे कोणाचाही, कसल्याही प्रकारचा हक्क अगर हितसंबंध नाही असे समजुन माझे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदती नंतर येणारी कोणतीही हरकत ही माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी. येणेप्रमाणे जाहीर नोटीस दिली असे.

पेण-रायगड.
दि.२४/०२/२०२६.

सही/-
**ॲड. संजय भास्कर पाटील**
परमार प्लाझा, शॉप नं.१६. तळ मजला,
शिवाजी पथ. पेण-रायगड ४०२१०७.
मोबा. ९८८१९१५२१९

**पनवेल महानगरपालिका**
**ता.पनवेल, जि. रायगड**

जा.क्र.पमपा/सा.बां.(श.अ.)/२२२४/प्र.क्र.१०/६८/२०२५ दिनांक २३/०२/२०२६

**जाहीर सुचना**

पनवेल महानगरपालिका हद्दीतील पनवेल शहरातील अं.भु.क्र.५०८ (पार्ट), ५२० (पार्ट) येथे खेळाचे मैदान विकसित करणेबाबत. इच्छुकांनी सदरचे निविदा दर दिनांक २४/०२/२०२६ ते ०२/०३/२०२६ रोजी सायं ४.०० वाजेपर्यंत महानगरपालिकेच्या बांधकाम (श.अ.) विभागाकडे समक्ष सादर करावीत. सदर दिनांका नंतर प्राप्त झालेले दरपत्रके विचारात घेतले जाणार नाहीत.

List of fair Items required for Play Ground

| SR. NO. | DESCRIPTION OF WORKS | UNIT | QTY | ठेकेदाराने द्यावयाचा दर रक्कम रु (GST) सहित |
|---|---|---|---|---|
| 1 | Providing, supplying and fixing Tensile Roofing over seating area height 4.5m, PES HT 1100 Dtex-Anti capilarity low wick yarns weight 900g/sq. m EN ISO 2286-2 with surface treatement S 2 PVDF/PVDF coated fabric 900 gsm Tensile strength (warp/weft) 420/400 daN/5cm EN ISO 1421 Tear resistance (warp/weft) 55/50daN DIN 53.363 Adhesion 12 daN/5cm EN ISO 2411 Euroclass B-s2,d0/EN1350-1 Rating M 2/ NEP 92- 507, B1/ DIN 4102-1, BS 7837, NFPA 701, CSMFT 19 Coating thickness at the top of the yarms 300 microns Elongation 24h 10daN/5cm (warp/weft) < 1% /<1% Residual elongation / <0.4% with Guarantee 15 years etc. complete. | sq.mtr | 164.43 | |

या कामी अटी व शर्ती खालील प्रमाणे-

१. नमुद केलेले दर हे सर्व प्रकारचे वाहतुक खर्चासह समाविष्ठ असावेत.
२. सदरची जाहीर सुचना फक्त दर खात्री करणे करीता मागविणेत येत आहे.
३. या कामी काही माहीती हवी असलेस बांधकाम(श.अ.) विभागाकडे संपर्क साधावा.
४. या कामी दरांची खात्री झालेनंतर जाहीर ई-निविदा मागविणेत येईल.
५. प्राप्त जाहीर निविदा सुचना दर स्वीकारण्याचे अथवा नाकारण्याचे अधिकार निविदा समितीला असतील.

सही/-
**(संजय कटेकर)**
**शहर अभियंता**
**पनवेल महानगरपालिका**

## निवडक



### नॅशनल बिल्डर अवॉर्डचे आयोजन

**पनवेल :** रोटरी क्लब ऑफ मिलेनियम सिटी, नवी मुंबई यांनी २२ फेब्रुवारी २०२६ रोजी भारतीय विद्या भवन, वाशी, नवी मुंबई येथे नॅशनल बिल्डर अवॉर्डचे यशस्वी आयोजन केले. आदिवासी व ग्रामीण भागात शिक्षण क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या शिक्षकांचा सन्मान करण्यासाठी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला ५४ मान्यवरांची उपस्थिती लाभली. त्यामुळे हा सोहळा अत्यंत अर्थपूर्ण व प्रेरणादायी ठरला. तळागाळात कार्य करून देशाचे भविष्य घडवणाऱ्या शिक्षकांचा गौरव करण्यासाठी हा विशेष उपक्रम होता. कार्यक्रमातील प्रमुख आकर्षण म्हणजे आदरणीय क्लब सदस्य सेंगुप्ता यांचे राष्ट्रीय शिक्षण धोरण विषयावरील मार्गदर्शनपर भाषण प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहून त्यांनी दृष्टीकोन, परिवर्तनशील भूमिका आणि शिक्षक व विद्यार्थ्यांवरील दीर्घकालीन परिणाम याबाबत सखोल विचार मांडले. त्यांच्या स्पष्ट विचारसरणीने व शिक्षणाबद्दलच्या समर्पणाने उपस्थितांना राष्ट्रनिर्मितीतील आपल्या भूमिकेचा पुनर्विचार करण्यास प्रेरित केले. सिंगापुरी यांनी संपूर्ण कार्यक्रमाचे अत्यंत सुरेख व शिस्तबद्ध सूत्रसंचालन केले, ज्यामुळे कार्यक्रम सुरळीत पार पडला. पवन यांनी प्रमुख पाहुण्यांची प्रभावी ओळख करून दिली व मनःपूर्वक आभार प्रदर्शन केले. युवराज यांनी पडद्यामागील सततच्या सहकार्यामुळे कार्यक्रम यशस्वी होण्यास मोठी मदत केली. तसेच क्लबद्वारे राबविण्यात येणाऱ्या विविध प्रकल्पांना दीर्घकालीन पाठिंबा दिल्याबद्दल अविनाश म्हात्रे यांच्या योगदानाचे विशेष कौतुक करण्यात आले.



### ‘आम्ही ५ नाही, तर ७ नगरसेवक सोबत!’

पनवेल : पनवेल महानगरपालिकेतील राजकीय वातावरण शिवसेना उपनेते बबन पाटील यांच्या विधानामुळे चांगलेच तापले आहे. शिवसेना पक्षाच्या पाच नगरसेवकांसह महाविकास आघाडीतील इतर दोन सहकाऱ्यांनी आज पालिका आयुक्त आणि महापौरांची भेट घेऊन स्वतंत्र दालनाची मागणी केली. आम्ही तांत्रिकदृष्ट्या पाच दिसत असलो, तरी प्रत्यक्षात सात नगरसेवक आमच्यासोबत आहेत, असे ठाम प्रतिपादन बबन पाटील यांनी यावेळी केले. पनवेल महापालिकेत सत्ताधारी भाजपला अंगावर घेण्यासाठी आता महाविकास आघाडीने रणनीती आखली आहे. शिवसेनेच्या पाच नगरसेवकांसह, काँग्रेस आणि शेकापच्या चिन्हावर निवडून आलेल्या प्रत्येकी एका नगरसेवकाने ही वज्रमूठ बांधली आहे. गट स्थापनेच्या प्रक्रियेत पाच जण शिवसेनेच्या गटात तर दोन जण शेकाप-काँग्रेस आघाडीच्या गटात दिसत असले, तरी कामकाजासाठी हे सातही जण एकत्र राहणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. यावेळी पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त मंगेश चितळे व नवनिर्वाचित महापौर नितीन पाटील यांची शिवसेना उपनेते बबन पाटील यांच्यासह जिल्हाप्रमुख शिरीष घरत, उपजिल्हा प्रमुख रामादास पाटील, महानगर प्रमुख अवचित राऊत, गटनेत्या लीना गरड, नगरसेविका प्रिया गोवारी, नगरसेवक उत्तम मोर्बेकर, नगरसेविका रितिक्षा गोवारी, नगरसेविका मेघना घाडगे, नगरसेविका प्रगती कैलास पाटील, नगरसेविका आर्या जाधव, प्रविण जाधव, सदानंद शिर्के आदी उपस्थित होते.



### अलिबागमध्ये समूहगीत गायन

**अलिबाग :** गुरु तेग बहादूर जी यांच्या ३५० व्या शहीदी समागम निमित्त शासनाच्या वतीने हिंद दी चादर समूहगीत गायन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.अलिबागमधील जनरल अरुणकुमार वैद्य हायस्कूल व इंडस्ट्रीअल ज्युनिअर कॉलेजमधील सभागृहात सोमवारी (दि.२३) सकाळी हा कार्यक्रम शासनाच्या वतीने घेण्यात आला. या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांसह शिक्षकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. यावेळी प्रकल्प संचालक प्रियदर्शनी मोरे, अलिबागचे गटशिक्षणाधिकारी कृष्णा पिंगळा, प्राचार्य ज्ञानदेव साळवे, दिपक पाटील आदी शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. हिंद दी चादर समूहगीत कार्यक्रमाच्या अगोदर गुरु तेग बहादूर जी यांच्या जीवनाबगद्दल त्यांच्या कार्याची माहिती देण्यात आली. शाळेच्या सहाय्यक शिक्षिका संजीवनी ठमके यांनी ही माहिती दिली. प्रकल्प संचालक प्रियदर्शनी मोरे यांनी गुरु तेग बहादूर यांच्या कार्याची माहिती देत असताना, सामाजिक सलोखा, राष्ट्रीय एकात्मता दृढ करण्यासाठी महापुरुषांचा आदर्श घ्यावा असे आवाहन विद्यार्थ्यांनी केले.

# चार वर्षांचा हिशोब मागणारी महासभा

**स्थायी समितीच्या ‘तिजोरीच्या चाव्या’, सभागृह नेतेपद आणि विरोधी पक्षनेतेपदासाठी जोरदार हालचाली**

**| पनवेल ग्रामीण | वार्ताहर |**

चार वर्षांच्या प्रशासकीय राजवटीनंतर अखेर पुढील महिन्यात पनवेल महानगरपालिकाची सर्वसाधारण सभा होण्याची शक्यता आहे. या मुळे शहरातील राजकीय वातावरण तापले आहे. सभेची अधिकृत तारीख जाहीर झालेली नसली तरी सत्ताधारी आणि विरोधी गटांत अंतर्गत हालचालींना वेग आला आहे. ही सभा केवळ औपचारिकता न राहता सत्तेच्या खऱ्या ताकदीची आणि पुढील पाच वर्षांच्या राजकीय दिशेची पहिली मोठी परीक्षा मानली जात आहे.

सभेतील सर्वाधिक चर्चेचा मुद्दा म्हणजे सात स्वीकृत (नामनिर्देशित) नगरसेवकांची नियुक्ती. सत्ताधारी पक्षाचे पाच तर विरोधी पक्षाचे दोन सदस्य सभागृहात दाखल होणार असल्याने सत्ताधाऱ्यांचे संख्याबळ अधिक भक्कम होणार आहे. मात्र या दोन जागांमुळे विरोधकांनाही प्रभावी मांडणी करण्याची संधी मिळणार आहे.




**निष्कर्ष : केवळ बैठक नव्हे, तर राजकीय शक्तीपरीक्षा**

चार वर्षांच्या प्रशासकीय कारभारानंतर होणारी ही महासभा केवळ औपचारिक बैठक नसून सत्तेच्या समीकरणांची, नेतृत्वाच्या क्षमतेची आणि विकासाच्या दृष्टीकोनाची कसोटी ठरणार आहे. पदनियुक्त्यांमधून कोणाला संधी मिळते, कोणाला डावलले जाते आणि कोणती राजकीय रणनीती आखली जाते, यावर पनवेलच्या पुढील राजकीय आणि विकासात्मक वाटचालीची दिशा ठरणार आहे.

**सभागृह नेतेपदावर कोणाची वर्णी?**

महापौरपदी नितीन पाटील विराजमान झाल्यानंतर आता सभागृह नेतेपदावर कोणाची निवड होते, याबाबत उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. परंपरेनुसार ज्येष्ठ आणि अनुभवी सदस्याला संधी दिली जाते; मात्र यावेळी नव्या पिढीला पुढे करून बदलाचा संदेश देण्याची शक्यता नाकारता येत नाही. सभागृह नेते हे प्रशासन आणि सत्ताधारी गट यांच्यातील दुवा मानले जातात. धोरणात्मक निर्णय, ठरावांची मांडणी, चर्चेचे व्यवस्थापन आणि विरोधकांना उत्तर देणे या सर्व जबाबदाऱ्या त्यांच्या खांद्यावर असतात. त्यामुळे ही निवड केवळ औपचारिक न राहता सत्तेचा खरा चेहरा ठरणार आहे.

**विरोधी पक्षनेतेपदासाठी चुरस**

महापालिकेत विरोधकांची संख्या १८ असली तरी प्रभावी नेतृत्व मिळाल्यास ते सत्ताधाऱ्यांना अडचणीत आणू शकतात. पाणीपुरवठा, रस्ते, आरोग्य सेवा, कचरा व्यवस्थापन, मालमत्ता कर, वाढती लोकसंख्या आणि अनियोजित विकास या मुद्द्यांवर आक्रमक भूमिका घेण्यासाठी विरोधी पक्षनेतेपद अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहे. या पदासाठी अनेक इच्छुक सक्रिय झाल्याची चर्चा आहे. अनुभवी नगरसेवकाला संधी देऊन आक्रमक भूमिका घेतली जाणार की तरुण नेतृत्वाला पुढे करून दीर्घकालीन रणनीती आखली जाणार, हे लवकरच स्पष्ट होईल.

**चार वर्षांनंतरची सभा : नागरिकांच्या अपेक्षा प्रचंड**

कोविड काळ आणि प्रशासकीय कारणांमुळे नियमित सभा होऊ शकल्या नव्हत्या. त्यामुळे चार वर्षांनंतर होत असलेल्या या महासभेकडे नागरिक मोठ्या अपेक्षेने पाहत आहेत. शहरात वाढती वाहतूक कोंडी, पाणीटंचाई, रस्त्यांची दुरवस्था, अनधिकृत बांधकामे आणि कचरा व्यवस्थापनाचे प्रश्न गंभीर बनले आहेत.या प्रश्नांवर ठोस निर्णय घेण्यात अपयश आल्यास सत्ताधाऱ्यांवर लोकक्षोभ वाढण्याची शक्यता आहे. त्याचवेळी विरोधकांसाठीही ही संधी असणार आहे की ते प्रशासनावर प्रभावीपणे दबाव आणू शकतात का, याची चाचणी होईल.

**स्थायी समिती : ‘तिजोरीच्या चाव्या’वरून खळबळ**

महापालिकेच्या आर्थिक कारभाराचे नियंत्रण स्थायी समितीकडे असते. विकासकामांना मंजुरी, कोट्यवधींच्या निविदा, निधीचे वाटप आणि आर्थिक धोरणांची आखणी या सर्व बाबींमध्ये या समितीची भूमिका निर्णायक असते. त्यामुळे स्थायी समितीच्या सभापतीपदाला सर्वाधिक राजकीय महत्त्व आहे. या पदासाठी सत्ताधारी गटात अनेक दावेदार असल्याची चर्चा आहे. अनुभवी आणि आर्थिक बाबींमध्ये पारंगत सदस्याला संधी देऊन स्थैर्य राखले जाईल की नव्या चेहऱ्याला पुढे करून राजकीय संतुलन साधले जाईल, हे महासभेत स्पष्ट होणार आहे.

**महिला व बालकल्याण समिती**

**अपेक्षा आणि वास्तव**

महिला व बालकल्याण समितीच्या सभापतीपदावरूनही चर्चेला उधाण आले आहे. शहरातील महिला व बालकांसाठी राबविण्यात येणाऱ्या योजना, पोषण आहार, आरोग्य तपासणी शिबिरे, शैक्षणिक उपक्रम आणि सामाजिक सक्षमीकरण कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्यासाठी सक्षम नेतृत्वाची गरज आहे.

या जागांसाठी पक्षांतर्गत इच्छुकांची संख्या मोठी असल्याने लॉबिंग, गटबाजी आणि पक्षश्रेष्ठींपर्यंत संपर्क साधण्याच्या हालचालींना वेग आला आहे. प्रतिनिधींना संधी देऊन संतुलन साधले जाणार की पूर्णपणे राजकीय निष्ठेला प्राधान्य दिले जाणार, याकडेही लक्ष लागले आहे.

## चौल रस्त्यातील मोरी बांधकामास विलंब

**वाहतूक कोंडीच्या समस्याने प्रवासीवर्ग हैराण**

**| रेवदंडा | प्रतिनिधी |**

एक महिना उलटला तरी अदयापी चौल मुखरी मंदिर समोरील मुख्यः रस्तातील नूतन मोरी बांधकामाचे पूर्तता न होता मोरी बांधकाम कामास विलंब होत आहे, परिणामी येथून वाहतूक कोंडी समस्येला सामोरे जावे लागते.

चौल येथून मिनिटागणीत वाहतुकीची रेलचेल असते, अलिबाग-रेवदंडा मुख्यः रस्ताचे नव्याने नूतनीकरणाचे काम सुरू आहे. या कामासाठी चौल मध्ये मुखरी गणपती मंदिर नजीक




असलेली मोरी सुध्दा नव्याने बांधण्यात येत आहे. परंतु हे मोरी बांधकाम एक महिना उलटून गेला तरी संबधीत ठेकेदारांनी या कामाची अद्यापी पूर्तता केली नाही आहे. परिणामी या बांधकामास फारच विलंब होत असल्याने प्रवासीवर्ग संप्तत प्रतिक्रिया व्यक्त करत आहेत.

चौल मुखरी गणपती नजीकच्या मोरी बांधकाम संबधीत ठेकेदाराने महिना उलटून गेला तरी पूर्ण न केल्याने प्रवासीवर्ग तसेच वाहन चालक यांनी संप्तत पतिक्रिया व्यक्त करत आहेत. या नूतन मोरी बांधकामाची पूर्तता केव्हा होईल व येथून होत असलेली वाहतूक कोंडी केव्हा संपेल असा प्रश्न प्रवासीवर्ग व वाहन चालक विचारीत आहेत.

मुख्य रस्ताला असलेले नुतन मोरी बांधकाम तत्परतेने पूर्तता होणे गरजेचे आहे. मात्र संबधित ठेकेदार कामास गती देत नसल्याचा आरोप केला जात असून संबधीत खात्याने ठेकेदारास समज द्यावी, अन्यथा ठेकेदार बदलून काम पूर्ण करावे, अशी मागणी होत आहे.

## श्री वडोबा मंदिराचा जीर्णोद्धार



**| रसायनी | प्रतिनिधी |**

खालापूर येथील पोलीस ठाणे, तहसील कार्यालय यांच्या आवारातील श्री वडोबा देवस्थान, श्री दत्त, श्री विठ्ठल रखुमाई मंदिराचा जीर्णोद्धार प्राणप्रतिष्ठा सोहळा खालापूर ग्रामस्थ व खालापुर पोलीस यांच्या सहकार्याने उत्साहात संपन्न झाला.

श्री बडोबा देवस्थान हे खूप जुने मंदिर असून ऐतिहासिक असावे असे ग्रामस्थ सांगत आहेत. श्री बडोबा देवस्थान पाषाणरुपी आहे. पूर्वी खालापूर तालुक्यात बंदोबस्त साठी आलेले पोलीस याठिकाणी थांबायचे, तहसील कार्यालय, पोलीस ठाण्यात, भूमी अभिलेख कार्यालयात किंवा येथील तलाठी कार्यालयात आलेले नागरिक थांबत असत. मंदिर असे जीर्ण झाल्याने ग्रामस्थ यांनी खालापूर पोलिसांच्या सहकार्य घेऊन मंदिर जीर्णोद्धार करण्याचा प्रारंभ केला. तत्कालीन पोलीस यांचे व आजचे पोलीस यांचे हे श्रद्धास्थान आहे. यात नव्याने विठ्ठल रुक्मिणी व दत्त मूर्तीचे यांची नव्याने प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. या सोहळ्यानिमित्त मंदिराच्या प्रांगणात दोन दिवस विविध धार्मिक कार्यक्रम झाले. ग्रामस्थांच्या लोकवर्गणीतून खालापूर पोलिसांच्या सहकार्यातून येथील श्री वडोबा मंदिराचा कायापालट करण्यात आला. मंदिराच्या कलशावर विद्युत रोषणाई करण्यात आली होती. मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचे औचित्य साधून दोन दिवस भजन सोहळा व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. मूर्तीची अभिषेक व पूजा करण्यात आली. यज्ञ कुंड होऊन होम हवन करण्यात आले. गावातून मूर्तीची मिरवणूक व शोभायात्रा काढण्यात आली. शोभायात्रेत गावातील महिला भगिनी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी खालापूर पोलीस स्टेशनचे अधिकारी व पोलिस तसेच गावातील ग्रामस्थ, भजनी मंडळ यांनी परिश्रम घेतले.

## कळंबोलीकर ८ दिवस पाण्याविना

**पनवेल :** कळंबोली येथील केएल४, सेक्टर ४ई (प्रभाग ८) परिसरात मागील आठ दिवसांपासून पाणीपुरवठा बंद असल्याने नागरिकांना तीव्र पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे. वारंवार तक्रारी करूनही ठोस उपाययोजना न झाल्याने संतप्त नागरिकांनी आज स्त्री शक्ती फाउंडेशनच्या नेतृत्वाखाली सिडको कार्यालयावर धडक मोर्चा काढला. संस्थापिका अध्यक्षा विजया कदम यांनी पाणीपुरवठा अभियंता प्रफुल देवरे यांना जाब विचारत तात्काळ पाणी सुरू न झाल्यास ठिय्या आंदोलनाचा इशारा दिला.

## सुखद राणे यांनी जागविला शिवरायांच्या शौर्याचा इतिहास

**| तळे | प्रतिनिधी |**

छत्रपतींच्या पराक्रमाची गाथा आणि स्वराज्याच्या संकल्पनेचा जागर घुमणारा जयघोष अशा उत्साहपूर्ण वातावरणात जीएमव्हीआयटी महाविद्यालयात शिवजयंती मोठ्या दिमाखात व उत्साहात साजरी करण्यात आली.

ह्या कार्यक्रमाच्या निमित्ताने प्रमुख वक्ते म्हणून रायगड भूषण सुखद राणे विशेष उपस्थिती लाभली. सुखद राणे गडकिल्ले संवर्धन आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या इतिहास यामध्ये विशेष योगदान आहे. या कार्यक्रमास रायगड भूषण पुरुषोत्तम मुळे देखील आवर्जून उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख पाहुण्यांच्या शुभहस्ते महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून व दीपप्रज्वलनाने झाली.

महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य संजय गवळी यांनी सर्वप्रथम सर्वांना संबोधित केले आणि शिवजयंतीचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून सांगितले. प्राध्यापकवृंद आणि विद्यार्थ्यांनी एकमुखाने ‘जय भवानी, जय शिवाजी’चा जयघोष करत वातावरण भारावून टाकले.

यावेळी विद्यार्थ्यांनी शिवचरित्रावर आधारित भाषणे, पोवाडे, नाट्यप्रयोग आणि लेझीम सादर केली. प्रमुख वक्ते सुखद राणे यांनी महाराजांच्या बालपणापासून ते स्वराज्य स्थापनेपर्यंतचा प्रेरणादायी प्रवास प्रभावीपणे मांडला आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या ज्वलंत इतिहास विद्यार्थ्यांच्या मनात उतरवून सर्वांना अगदी मंत्रमुग्ध केले.

विशेष म्हणजे, सुखद राणे यांनी संकलित केलेल्या अनेक गडकिल्ल्यांच्या प्रदर्शनाने उपस्थितांची मने जिंकली. मुळे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, ‘शिवाजी महाराजांचे जीवन म्हणजे नेतृत्व, धैर्य आणि व्यवस्थापन कौशल्याचा आदर्श आहे.

विद्यार्थ्यांनी त्यांच्या कार्यातून प्रेरणाघेऊनसमाजसेवावराष्ट्रनिर्मितीत योगदान द्यावे. कार्यक्रमाच्या शेवटी देशभक्तीपर गीतांनी वातावरण भारावले. विद्यार्थ्यांमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळाला.

## अवैध दारूसह वाहन जप्त

**| खोपोली | प्रतिनिधी |**

अवैध दारूची टायर ट्यूबमधून होत असलेली तस्करी उघड करत स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाच्या पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. ट्यूबमध्ये चलाखीने दारू भरून चारचाकी वाहनातून वाहतूक केली जात असताना पोलिसांनी सापळा रचून आरोपीला जेरबंद केले.

कुंभीवली येथे एका संशयित वाहन अडवून झडती घेण्यात आली असता टायर ट्यूबमध्ये मोठ्या प्रमाणात अवैध दारू साठवून वाहतूक केली जात असल्याचे उघड झाले.या कारवाईत ट्यूबमध्ये भरलेली २४,००० रुपये किमतीची २४० लिटर गावठी हातभट्टीची तयार दारू तसेच ९५,००० रूपये किमतीची टाटा कंपनीची इंडिका डीलक्स वाहन असे एकूण १,१९,००० रुपये किमतीचा असा संपूर्ण मुद्देमाल जप्त करण्यात आला असून आरोपी दिनेश नारायण नरे यास ताब्यात घेऊन खालापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यापुढील अधिक तपास खालापूर पोलीस करीत आहेत.

या मोहिमेत स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाचे पोलीस उपनिरीक्षक प्रसाद पाटील,सहाय्यक फौजदार संदीप पाटील, पोलीस हवालदार शरद फरांदे, रणजीत सिंह खराडे, पोलीस शिपाई प्रदीप खरात या पथकाने सक्रिय सहभाग घेतला.

## खारगल्ली-साईनगरमध्ये नेत्र तपासणी शिबीर

**| रेवदंडा | प्रतिनिधी |**

मानव सेवा हीच खरी ईश्वर सेवा या सेवा भावनेतून अलिबाग-रेवदंडा मुख्य रस्तालगत खारगल्ली-साईनगर धोबनतळयाचे समोरील प्रशांती निवासमध्ये सलग चौथ्यांदा मासिक विनामूल्य चष्मे वाटप व नेत्र तपासणी शिबीर सोमवार २३ फेब्रुवारी रोजी संपन्न झाले.

श्री सत्य साई सेवक सुरेश मेहरे निवासस्थानी प्रशांती निवास मध्ये श्री साई नेत्रालय या ओ. पि.डी.युनिटच्या माध्यमातून मोफत नेत्र संबधीत सर्व उपचार, तसेच मोती बिंदू/काच बिंदूचे मोफत ऑपरेशन सुध्दा कसलेही शुल्क न आकारता प्रत्येक महिन्यातील २३



तारखेला करण्यात येत आहे. या नेत्र तपासणी शिबिराचा लाभ सकाळी नउ ते दुपारी दोन वाजेपर्यंत मोठया संख्येने गरजूनी घेतला. यावेळी एकूण ४० जणांना मोफत चष्मे वाटप करण्यात आले.

या नेत्र तपासणी शिबिरास सुरेश मेहरे यांचे प्रमुख उपस्थितीसह पुणे येथील सतिश कोटा, तसेच स्थानिक शिवराम पटेल, नरेश पटेल, सुरेश खडपे, प्रकाश पाटील, देवानंद हाले, विकास हाले, अनिल चौलकर, अर्चना पारखी, जागृती हाले, तसेच डॉ. हेत मामानिया एम.एस.ऑप्टोनी निलेश म्हात्रे, लॅब दिपेश पाटील, सिस्टर श्रध्दा म्हात्रे, वाहन चालक किरण नरनन आदींने विशेष परिश्रम घेतले.

खारगल्ली साईनगर प्रशांती निवास येथील श्री साई नेत्रालयाचे वतीने ओ.पि.डी. युनिट व्दारे प्रत्येक महिन्याचा २३ तारखेला नेत्र तपासणी संबधीत सर्व उपचार, तसेच मोती बिंदू, काच बिंदूचे मोफत ऑपरेशन सुध्दा कसलेही शुल्क न आकारता तसेच अल्पदरात चष्मे वाटप करण्यात येतात. मात्र यासाठी आधार कार्ड, रेशन कार्ड झेरॉक्स प्रत आवश्यक आहे, अशी माहिती सुरेश मेहरे यांनी दिली. तसेच गरजूनी अधिक माहितीसाठी ९८५०२१७६४८,७०२०७७२७६४, ७७४१०९३०५९, ९०७५५२३५३७ या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन सत्यसाई सेवक सुरेश मेहरे यांनी कळविले आहे.

**पशुपालकांसाठी गुड न्यूज | राज्य सरकारचा मोठा निर्णय**

# खेळत्या भांडवलावरील व्याजात सवलत

**| पाली | प्रतिनिधी |**

महाराष्ट्राची अर्थव्यवस्था १ ट्रिलियन डॉलरपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून राज्य सरकारने पशुसंवर्धन क्षेत्राला मोठा बुस्टर डोस दिला आहे. पशुपालन व्यवसायाला कृषी समकक्ष दर्जा मिळाल्यानंतर आता किसान क्रेडिट कार्डधारक पशुपालकांना त्यांनी घेतलेल्या अल्पमुदती कर्जाच्या व्याजदरात ४ टक्के सवलत देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय पशुसंवर्धन विभागाने घेतला आहे.

निती आयोगाच्या शिफारशीनुसार आणि महाराष्ट्र आर्थिक सल्लागार परिषदेच्या आराखड्यानुसार, कृषी व संलग्न क्षेत्रातील उत्पन्न वाढवण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.

> “पशुपालनाला कृषी समकक्ष दर्जा मिळाल्याने आणि व्याजात ४% सवलत लागू झाल्याने पशुपालकांचा आर्थिक भार कमी होईल. यामुळे पशुपालकांमध्ये स्पर्धात्मक वातावरण निर्माण होऊन आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढेल आणि पर्यायाने जिल्ह्याच्या उत्पादनात मोठी भर पडेल. जिल्ह्यातील जास्तीत जास्त पशुपालकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा.”
>
> -डॉ. सचिन देशपांडे, जिल्हा उपायुक्त, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, रायगड

> “या योजनेचा लाभ १२ फेब्रुवारी २०२६ पासून घेतलेल्या कर्जांना लागू होणार आहे. राष्ट्रीयकृत बँका, खासगी, ग्रामीण आणि सहकारी बँकांमार्फत घेतलेल्या कर्जावर ही सवलत मिळेल. योजनेच्या अंमलबजावणीत येणाऱ्या अडचणी सोडवण्यासाठी जिल्हा उपनिबंधकांशी समन्वय साधून उपायुक्त (पशुसंवर्धन) हे समन्वयक म्हणून काम पाहणार आहेत.”
>
> -डॉ. अजय वंदना बाळू कांबळे, सहायक आयुक्त,अलिबाग रायगड.



**योजनेचा लाभ ठराविक मर्यादेतील पशुधनासाठी मिळेल**

- **कुक्कुटपालन:** २५ हजार मांसल किंवा ५० हजार अंडी देणारे पक्षी.
- **दुधाळ जनावरे:** १०० किंवा त्यापेक्षा कमी जनावरांचा गोठा.
- **शेळी-मेंढी:** ५०० किंवा त्यापेक्षा कमी संख्या.
- **वराह:** २०० किंवा त्यापेक्षा कमी.
- **परतफेड:** घेतलेल्या कर्जाची परतफेड १ वर्षाच्या आत करणे आवश्यक आहे.

**कोण ठरणार पात्र? (महत्त्वाचे निकष)**

- या योजनेचा लाभ घेण्यासाठी शासनाने काही ठराविक अटी निश्चित केल्या आहेत:
- अनुदान मुक्त: लाभार्थ्याने केंद्र, राज्य किंवा जिल्हा परिषदेच्या कोणत्याही इतर अनुदान योजनेचा लाभ घेतलेला नसावा.
- नोंदणी: सर्व पशुधनाची भारत पशुधन पोर्टलवर नोंदणी असणे अनिवार्य आहे.

## अवघ्या आठ तासात चोरीस गेलेला डंपर हस्तगत

**| पनवेल | प्रतिनिधी |**

पनवेल शहर परिसरातून चोरीस गेलेलं टाटा कंपनींचा टिपर ट्रक(डंपर) अवघ्या आठ तासात पनवेल शहर पोलिसांनी डम्पर चोरणाऱ्या आरोपीसह हस्तगत केला आहे.

भास्कर घाडगे यांचा ५०,००,००० रुपये किमतीचा डंपर हा करंजाडे सेक्टर २ परिसरातून मध्यरात्री चोरीस गेला होता. वाहनाच्या जीपीएस लोकेशनवरून तपास करत असताना वाहन पालघर, गुजरात दिशेला जात असल्याची माहिती प्राप्त झाली. त्याप्रमाणे वपोनि नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली जीपीएस नुसार वाहनाचा पाठलाग करण्यासाठी पथक रवाना करण्यात आले होते.

सदर वाहन हे महाराष्ट्र हद्द सोडून गुजरात राज्य हद्दीत गेल्याचे समजल्याने त्यास ताब्यात घेण्यासाठी पालघर व वलसाड सोबत संपर्क साधले होते. तरी वाहन गुजरात राज्यातील पारदी पोलीस ठाणे हद्दीत असल्याची माहिती मिळाली तरी सदर वाहन व आरोपी हरियाणा जायचे आधीच वाहन व आरोपीसह ताब्यात घेतले आहे.

या प्रकरणी आरोपी मुरसलिम मकसूद खान याची सखोल चौकशी सुरु असून त्यांनी या पूर्वीसुद्धा अश्याच प्रकारचे डंपर चोरी केली आहे का याचा तपास पोलीस उपनिरीक्षक विनोद लबडे करीत आहेत.

# ... आता राजकीय रहस्य

अजित पवार यांच्या अपघाती मृत्यूला लवकरच महिना पूर्ण होईल. पण त्याचे गूढ वाढतच चालले आहे. हा अपघात नसून घातपात आहे अशी भूमिका शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे नेते रोहित पवार गेले काही दिवस सातत्याने मांडत आहेत. शनिवारी त्यांनी दिल्लीत पत्रकार परिषद घेऊन विमान कंपनीवर नव्याने तोफ डागली व हवाई वाहतूकमंत्री पाठीशी घालत असल्याचा आरोप केला. राममोहन नायडू हे सध्या हवाई वाहतूक खाते सांभाळतात. ते तेलुगू देसम पक्षाचे आहेत. त्यांचा या प्रकरणात राजीनामा घ्यावा असे रोहित यांनी म्हटले आहे. नरेंद्र मोदी व अमित शाह यांना त्यांनी याबाबत थेट आवाहन केले आहे. अर्थात, एकीकडे ते करतानाच त्यांनी राहुल गांधी यांनी या प्रकरणात लक्ष घालावे असेही म्हटले आहे. मध्यंतरी रोहित यांनी दिल्लीत येऊन शाह तसेच इतर काही नेते व उच्चपदस्थांची भेट घेण्याचा प्रयत्न केला होता. पण त्यांना भेट मिळू शकली नव्हती. रोहित पवार हे पवारांच्या कुटुंबातले आहेत. शिवाय स्वतः आमदार आहेत. गेले काही दिवस ते सातत्याने बोलत आहेत. विशेष म्हणजे अपघात झाल्यानंतर तो घातपात आहे की काय अशी शंका तेव्हा सर्वसामान्य लोकांनी व्यक्त केली होती. तिला राष्ट्रीय स्तरावर वाचा फोडली होती ती ममता बॅनर्जी यांनी. अजित पवार हे लवकरच एनडीएममधून बाहेर पडण्याचा विचार करीत होते असे आम्हाला कळले होते. त्यामुळे हा अपघात नसून त्यामागे काही कारस्थान असावे अशी शंका ममतादीदींनी बोलून दाखवली होती. त्यावेळी अजितदादांच्या धक्कादायक मृत्यूच्या शोकामध्ये असतानाही शरद पवार यांनी पत्रकारांपुढे येऊन निवेदन केले होते व ही घटना म्हणजे अपघातच होता असा निर्वाळा दिला होता. कोलकात्याहून आलेल्या बातम्यांचा विशेष उल्लेख करून या घटनेचे कोणी राजकारण करू नये असा इशारा पवार यांनी दिला होता. आता मात्र त्यांच्याच पक्षाचे आणि त्यांच्याच घरातले नेते उघडपणे अपघात नव्हे घातपात ही भूमिका लावून धरत आहेत. विशेष म्हणजे रोहित यांची कालची पत्रकार परिषद ही शरद पवार यांच्या दिल्लीतील निवासस्थानी झाली याची नोंद करायला हवी.

## ब्लॅकबॉक्स जळला

रोहित यांनी आजवर बरेच तर्क, शंका इत्यादी व्यक्त केल्या आहेत. त्यांचा सर्व रोख हे विमान ज्यांच्या मालकीचे होते त्या दिल्लीतील व्हीएसआर कंपनीवर आहे. या कंपनीचे मालक आणि राजकीय मंडळींचे संबंध असल्याचे रोहित सूचित करतात. यात अजितदादांच्या राष्ट्रवादीच्या काही वरिष्ठ नेत्यांकडेही त्यांचे बोट असावे असे दिसते. कोणत्याही अपघातात विमानातील ब्लॅकबॉक्स हा महत्वाचा दुवा असतो. पण अजितदादांच्या विमानाच्या ब्लॅकबॉक्सचे आगीमध्ये नुकसान झाल्याचे एअरक्राफ्ट एक्सिडेंट इन्व्हेस्टिगेशन ब्यूरो या अधिकृत तपास यंत्रणेनेच सांगितल्याने सर्वांच्याच भुवया वर गेल्या. विमानामध्ये डिजिटल फ्लाईट डेटा रेकॉर्डर व कॉकपीट व्हॉईस रेकॉर्डर अशी दोन उपकरणे असतात. सामान्यतः यांनाच ब्लॅकबॉक्स असे संबोधले जाते. ही उपकरणे अत्यंत सुरक्षित अशा पेट्यांमध्ये व विमानाच्या शेपटाकडच्या भागात ठेवलेली असतात. विमान कोसळल्यानंतर अनेकदा आग लागते व पेट्रोल टाकीमुळे स्फोट होतो. त्यातून प्रचंड उष्णता निर्माण होते. पण त्या उष्णतेतही न वितळता शाबूत राहतील अशी या ब्लॅक बॉक्सच्या पेट्यांची रचना असते. पण आश्चर्याची गोष्ट अशी की दादांच्या विमानातील कॉकपीट व्हॉईस रेकॉर्डर जळला आहे. वैमानिक जिथे बसतात त्याला कॉकपीट म्हणतात. त्या कॉकपिटमधील सर्व संभाषणे व बारीकसारीक आवाज या रेकॉर्डरमध्ये नोंदले जात असतात. अपघात झालाच तर शेवटच्या क्षणी वैमानिकांमध्ये काय संवाद झाले, त्यांनी कोणती बटने किंवा गिअर वापरण्याचा प्रयत्न केला इत्यादीची माहिती त्यातून मिळू शकते. पण प्राथमिक माहितीनुसार आता दादांच्या विमानाला शेवटच्या क्षणी नेमके काय झाले व त्यावेळी वैमानिक काय बोलले इत्यादी माहिती कदाचित आपल्यासमोर कधीच येणार नाही. हा रेकॉर्डर ज्या कंपनीने बनवला आहे त्या प्रसिध्द हनीवेल कंपनीच्या तज्ज्ञाना यासाठी पाचारण करम्यात आले आहे व तो रेकॉर्डर दुरुस्त करून त्यातील माहिती मिळवता येते का याचा प्रयत्न केला जाणार आहे.

## तेलूगू देसमवर बाण

दुसरा जो डिजिटल रेकॉर्डर असतो तो विमानाचा वेग, उंची, हेलकावे, तसेच त्यांच्यातील बदल इत्यादी टिपत असतो. त्याचेही थोडेफार नुकसान झाल्याच्या बातम्या होत्या. पण आता त्यातील डेटा मिळवण्यात यश आले आहे. त्यामुळे निदान ती माहिती उपलब्ध होणार आहे. पण एकूण या ब्लॅक बॉक्स जळण्याच्या प्रकाराबद्दल या क्षेत्रातील जाणकारांनी आश्चर्य व्यक्त केले आहे. विशेष म्हणजे, दादांच्या विमानाच्या शेपटाकडचा भाग तुलनेने सुस्थितीत होता. तो जळला नव्हता. त्याचे फोटोही उपलब्ध आहेत. असे असताना तिथे ठेवलेला ब्लॅक बॉक्स जळू कसा शकेल अशी शंका त्यांनी नोंदवली आहे. अर्थात, तपास यंत्रणांना आपला पहिला अहवाल तीस दिवसांच्या आत सादर करणे आवश्यक आहे. त्या अहवालातून खरे काय ते कळेलच. याखेरीज विमान व तिची मालक कंपनी यांच्या अनुषंगाने अनेक संशय रोहित यांनी आतापर्यंत उपस्थित केले आहेत. या कंपनीचे मालक व्हीके सिंग यांचे बऱ्याच राजकीय नेत्यांशी संबंध आहेत. त्यांचा मुलगा रोहित सिंग हा अपघात झाल्यानंतर अमेरिकेत निघून गेला असून त्याला चौकशीसाठी रोखून का धरण्यात आले नाही असा सवाल रोहित यांनी विचारला आहे. या कंपनीच्या मालकाकडे तपास यंत्रणांचे अधिकारी अजूनही गेलेले नाहीत. विमान उडत असताना पेट्रोलची टाकी तर भरलेली होतीच, याखेरीज खुद्द विमानातही पर्यायी इंधनाच्या दोन टाक्या भरलेल्या अवस्थेत होत्या. त्यामुळेच प्रचंड स्फोट झाला असावा असा संशय आहे. या टाक्यांना का व कोणी परवानगी दिली, विमानाच्या उड्डाणाबाबतच्या नोंदी नीट ठेवल्या होत्या का असे अनेक सवाल रोहित यांनी विचारले आहेत. या विमानाच्या वैमानिकाचा वापर करून हे विमान मुद्दाम कोसळवण्यात आले की काय अशीही त्यांची शंका आहे. अर्थातच हे केवळ रोहित यांच्या मनातलेच नव्हे तर पूर्ण मराठी जनतेच्या मनातले प्रश्न आहेत. त्यामुळे त्यांची खुलासेवार उत्तरे मिळणे गरजेचे आहे. मात्र या सगळ्यात हा अपघात मुद्दाम घडवण्यामागे कोणाचे काय हेतू असू शकतात हे रोहित पवार यांनी अजून सूचित केलेले नाही. ते मोठेच गूढ आहे. ते कायम असतानाच आता रोहित यांनी हा विषय चंद्राबाबू नायडू यांच्या तेलुगू देसम पक्षाच्या विरोधात वळवला आहे. केंद्रातील मोदींचे सरकार चंद्राबाबू व नीतीश यांच्या पाठिंब्यावर अवलंबून आहे. दुसरीकडे शरद पवार गट अजित पवार गटात विलीन होऊन एनडीएमध्ये जाण्यास उत्सुक असल्याचे चित्र आहे. त्याच्या चर्चांना सध्या ब्रेक लागला असला तरी त्या थांबलेल्या नाहीत. त्याचवेळी नेमका तेलुगू देसमच्या रोखाने बाण सोडला जाणे हे अपघाताच्या रहस्यात आणखी भर टाकणारे आहे.


---

**विचार**

# बलुचिस्तानममधील बंडाची धुमसती आग

*बंडखोरांनी बलुचिस्तान प्रांताला हादरवून टाकले आहे. तथापि, यामुळे अस्वस्थ झालेल्या पाकिस्तानने प्रतिहल्ला सुरू केला. त्यात आतापर्यंत दोनशेजणांचा बळी गेला आहे. पाकिस्तानचे निर्माते मोहम्मद अली जिना यांनी भारताची केली, तशीच बलुचिस्तानचीही फसवणूक केली आहे. फसवणूक झालेली बलुचिस्तानमधील जनता पाकिस्तानला कायम शत्रू समजत असून, तिथे गेली आठ दशके संघर्षाची आग धुमसत आहे.*





**- प्रा. जयसिंग यादव**

बलुचिस्तानमध्ये नुकत्याच झालेल्या हल्ल्यानंतर ४० तास चाललेल्या प्रत्युत्तर कारवाईत पाकिस्तानी सुरक्षा दलांनी दोनशे जणांना ठार मारले. यामध्ये ३१ नागरिक, १७ सुरक्षा कर्मचारी आणि 'बलुचिस्तान लिबरेशन आर्मी (बीएलए)'च्या १४५ लढवय्यांचा समावेश आहे. बलुचिस्तानचे मुख्यमंत्री सरफराज बुगती यांनी राजधानी क्वेटा येथे पत्रकार परिषदेत सांगितले, की दहशतवादाविरुद्धच्या युद्धात हा पाकिस्तानचा आतापर्यंतचा सर्वाधिक बळींचा आकडा आहे. बलुची लोक 'बीएलए' लढाऊंना रसद पुरवत आहेत. व्हायरल व्हिडीओने पाकिस्तान सरकारचे दावे उघड केले. यापूर्वी क्वेटा, ग्वादर, मुस्टुंग आणि नोशकी अशा अनेक जिल्ह्यांमध्ये एकाच वेळी बलुच हल्ले झाले होते. 'बलुच लिबरेशन आर्मी' (बीएलए)ने हल्ल्यांची जबाबदारी स्वीकारली. त्यामुळे सैन्य, पोलिस आणि दहशतवादविरोधी युनिट्सनी मोठ्या प्रमाणात ऑपरेशन सुरू केले. या हल्ल्यानंतर पाकिस्तानी सैन्याने कोणताही पुरावा न देता लगेचच हे हल्ले भारतपुरस्कृत आहेत, असा आरोप केला होता. पाकिस्तानचे संरक्षण मंत्री ख्वाजा आसिफ यांनी या दाव्याचा पुनरुच्चार केला आणि म्हटले, की हल्लेखोरांचे भारताशी संबंध आहेत. भारताने पाकिस्तानचे निराधार आरोप फेटाळून लावले आहेत. परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल म्हणाले, हे दावे केवळ पाकिस्तानच्या अंतर्गत अपयशांवरून लक्ष विचलित करण्यासाठी करण्यात आले असून पाकिस्तानची ही जुनी युक्ती आहे. प्रत्येक हिंसक घटनेनंतर निराधार आरोप करण्याऐवजी, पाकिस्तानने या प्रदेशातील आपल्या लोकांच्या दीर्घकालीन मागण्यांकडे लक्ष केंद्रित करावे. एकंदरीत, मात्र या सर्व घडामोडींनंतरही बलूचिस्तानमधील अस्वस्थता कमी झालेली नाही.

दडपशाही, क्रूरता आणि मानवी हक्कांचे उल्लंघन करण्याची पाकिस्तानची परंपरा सर्वज्ञात आहे. 'बीएलए'ने म्हटले आहे, की सुरक्षा कर्मचाऱ्यांना लक्ष्य करून 'ऑपरेशन हारोफ'चा दुसरा टप्पा सुरू केला गेला आहे. लष्कराने दोन वेगवेगळ्या कारवायांमध्ये ४१ बंडखोरांना ठार मारल्याचा दावा केल्यानंतर एका दिवसात ही घोषणा करण्यात आली. त्यांच्या सैनिकांनी नोश्की येथील 'काउंटर टेररिझम डिपार्टमेंट' (सीटीडी) मुख्यालय ताब्यात घेतले आणि 'फ्रंटियर कॉर्प्स युनिट' उद्ध्वस्त केले. त्यात अनेक पाकिस्तानी सैनिकांचा मृत्यू झाला. इतरत्र बंडखोरांनी जिल्हा तुरुंगातून किमान तीस कैद्यांना मुक्त करुन शस्त्रे आणि दारूगोळा जप्त केला. सुरक्षा दलांनी जवळजवळ एक डझन ठिकाणे सील केली. २४ तासांहून अधिक काळ संपूर्ण प्रांतात मोबाईल इंटरनेट सेवा खंडित करण्यात आली होती. रस्ते वाहतूक विस्कळीत झाली आणि रेल्वे सेवा निलंबित करण्यात आली. सामान्यतः गजबजलेले क्वेटा शहर स्फोटांनंतर जवळजवळ निर्जन बनले. मुख्य रस्ते आणि बाजारपेठा बंद होत्या आणि लोक भीतीच्या वातावरणात घरातच होते.

१९४७ मध्ये मोहम्मद अली जिना यांनी मीर अहमद खान यांच्यासह बलुचिस्तानला स्वतंत्र देश म्हणून स्थापित करण्यासाठी प्रयत्नांचे नेतृत्व केले. १२ ऑगस्ट १९४७ रोजी बलुचिस्तानला स्वतंत्र म्हणून घोषित केले; परंतु सुरक्षा पाकिस्तानकडे सोपवण्यात आली. मार्च १९४८ मध्ये पाकिस्तानने बलुचिस्तानला आपल्यात विलीन केले. त्यामुळे तेथील लोक संतप्त झाले. भारताचे दोन भागात विभाजन करण्यासाठी जिनांनी आपले जीवन समर्पित केले. एके काळी महात्मा गांधी यांचे अनुयायी असलेले जिना १९०६ ते १९२० पर्यंत हिंदू-मुस्लिम ऐक्याचे समर्थक होते. १९२० मध्ये काँग्रेसच्या नागपूर अधिवेशनानंतर ते काँग्रेसपासून वेगळे झाले आणि मुस्लिम लीगशी पूर्णपणे जुळवून घेतले. येथेच जिना भारताचे दोन भागात विभाजन करण्याच्या वेडेपणात अडकले. बलुचिस्तानदेखील याला बळी पडला. दुसऱ्या महायुद्धानंतर, ब्रिटिश आर्थिकदृष्ट्या उद्ध्वस्त झाले. आपण आता भारतावर राज्य करू शकत नाहीत, हे त्यांच्या लक्षात आले. संपूर्ण भारतात स्वातंत्र्यासाठी बंड सुरू झाले. त्यानंतर ब्रिटिशांनी भारत सोडण्याचा निर्णय घेतला. जिना मुस्लिमांसाठी वेगळ्या देशाच्या मागणीवर ठाम होते. त्याच वेळी कलात प्रांतामध्ये, नंतर बलुचिस्तानमध्येही वेगळ्या देशाच्या स्वातंत्र्याची मागणी तीव्र झाली. १९४६ मध्ये ब्रिटिशांनी भारत सोडत असल्याचा निर्णय घेतला तेव्हा कलातचे खान मीर अहमद खान यांनी जिना यांना ब्रिटिशांसमोर आपला खटला सादर करण्यासाठी सरकारी वकील म्हणून नियुक्त केले. त्यांना विश्वास होता, की मुस्लिम मातृभूमीची मागणी करणारे जिना ब्रिटिशांसमोर त्यांची मागणी चांगल्या प्रकारे मांडू शकतील.

४ ऑगस्ट १९४७ रोजी दिल्लीमध्ये बलुचिस्तान नावाचा नवीन देश स्थापन करण्यासाठी एक बैठक बोलावण्यात आली. मीर अहमद खान यांच्यासह जिना आणि जवाहरलाल नेहरूदेखील या बैठकीला उपस्थित होते. बैठकीत जिना यांनी कलातच्या स्वातंत्र्याची बाजू मांडली. ब्रिटिश व्हाईसरॉय लॉर्ड माउंटबॅटन यांनीही कलातला भारत किंवा पाकिस्तानचा भाग बनण्याची आवश्यकता नाही, हे मान्य केले. स्वतंत्र बलुचिस्तान तयार करण्यासाठी कलात, खारान, लास बेला आणि मकरन हे चार जिल्हे विलीन करण्याचा सल्ला जिना यांनी दिला होता. ११ ऑगस्ट १९४७ रोजी कलातचे प्रतिनिधी आणि मुस्लिम लीग यांच्यात बलुचिस्तान हा स्वतंत्र देश म्हणून स्थापित करण्याचा करार झाला. तथापि, बलुचिस्तानची सुरक्षा पाकिस्तानकडे सोपवण्यात आली. शेवटी, १२ ऑगस्ट रोजी कलातच्या खानने बलुचिस्तानला स्वतंत्र देश घोषित केले. बलुचिस्तानमधील एका मशिदीतून कलातचा पारंपारिक ध्वज फडकवण्यात आला; परंतु स्वातंत्र्य घोषित झाल्याच्या एक महिन्यानंतर १२ सप्टेंबर रोजी ब्रिटनने बलुचिस्तान वेगळा देश बनण्याच्या स्थितीत नाही आणि आंतरराष्ट्रीय जबाबदाऱ्या स्वीकारू शकत नाही, असा ठराव मंजूर केला. 'बलूच नॅशनॅलिझम' या पुस्तकात खान मोहम्मद जिना आणि खान यांच्यातील भेटीचे वर्णन करताना म्हटले आहे, की बैठकीत जिना यांनी खान यांना बलुचिस्तान पाकिस्तानमध्ये विलीन करण्याचा आग्रह केला. मात्र, बलुचिस्तान अनेक जमातींमध्ये विभागला असल्यामुळे आपण एकट्याने हा निर्णय घेऊ शकत नाही आणि बलुचिस्तान स्वतंत्र देश राहावा की पाकिस्तानात सामील व्हावा हा स्थानिकांचा निर्णय असेल, असे त्यांनी म्हटले.

वचन दिल्याप्रमाणे खान बलुचिस्तानला गेले आणि विधानसभेची बैठक बोलावली. त्यात पाकिस्तानात विलीन होण्यास विरोध होता. पाकिस्तानकडून दबाव वाढू लागला. परिस्थिती समजून घेत खान यांनी 'कमांडर-इन-चीफ' ब्रिगेडियर जनरल परवेझ यांना सैन्याची जमवाजमव करण्याचे आणि शस्त्रास्त्रे आणि दारूगोळा व्यवस्था करण्याचे आदेश दिले. जनरल परवेझ डिसेंबर १९४७ मध्ये शस्त्रे मिळवण्यासाठी लंडनला आले. ब्रिटिश सरकारने सांगितले, की पाकिस्तानच्या परवानगीशिवाय त्यांना कोणतीही लष्करी मदत मिळणार नाही. १८ मार्च १९४८ रोजी जिना यांनी खारान, लास बेला आणि मकरन वेगळे करण्याची घोषणा केली. दुष्का एच. सय्यद यांनी त्यांच्या 'द ॲक्सेक्शन ऑफ कलात: मिथ अँड रिॲलिटी' या पुस्तकात लिहिले आहे, की जिना यांच्या निर्णयामुळे कलात सर्व बाजूंनी वेढले होते. जिना यांनी अनेक बलुच सरदारांना त्यांच्या बाजूने एकत्र केले. त्यामुळे खान यांच्यापुढे कोणताही मार्ग उरला नाही. त्यानंतर खान यांनी भारतीय अधिकाऱ्यांना आणि अफगाण शासकांना मदतीचे आवाहन केले; परंतु त्याचा काही उपयोग झाला नाही. २७ मार्च १९४८ रोजी 'ऑल इंडिया रेडिओ'ने परराष्ट्र विभागाचे सचिव व्ही. पी. मेनन यांना उद्धृत केले, की कलातच्या खानने विलयासाठी भारताशी संपर्क साधला होता; परंतु भारत सरकारने ही विनंती नाकारली. तथापि, तत्कालीन गृहमंत्री सरदार पटेल आणि तत्कालीन पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांनी नंतर हे विधान नाकारले.

२६ मार्च रोजी पाकिस्तानी सैन्याने बलुचिस्तानमध्ये प्रवेश केला. खान यांच्याकडे जिना यांच्या अटी मान्य करण्याशिवाय पर्याय नव्हता; परंतु या ताब्यामुळे बलुचिस्तानच्या लोकसंख्येच्या मोठ्या वर्गात पाकिस्तानबद्दल द्वेष निर्माण झाला. बलुचिस्तान केवळ २२७ दिवस स्वतंत्र राहिला. खान यांचे भाऊ प्रिन्स करीम खान यांनी नंतर बलुच राष्ट्रवादींचा एक गट संघटित केला. त्यांनी १९४८ मध्ये पाकिस्तानविरुद्ध पहिले बंड सुरू केले. पाकिस्तानने १९४८ चे बंड चिरडले. करीम खानसह अनेक लोकांना अटक करण्यात आली. बंड दडपले गेले असेल; पण ते कधीच संपले नाही. बलुचिस्तानच्या स्वातंत्र्यासाठी सुरू झालेल्या या बंडाला नवे नेते मिळत राहिले. त्यांनी १९५०, १९६० आणि १९७० च्या दशकात पाकिस्तानी सरकारला आव्हान देणे सुरू ठेवले. २००० पर्यंत, पाकिस्तानविरुद्ध बलुचिस्तानने चार वेळा बंड केले. २००५ मध्ये, बलुचिस्तान लिबरेशन आर्मी (बीएलए) ची स्थापना झाली आणि आजपर्यंत बलुचिस्तानचे लोक स्वातंत्र्यासाठी लढत आहेत.

(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

---

# ग्रामीण क्रिकेटमुळे विद्यार्थ्यांच्या भविष्याची चिंता

पावसाळा संपला की ग्रामीण भागातील बहुतांश तरूणांना वेध लागतात ते क्रिकेटचे गदी ऑक्टोबर महिन्यापासून सुरू झालेला हा क्रिकेटचा हंगाम फ्रेब्रुवारी, मार्च महिन्यापर्यंत जोरदार चालतो. या क्रिकेट खेळामुळं ग्रामीण भागातील तरुणांना विशेषतः बोर्डाची परिक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांनी सावधानता बाळगणं अत्यंत गरजेचं आहे. ग्रामीण क्रिकेट खेळामुळे काही प्रमाणात शालेय विद्यार्थ्यांसह महाविद्यालयीन विद्याध्यर्थ्यांना देखील फटका बसत आहे. अगदीच दहा-बारा वर्षांच्या मुलांपासून ज्येष्ठांपर्यंत क्रिकेटचे वेड आहे. त्यामुळे विद्यार्थी अभ्यासात मागे पडत आहेत. क्रिकेटच्या नादामध्ये आपले पाल्य स्वतः च्या भविष्याचं वाटोळे तर करणार नाही ना, याची चिंता पालकांना पडली आहे. ग्रामीण भागात निदान परिक्षेच्या कालावधीत तरी कोणत्याही सामन्यांचे आयोजन न करता विद्यार्थ्यांना क्रिकेटपासून दूर ठेवावं, अशी अपेक्षा चिंताग्रस्त पालक व्यक्त करत आहेत.

देशात क्रिकेट या खेळाचा मोठा चाहता वर्ग आहे. जेव्हा जेव्हा भारतीय संघ एखादा महत्त्वाचा सामना जिंकतो, तेव्हा संपुर्ण देश त्यांच्या विजयाचा जल्लोष करत असतो. त्यामुळे देशातील लहान थोरांना क्रिकेटचे वेड आहे. क्रिकेटचा क्रेझ शहरांसह ग्रामीण भागत देखील मोठ्या प्रमाणत आहे. अगदी ऑक्टोबर महिन्यापासून सुरू झालेला हा क्रिकेटचा हंगाम फ्रेब्रुवारी, मार्च महिन्यापर्यंत असतो. यावेळी ग्रामीण भागात छोट्या मोठ्या स्वरूपाच्या क्रिकेटच्या स्पर्धा भरवल्या जातात. मोठंमोठी बक्षिसे ठेवली जातात. आता आयपीएल सारख्या प्रीमीयर लीग देखील गावागावांत भरवली जाते. त्यात लहानग्यांपासून मोठ्यांपर्यंत सगळेच क्रिकेटप्रेमी सहभागी होत असतात. त्यातील बहुतांश खेळाडूंचं भारतासाठी क्रिकेट खेळण्याचं स्वप्न असतं. विशेषतः शालेय विद्यार्थ्यांमध्ये क्रिकेटची क्रेझ मोठ्या प्रमाणात असते. परंतु, ग्रामीण भागातील खेळाडू टेनिस बॉलच्या क्रिकेट स्पर्धा खेळत असून या टेनिस क्रिकेटला पाहिजे तसा व्यावसायिक दर्जा नाही. त्यामुळे पालक वर्गातून



आपल्या पाल्यांना क्रिकेट खेळण्यापासून रोखलं जातं. ते देखील काही प्रमाणात योग्यच आहे. कारण एकदा का क्रिकेटचा मोसम सुरू झाला की बरीचशी मुलं शाळेच्या नावाने सरळ क्रिकेट बघायला किंवा खेळायला जातात. त्यामुळे त्यांच्या शैक्षणिक नुकसानाची चिंता पालकांना आहे.

**वैभव पाटील**

ग्रामीण भागात जर सिजन क्रिकेटच्या स्पर्धा भरवल्या, तर हजारातून एखादा व्यावसायिक खेळाडू तयार होऊ शकेल, असे मत क्रिकेटप्रेमींकडून व्यक्त केलं जात आहे. परंतु, शाळा किंवा शिक्षण सोडून क्रिकेट एके क्रिकेट करणं हे पुर्णपणे चुकीचे असल्याचं पालक वर्गातून बोललं जातं आहे. याबाबत तरुणांनी अंतर्मुख होऊन विचार करावा, ही अपेक्षा व्यक्त होत आहे. आज गावांतील क्रिकेटप्रेमी तरुणांमध्ये उत्साह असला तरी, दहावी-बारावीच्या परीक्षा सध्या चालू आहेत. स्थानिक पालक सांगतात की, काही विद्यार्थी अभ्यास सोडून क्रिकेटचे सामने बघण्यात दंग होतात. त्यामुळे त्यांचे भविष्य धोक्यात येऊ नये म्हणून आयोजकांनी पुढाकार घ्यावा. परीक्षा संपल्यानंतरच सामने घ्या, म्हणजे मुलांच्या अभ्यासात व्यत्यय येणार नाही. १० वी आणि १२ वी हा विद्यार्थ्यांच्या आयुष्याचा पाया आहे, त्यावरच त्यांचे भविष्य घडतं. म्हणून सर्वांनी सहकार्य करावं, असे मत व्यक्त होत आहे. तसेच, डीजे आणि लाऊड स्पीकरच्या जोरदार आवाजामुळे विद्यार्थ्यांच्या अभ्यासात खंड पडत आहे. जर हे सर्व थांबले तर विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी शांत वातावरण मिळेल आणि ते यशस्वी होतील, असे पालक सांगतात. याच पार्श्वभूमीवर पालक आणि स्थानिक नागरिकांनी, मुलांचं भवितव्य महत्त्वाचे असून परीक्षा होईपर्यंत क्रिकेट स्पर्धा पुढे ढकलण्याची भावनिक विनंती क्रिकेट आयोजकांकडे केली आहे.

पालकांच्या हृदयात विद्यार्थ्यांच्या भविष्याची चिंता जागृत झाली आहे. त्यासाठी नागरिकांनी एकत्र येऊन परीक्षा काळात शांतता राखणे गरजेचं आहे. तसेच, पुढाऱ्यांनी परिक्षा काळात क्रिकेटसह इतर कोणतेही सामने ठेवण्यास मज्जाव करणे गरजेचं आहे. कोणीही देणगी मागण्यासाठी आल्यास त्याला परिक्षा संपल्यानंतर ये, असं सांगणं गरजेचं आहे. पुढाऱ्यांनी ही आपली जाबाबदारी समजून विद्यार्थ्यांना प्रथम आभ्यासासाठी प्रोत्साहन देणे गरजेचं आहे. येणाऱ्या पीढीला सुधारण्यासाठी हातभार लावा, अशी आर्त साद पालक वर्गातून ऐकू येत आहे. तरच, विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळेल. ही केवळ विनंती नसून, भावनिक आवाहन असल्याचं पालक वर्गातून बोललं जातं आहे.

---

**लोकसंसद**

## सावधान! देशात ३२ बनावट विद्यापीठे

विद्यापीठ अनुदान आयोगाने देशातील ३२ विद्यापीठांना बनावट घोषित केले असून विद्यार्थी आणि पालकांनी या बनावट विद्यापीठांत प्रवेश घेण्यापूर्वी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या संकेतस्थळावरून मान्यताप्राप्त अधिकृत विद्यापीठांची यादी तपासावी आणि नंतरच प्रवेश घ्यावा असे आवाहन आयोगाकडून करण्यात आले आहे. दोन वर्षांत देशातील बनावट विद्यापीठांच्या संख्येत वाढ झाली असून ही संख्या २० वरून ३२ वर गेली आहे. या ३२ बनावट विद्यापीठांपैकी दिल्लीत १२, उत्तर प्रदेशात ४ तर केरळ, महाराष्ट्र, पश्चिम बंगाल, पुद्दुचेरी, आंध्र प्रदेश आणि कर्नाटकात प्रत्येकी २ आणि हरयाणा, राजस्थान, झारखंड आणि अरुणाचल प्रदेशात प्रत्येकी एक बनावट विद्यापीठ आढळून आले आहे. आश्चर्याची बाब म्हणजे त्यातील काही बोगस संस्था तर यूजीसी मुख्यालयापासून केवळ काही मीटर अंतरावर आहेत.

या बनावट विद्यापीठांच्या यादीत महाराष्ट्रातील दोन विद्यापीठांचा समावेश असून त्यामध्ये नागपूरमधील 'राजा अरबी विद्यापीठ' आणि सोलापूर जिल्ह्यातील 'राष्ट्रीय मागासवर्गीय कृषी विद्यापीठ' या संस्थांचा समावेश आहे. दुसरी गोष्ट म्हणजे विदेशी विद्यापीठांच्या नावाचाही काही बोगस संस्थांनी गैरवापर करत आहेत. या संदर्भात अलीकडेच श्रीलंकेच्या कोलंबिया युनिव्हर्सिटीने यूजीसीकडे महाराष्ट्रात त्यांच्या संस्थेच्या नावाचा गैरवापर करणाऱ्या बोगस विद्यापीठाची तक्रार केली होती. तरी विद्यार्थी आणि पालकांनी प्रवेश घेताना सतर्क राहण्याचा सल्ला विद्यापीठ अनुदान आयोगाने दिला आहे.

**– प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

---

**दिनविशेष**

# छत्रपती राजाराम महाराज

छत्रपती राजाराम महाराज हे छत्रपती शिवाजी महाराजांचे कनिष्ठ पुत्र आणि मराठेशाहीतील तिसरे छत्रपती. त्यांचा जन्म २४ फेब्रुवारी १६७० रोजी शिवपत्नी सोयराबाईंच्या पोटी राजगडावर झाला. शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर ज्येष्ठ पुत्र संभाजी महाराजांचा राज्याभिषेक झाला. ११ मार्च १६८९ रोजी संभाजी महाराजांची निर्घृण हत्या करण्यात आली. या प्रसंगामुळे संपूर्ण मराठी स्वराज्य हादरले. कठीण प्रसंगी सारासार बुद्धीने विचार करू शकतील असे काही लोक शिवाजी महाराजांनी अगोदरच मिळवून ठेवले होते. यामध्ये रामचंद्रपंत अमात्य, संताजी घोरपडे, धनाजी जाधव, शंकराजी नारायण, प्रल्हाद निराजी इत्यादींचा समावेश होता. या सर्व मंडळींनी राजाराम महाराजांचा राज्याभिषेक केला (१६८९). मोगलांच्या आक्रमणामुळे राजाराम महाराजांना रायगड सोडून जिंजीला जावे लागले. संभाजी महाराजांच्या पाडावाने औरंगजेबाला आनंद झाला असला तरी, राजाराम महाराजांना कैद न झाल्याची गोष्ट त्याला खटकत होती. त्याने दक्षिणेत उतरून आदिलशाही (१६८६) आणि कुतुबशाहीचा (१६८७) यांचा पाडाव केला. या प्रसंगानंतर तो विजापूरकडे मोगल सैन्याला प्रोत्साहन देण्यासाठी निघून गेला. तेथून पुढे औरंगजेबाने ब्रह्मपुरीला येऊन मराठ्यांचे गडकोट घेण्याची मोहीम सुरू केली. संभाजी महाराजांच्या मृत्यूनंतर कठीण परिस्थितीत मराठ्यांचे नेतृत्व करण्याची जबाबदारी राजाराम महाराज यांच्याकडे आली. यावेळी त्यांचे वय अवघे १९ वर्षे होते. राजाराम महाराज रायगडावरून निघून नोव्हेंबर १६८९ च्या पहिल्या आठवड्यात जिंजीला पोहोचले. मराठ्यांनी जिंजीलाच राजधानी केली. जिंजीला तीन लक्ष होनांचा खजिना होता. तो मराठ्यांनी ताब्यात घेतला. महाराजांनी जिंजीला राजदरबार भरविला. संताजी आणि धनाजी यांची सेनापतीपदी नियुक्ती केली. शंकराजी नारायण, नेमाजी शिंदे, हनुमंतराव घोरपडे अशा विश्वासू माणसांना बरोबर घेऊन त्यांनी जिंजीवरून राज्यकारभारास सुरुवात केली. पुढे जिंजीला वेढा पडला, तिथून निघून ते विशाळगडावर आले आणि भविष्यातील दिशा ठरवली. अतिशय अवघड परिस्थितीत स्वराज्याची धुरा सांभाळणाऱ्या छत्रपती राजाराम महाराज यांचे २ मार्च १७०० रोजी निधन झाले. 'धर्मप्रद्योदिताशेषवर्णा दाशराथेरीव। राजारामस्य मुद्रेयं विश्ववंद्या विराजते।। आणि 'प्रतीपात चन्द्रलेखेव वर्धीष्णू विश्ववंदिता। शिवासुनोरीयंमुद्रा राजारामस्य राजते।।' , अशा या दोन राजमुद्रा आहेत. या दोन्ही राजमुद्रांचा आकार वाटोळा आहे. राजाराम महाराजांनी तिसरी राजमुद्राही केली होती. त्यावर 'श्री राजाराम छत्रपती', एवढेच लिहिले असून, त्याचा आकार चौकोनी होता. राजाराम महाराजांना ताराबाईपासून शिवाजी, तर राजसबाई यांच्यापासून संभाजी असे दोन पुत्र झाले. छत्रपती राजाराम महाराज अत्यंत पराक्रमी व मुत्सद्दी होते. चांगल्या माणसांची त्यांना पारख होती. स्वराज्य आत्यंतिक संकटात असताना छत्रपती राजाराम महाराजांनी ते सावरले. या सगळ्या कालखंडात औरंगजेबाने स्वराज्यावर अनेक चाली केल्या. अनेक लढाया झाल्या. मात्र, औरंगजेबाला एकही मोठे युद्ध या दरम्यान जिंकता आले नाही. छत्रपती राजाराम महाराजांच्या नेतृत्वाखाली मराठ्यांच्या फौजांनी मुघलांना निकराची आणि कडवी झुंज दिली. पुढे जिंजी जिंकून राजाराम महाराजांना पकडण्यासाठी औरंगजेबाने जुल्फिकार खानास धाडले. इ.स. १६९० मध्ये खानाने जिंजीस वेढा दिला. तो ८ वर्षे सुरू राहिला. त्या काळात रामचंद्र पंडित, शंकराजी नारायण, संताजी, धनाजी या मंडळींनी राजाराम महाराजांच्या नेतृत्वाखाली मुघल सैन्याला निकराची झुंज दिली. संताजी-धनाजींनी याच काळात गमिनी काव्याने लढून मुघलांना पुरते हैराण करून सोडले. नाशिकपासून जिंजीपर्यंत मराठ्यांच्या फौजा सर्वत्र संचार करू लागल्या. अखेर इ.स. १६९७ या वर्षी जुल्फिकार खानाने जिंजी जिंकली. पण, तत्पूर्वीच महाराज किल्ल्यातून निसटले. महाराष्ट्रात येऊन त्यांनी मुघलांविरुद्ध मोठी धाम धूम माजवली. शत्रूच्या प्रदेशावरील स्वारीत असताना त्यांचा प्रकृतीने घात केला आणि सिंहगडावर फाल्गुन वद्य नवमी, शके १६२१ (इ.स.१७००) या दिवशी छत्रपती राजाराम महाराज यांचे निधन झाले.

# अखंड हरिनाम जप, यज्ञाचे आयोजन

। पाली । प्रतिनिधी ।

सुधागड तालुक्यातील श्री क्षेत्र उनहेरे बु. येथील श्री विठ्ठल रखुमाई मंदिरात उन्हेरे खुर्द, केशवनगर, पिलोसरी, कुंभारशेत, एकलघर, बलाप, राबगाव, शिळोशी या नवगाव पंचक्रोशीतर्फे अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज श्री ज्ञानेश्वरी पारायण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम बुधवार दि. २५ ते शनिवार दि.२८ फेब्रुवारीपर्यंत साजरा होणार आहे. या कालावधीत नामांकित कीर्तनकारांचे कीर्तनाचा कार्यक्रम होणार आहे. तरी सर्व भाविक वृंदांनी या सुवर्ण संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन देवस्थानचे अध्यक्ष शिवराम पवार यांनी केले आहे.

## जाहिर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की मौजे अलिबाग, ता. अलिबाग, नगरपालिका हद्दीतील मधील मालमत्ता क्र.ALB000003604, जुना मालमत्ता क्र. Z1MKT003627 शार्दुल सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. अलिबाग या इमारती मधील (ई विंग) मधील दुसऱ्या मजल्या वरील निवासी सदनिका क्र. ३०४ या मिळकतीचे विद्यमान मालक विद्या अरविंदकुमार नायर यांचे कडून आमचे अशीलांनी कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीस सोईकरता, 'सदर मिळकती' असे संबोधले आहे. सदर मिळकतीसंदर्भात तशा अशायाची बोलणी विद्यमान मालक व खरेदीदार याचे दरम्यान झालेली आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व बोजा विरहीत आल्याचा भरवंसा खरेदीदारास विद्यमान मालकाने दिला असून सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणे कामी जाहिर नोटीस प्रसिद्ध केलेली आहे.

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदि कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्याची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून सात दिवसांचे मुदतीत खाली सही करणार यांजकडे कळवावी. येणे प्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून खरेदीदार सदरचे मिळकतीचा विक्री व्यवहार पुर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत खरेदीदारावर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

अलिबाग
दिनांक : २०/०२/२०२६

**ॲड.वैशाली अंकित बंगेरा**
ता.अलिबाग, जि. रायगड
मो.नं.९८२२५५०५१६

## जाहीर नोटीस

दिनांक: २३/०२/२०२६

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने असे सुचीत करण्यात येत आहे की, आमचे अशिल यांनी मौजे मुगपे, ता. कर्जत, जि. रायगड येथील,

| सर्व्हे क्रमांक | हिस्सा क्रमांक | क्षेत्रफळ | आकार |
|---|---|---|---|
| २५ | १ | १-८४-०० | १४-९९ |
| २५ | २ | ०-२१-०० | २-४४ |

च्या शेतजमीन मिळकत विद्यमान मालक यांचे कडून कायम स्वरुपी खरेदी करावयाची ठरविलेली आहे. तसा उभयातांमध्ये व्यवहार घडून आलेला आहे.

तरी उपरोक्त शेतजमीन मिळकतीमध्ये कोणाही व्यक्तीचा कसलाही अगर ताबा, बयाणपावती, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीन, लीज, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास सदरील नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन २१ दिवसाचे आत खाली सही करणार अधिवक्ता यांचे कडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी स्वरुपात दाखल कराव्यात सदर मुदतीत हरकती न आल्यास उपरोक्त शेतजमीन मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजुन इतर कोणाही व्यक्तींचा कसलाही कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध नाही. व असल्यास ते जाणीपुर्वक आमचे अशिलांचे लाभात सोडून दिलेले आहेत. असे समजुन कायदेशिर बाबींची पुर्तता करुन आमचे अशिल उपरोक्त जीमन मिळकत संदर्भातचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील आणि मग मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत वा तक्रार आमचे अशिल यांचेवर बंधनकारक राहणार नाही. याची या जाहिर नोटीसने तमाम जनतेने नोंद घ्यावी.

येणे प्रमाणे जाहिर नोटीस आहे.

**ॲड. प्रमोद नथुराम सुर्वे**
रा.मातोश्री निवास आवळस, ता.कर्जत, जि.रायगड
भ्रमनध्वनी क्र. ०९८८१५७९५५५

## जाहीर सूचना

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशील आशिष अशोक घारे, रा. उमरोली, पो. कोषाणे, ता. कर्जत, जि. रायगड यांनी खालील वर्णनाच्या शेतजमीन मिळकत शिप्रा घणेश श्रीवास्तव उर्फ शिप्रा अतुल सिन्हा यांचेकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**मौजे मालेगाव तर्फे वरेडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील शेतजमीन मिळकत**

| भूमापन क्रमांक | उपविभाग | क्षेत्र आर-चौ.मी. | आकार रुपये-पैसे |
|---|---|---|---|
| ४९ | १ | ०-०९-०० | ०-०५ |

वरील शेतजमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, दान, भाडेपट्टा, लिज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशीलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशीलांच्या लाभात सोडून दिलेला असून त्यांची आमचे अशीलांच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशील खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सूचना आहे.

दिनांकः २४ फेब्रुवारी २०२६

**ॲडव्होकेट प्रवीण पुंडलिक कराळे**
पत्ता : ओमकार अपार्टमेंट, डिकसळ,
पो. कोषाणे, ता. कर्जत, जि. रायगड
मो.९९७५०९०३०४

## जाहीर सूचना

तमाम जनतेस या जाहीर नोटिसीद्वारे कळविण्यात येते की, आमच्या अशीलांनी खालील अनुसूचीमध्ये वर्णन केलेल्या बिन शेती मिळकत व त्यावरील असलेल्या बांधकामाचे विद्यमान मालक आदित्य हर्षवदन मंगलदास यांचेकडून सदर मिळकत कायमस्वरूपी मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या संदर्भात आम्ही विद्यमान मालकांचे मालकी हक्क तपासत आहोत. सदर मिळकत ही महसूल अभिलेख (७/१२ उतारा) प्रमाणे आदित्य हर्षवदन मंगलदास यांच्या नावे नोंद आहे. तथापि, द विक्टोरिया मिल्स लि. ही कंपनी सदर व्यवहारामध्ये कन्फर्मिंग पार्टी म्हणून सहभागी असून व्यवहारास आपली संमती व पुष्टी देणार आहे.

सदर मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकीहक्काची व प्रत्यक्ष वहिवाटीतील असून ती विकण्याचा त्यांना पूर्ण हक्क व अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या अशीलांना दिलेला आहे. तथापि, कोणत्याही व्यक्ती/संस्थेस सदर मिळकत किंवा त्यातील कोणत्याही भागासंदर्भात कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेप जसे की, विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, विश्वस्त हक्क, धारणाधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, वारसाहक्क, ताबा, जप्ती, गहाण, प्रभार, बक्षीस, प्रलंबित वाद, एफएसआय वापर किंवा अन्य कोणताही दावा असल्यास त्यांनी त्याबाबतची लेखी सूचना झुंजारराव आणि कं., वकील आणि सॉलिसिटर्स, ४ था मजला, जलाराम ज्योत, जन्मभूमी मार्ग, फोर्ट, मुंबई - ४००००१ येथे संबंधित कागदपत्रांच्या प्रमाणित सत्यप्रतांसह या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत कळवावी.

वरील मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदर मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निर्विवाद मालकी हक्कांची आहे असे गृहीत धरून आमचे अशील सदरचा खरेदी-विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**अनुसूची**
**(मिळकतीचे वर्णन)**

नोंदणीकृत जिल्हा व उप-जिल्हा रायगड यांचे कार्यक्षेत्र मधील गाव - सातिर्जे, तालुका - अलिबाग, जिल्हा रायगड येथे स्थित बिन शेती मिळकतीचे गट क्रमांक व उपविभाग ८८/५/३, एकुण क्षेत्र ३४-०२-०० (आर.चौ.मी.) व आकारणी ३४०.२० (रु.पै.) व त्यावरील असलेल्या बांधकामासह.

ठिकाण : अलिबाग
दिनांक :२४/०२/२०२६

**झुंजारराव आणि कं. करीता**
**सही/-**
**विक्रांत झुंझारराव**

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यांत येते की खालील वर्णन केलेली जमीन मिळकत. सदर जमीनीचे मालक श्रीमती नामाबाई चिनन्ना नरावाड रा -१/७/२९८९, वैशाली नगर, नांदेड. ४३१६०५ यांचे मालकीची व त्यांचे प्रत्यक्ष ताबे कब्जांत व वहिवाटीची ७/१२ सदरी त्यांचे नावे असलेली भोगवटादार वर्ग १ ची मिळकत जमिन मौजे - खरंवडी, तालूका - कर्जत जिल्हा - रायगड या गावी आहेत. त्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे-

**मौजे खरंवडी, तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील मिळकतीचे वर्णन**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र - हे.आर.पॉ | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| १३ | २ | ०-५४-४० यापैकी खरेदी दिलेले क्षेत्र -०-२१-०० | २-७१ |
| १५ | १/अ/१ | ०-४०-०० यापैकी खरेदी दिलेले क्षेत्र -०-००-५० | १-०१ |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत झाडझाडोऱ्या सुद्धा सर्व हक्क हितसंबधासह सदर जमीनीचे मालक यांचे कडुन खालील सही करणार यांनी विकत घेण्यांचे ठरले असून त्याबाबत बयाणा पावती झालेली आहे. सदर जमीन मालक यांनी सदर वर वर्णन केलेली जमीन दुसरे कोणास कोणत्याही हक्काने म्हणजे साठेकरार, बयाणा पावती, हक्कसोड पत्र, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, गहाण दान बक्षिस खरेदी वगैरे दिलेली नाही. अगर दुसरे कोणास कोणत्याही हक्कांने दिलेली नाही. अगर तोंडी अगर लेखी करार केलेला नाही. जर करता सदर मिळकतीबाबत कोणाचीही कुठल्याही प्रकारची तक्रार हरकत असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झालेल्या तारखेपासुन १४ दिवसांच्या आत खालील सही करणार यांचेकडे प्रथम दर्शनी लेखी पुरावे सादर करावेत. जर करीता सदर मुदतीस कोणाचीही कुठल्याही प्रकारची तक्रार हरकत न आल्यास सदर मिळकत ही. निर्वेध व बोजारहित अशी समजुन सदर मिळकतीचे रजिस्टर खरेदी खत केले जाईल. मागाहुन येणाऱ्या तक्रारीस व हरकतीस खालील सही करणार हे जबाबदार राहणार नाही.

करीता सदर जाहिर नोटीसीने कळवित आहे.

तारीख :२३/०२/२०२६

सही/-
**श्री ललित गोपाल सोलंकी**
रा-न्यू हिरापन्ना को. ऑप हौ. सो. लि.
गोकुल व्हिलेज, शांती पार्क, मीरा भायंदर
ठाणे -४०११०७
मो.९९६०५३९८९७/९२८४२२०८१५

## जाहीर सूचना

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशील आशिष अशोक घारे, रा. उमरोली, पो. कोषाणे, ता. कर्जत, जि. रायगड यांनी खालील वर्णनाच्या शेतजमीन मिळकत माधव केशव करंबळेकर रा. बी / ७०२, वात्सल्य दीप सीएचएस, ९० फीट रोड, एसबीआय बँकेजवळ, मुलुंड (पूर्व), मुंबई ४०००८१ यांचेकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

मौजे मालेगाव तर्फे वरेडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील शेतजमीन मिळकत

| भूमापन क्रमांक | उपविभाग | क्षेत्र आर-चौ.मी. | आकार रुपये-पैसे |
|---|---|---|---|
| ६१ | ६ | ०-१४-०० | ०-३४ |

वरील शेतजमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा ताबा बयाणा पावती, साठेकरार, गहाण, दान, भाडेपट्टा, लिज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशीलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशीलांच्या लाभात सोडून दिलेला असून त्यांची आमचे अशीलांच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशील खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सूचना आहे.

दिनांकः २४ फेब्रुवारी २०२६

**ॲडव्होकेट प्रवीण पुंडलिक कराळे**
पत्ता : ओमकार अपार्टमेंट, डिकसळ,
पो. कोषाणे, ता.कर्जत, जि.रायगड
मो.९९७५०९०३०४

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यांत येते की, मौजे चेंढरे, ता.अलिबाग, जि. रायगड येथील भुमापन क्रमांक व उपविभाग ३/२/ब/११, क्षेत्र ३-१२-५० हे. आर, आकार ३१.२५ रु.पै. ही बिनशेती जमिन मिळकत व त्यामधील घर मिळकत क्र. १८४८, क्षेत्र २४६२ चौ. फूट ही घर मिळकत या दोन्ही मिळकती या नोटीशीचा विषय आहेत. सदरच्या मिळकतींचे मालक श्रीमती. कुमुदिनी शाम सुभेदार यांच्याकडुन सदर मिळकती माझे अशिलांनी खरेदी करण्याचे ठरविले आहे.

तरी वर नमूद बिनशेती जमिन व घर मिळकतीबाबत कुणाचेही ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बोजा, भाडेपट्टा, लिज अथवा इतर कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन पंधरा दिवसांचे आत खाली सही करणार यांचेकडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी स्वरूपात दाखल कराव्यात. सदर मुदतीत हरकती न आल्यास वरील जमिन व घर मिळकती निर्वेध व बोजाविरहीत आहेत, असे समजुन इतर कोणाचाही कायदेशीर हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक आमच्या अशिलांच्या हक्कात सोडून दिलेले आहे, असे समजून व कायदेशीर बाबींची पूर्तता करून माझे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत, तक्रार माझे आशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची याद्वारे नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक : २३/०२/२०२६

**ॲड. गीता सं.पवार**
०५, श्रृती सारंग सहकारी सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राम्हण आळी,
ता. अलिबाग, जि. रायगड

## जाहीर सुचना

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे फुफादेवीपाडा, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील परिशिष्टात नमूद केलेल्या जमिन मिळकतीमध्ये श्री. आत्माराम उंदऱ्या पाटील, राहणार फुफादेवीपाडा यांचा रे.मु. क्र. ६२/१९९१ मधील हुकूमनाम्याद्वारे/निकालाद्वारे ४/९ इतका हिस्सा असल्याचे मा. न्यायालयाने जाहीर केले असून, त्याबाबतचा अंमल संदर्भित मिळकतींच्या हक्कनोंदपत्रकी फेरफार क्र. १५४ कडे देण्यात आला आहे. श्री.आत्माराम उंदऱ्या पाटील यांच्या ४/९ हिश्श्याची खालील परिशिष्टात नमूद केलेल्या मिळकतीमध्ये जमिन मिळकत त्यांच्या निर्वेध मालकी हक्काची असून, सदर जमिन मिळकत, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून, माझ्या अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाची बोलणी सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान झालेली आहेत. सदरील जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

खालील परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या मिळकतीवरील श्री. आत्माराम उंदऱ्या पाटील, यांच्या मालकी हक्काचा तपास करुन, मालकी हक्क निर्वेध असले बाबतचा दाखला जमिन खरेदीदारांस देणेचा आहे. तरी ज्या व्यक्ती/संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतीमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी, हे सर्वांस कळावे.

**वर नमूद केलेल्या मिळकतीचे परिशिष्ट**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| फुफादेवी पाडा, ता.अलिबाग. | १२/३ | १-०७-०० / ०-१८-०० पो.ख. / १-२५-०० एकूण | १-४४ |
| सदर वरकस जमिन मिळकतीमधील श्री. आत्माराम उंदऱ्या पाटील यांच्या ४/९ इतक्या अविभक्त हिश्श्याची म्हणजेच सुमारे ०-५५-५५ आर्स वरकस जमिन मिळकत, | | | |
| फुफादेवी पाडा, ता.अलिबाग. | १२/६ | ०-७९-०० / ०-१०-०० पो.ख. / १-८९-०० एकूण | १-०६ |
| सदर वरकस जमिन मिळकतीमधील श्री. आत्माराम उंदऱ्या पाटील यांच्या ४/९ इतक्या अविभक्त हिश्श्याची म्हणजेच सुमारे ०-३९-५५ आर्स वरकस जमिन मिळकत, | | | |
| फुफादेवी पाडा, ता.अलिबाग. | २३/२ | ०-११-०० / ०-०२-२० पो.ख. / ०-१३-२० एकूण | ०-४७ |

सदर जमिन मिळकतीमधिल श्री.आत्माराम उंदऱ्या पाटील यांच्या ४/९ इतक्या अविभक्त हिश्श्याची जमिन मिळकत.

अलिबाग,
दिनांक : २३/०२/२०२६.

सही/
**(ॲड. संजय म.भगत)**
हिराबाग सोसायटी, ए विंग,
टिळक रोड, अलिबाग-रायगड.
खरेदीदारांचे वकील

**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ रायगड विभाग, पेण.**

**निविदा सुचना क्रमांक १० सन २०२५-२६**

विभाग नियंत्रक ,रा.प.रायगड विभाग, हे रा.प.रायगड विभागातील महाड, कर्जत, मुरुड, श्रीवर्धन, वडखळ, पाली, पोलादपूर या बसस्थानकावरील प्रसाधनगृहाची स्वच्छता करून चालविण्यास देण्यासाठी "पैसे भरा,वापरा,व हस्तांतरीत करा "या तत्त्वावर अनुभवी नोंदणीकृत सार्वजनिक संस्थाकडून मागणी निविदा मागवित आहेत.

**निविदे संबंधीत तपशील**

निविदाकाराने सादर केलेले देकार निविदा उघडल्याच्या दिवसांपासून १२० (एकशे वीस) दिवसांपर्यंत ग्राह्य राहतील. निविदाकारांनी निविदेमध्ये भरावयाचा देकार अंकी व अक्षरी शाईमध्ये मराठी / हिंदी / इंग्रजी इत्यादी कोणत्याही एकाच भाषेत सुस्पष्टपणे लिहावीत. सशर्त निविदा नाकारल्या जातील.

निविदा संच पोस्टाने पाठविले अथवा स्विकारले जाणार नाहीत. कोणतीही अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न दाखविता कोणत्याही टप्प्यावर नाकारण्याचा हक्क विभाग नियंत्रक, रा.प. रायगड राखून ठेवत आहेत.

खालील कागदपत्रांची मूळ व झेरॉक्स प्रती सादर केल्यानंतर तसेच निविदा संचाची किंमत अदा केल्यानंतरच कोरे निविदा संच मिळू शकतील. तसेच खालील कागदपत्रे निविदा सादर करताना निविदासंचा सोबत जोडणे आवश्यक असेल.

१) सार्वजनिक संस्था ही सरकारमान्य नोंदणीकृत असणे आवश्यक आहे.
२)नोंदणीकृत दाखला वैध असला पाहिजे.
३)संस्थेस मागील दहा वर्षाचा सार्वजनिक शौचालय समाधानकारक चालविण्याचा अनुभवाचा दाखला आवश्यक आहे.
४)आयकर विवरण पत्र/सेल टॅक्स विवरण पत्र. [आर्थिक क्षमता तपासणीसाठी]
५)रुपये पन्नास हजार किंमतीची राष्ट्रीयकृत बँकेची सॉलव्हन्सी प्रमाणपत्र. [आर्थिक क्षमता तपासणीसाठी]
६)प्रसाधनगृहाच्या दैनंदिन देखभाल व स्वच्छतेसाठी लागणारे मनुष्यबळ असल्याचे दाखला/प्रमाणपत्र.
७)संस्थेकडे कुठल्याही प्रकारचे न्यायालयीन प्रकरण नसल्याचे हमीपत्र.
सॅनेटरी मार्टकडून प्रशिक्षण घेतलेली संस्थाना तसेच मेहत्तर/वाल्मीकी समाजाच्या नोंदणीकृत संस्थाना प्राधान्य दिले जाईल.

कोरे निवीदा संच मिळण्याचा कालावधी :- दि.२४.०२.२०२६ ते ०५.०३.२०२६ पर्यंत (सार्वजनिक/स्थानिक/रविवार सुट्टी सोडून) सोमवार ते शुक्रवार दुपारी १४:०० वा.पर्यंत व शनिवारी ११:०० वा. पर्यंत.

निविदा सादर करण्याची अंतिम तारीख व वेळ :- दि.०५.०३.२०२६ रोजी दुपारी १५.०० वा. पर्यंत.

निविदा उघडण्याची तारीख :- दि. ०५.०३.२०२६ रोजी दुपारी १५.३० वा. शक्य झाल्यास.

कराराचा कालावधी :- कामाचा कार्यादेश दिल्यापासून ते निविदेच्या देकारातील कालावधीप्रमाणे.

कोऱ्या निविदा /कोटेशन संचाची किंमत जी.एस.टी.सह प्रति संचास (परत न मिळणारी) :-
१)रु. ५००/- प्रति संच [नापरतावा]
[रु. ५००/- निविदा संचाची किंमत + रु. ९०/- विक्रीकर]

निविदा स्विकारणे बाबतचा तपशील :-
निविदाकारांनी सादर केलेल्या निविदेपैकी यशस्वी व रा.प. महामंडळाच्या दृष्टीने फायदेशीर निविदा रा.प. महामंडळाच्या प्रचलित नियमानुसार रा.प. महामंडळाचे सक्षम प्राधिकारी स्विकारतील किंवा कुठलेही कारण न देता कोणत्याही टप्प्यावर निविदा नाकारण्याचे अधिकारही विभाग नियंत्रक,रा.प. रायगड विभाग यांना असतील.

विभाग नियंत्रक,
रा. प. रायगड विभाग,पेण.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खाली नमुंद केलेली जमीन खालील जमीन मालक यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जातील खालील वर्णन केलेली जमीन मिळकत आमचे खरेदीदारांनी विकत घेण्याचे ठरविले असुन त्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे:-

मौजे ताडगाव ता. सुधागड, जि. रायगड. येथील जमीन बिनशेती प्लॉट मिळकत. जमिन मालकाची नांवे वैभव डेव्हलपमेंट कॉपोरेशन.मिळकतींचे वर्णन :-

| क्र. | स. नं. | प्लॉट नं. | क्षेत्र चौ.मी. | क्र. | स.नं. | प्लॉट नं. | क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २८/१ | ४३१ | ५०० | १६ | २८/१ | ४०९ | ५०० |
| २ | २८/१ | ४३२ | ५०० | १७ | २८/१ | ४१२ | ६४ |
| ३ | २८/१ | ४३५ | ५०० | १८ | ३० | ४१२ | ४३६ |
| ४ | २८/१ | ३९२ | ४८८ | १९ | ३० | ४१४ | ५०० |
| ५ | २८/१ | ३९३ | ५०० | २० | २८/१ | ३६२ | ४८८ |
| ६ | २८/१ | ३९५ | ५०० | २१ | २८/१ | ३६३ | ५०० |
| ७ | २८/१ | ३९६ | ५०० | २२ | २८/१ | ३६४ | ५०० |
| ८ | २८/१ | ३९७ | ५०० | २३ | २८/१ | ३६५ | ५०० |
| ९ | २८/१ | ३९८ | ५०० | २४ | २८/१ | ३६६ | ५०० |
| १० | २८/१ | ३९९ | ५०० | २५ | २८/१ | ३६७ | ३५६ |
| ११ | २८/१ | ४०० | ४१९ | २६ | ३०/१ | ३६७ | १४४ |
| १२ | ३०/१ | ४०० | ८१ | २७ | ३०/१ | ३६८ | ४६७ |
| १३ | ३०/१ | ४०५ | ५०० | २८ | २८/१ | ३६८ | ३३ |
| १४ | २८/१ | ४०७ | ४८८ | २९ | ३० | ३६९ | ५०० |
| १५ | २८/१ | ४०८ | ५०० | ३० | ३० | ३७० | ५०० |

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचीही वहिवाट ताबा बयाणा पावती, साठेकरार, गहाण बोझा, भाडेपट्टा, जप्ती, लिज, लीएन जाणे येणेचे मार्ग अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क, हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसांच्या आत खालील सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह समझ अथवा रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात त्याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजुन त्यासंबधी कोणाचेही कायदेशीर हक्क, हीतसंबध नाही व असल्यास त्यानी ते जाणीवपुर्वक सोडुन दिले आहेत, असे गृहीत धरून आवश्यक त्या कायदेशीर बाबींची पुर्तता करून आमचे खरेदी घेणार खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत बंधनकारक राहणार नाही हे कळावे येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे.

दिनांक :- २४/०२/२०२६

खरेदीदारांचे लेखक,
**राठोड एण्ड एसोसिएट्स**
श्री. सरदारमल जोरावरमल राठोड स्टॅम्प व्हेंडर,
श्री.राजेश एस.राठोड
२८६अ राठोड सदन, ऑफिस नं.७ पाली,
ता.सुधागड, जि.रायगड.
मो. ९४२११६८७६३/९२७०३६७२९०

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे गोंधळपाडा, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकती, त्या मिळकतींचे विद्यमान मालक १) कृष्णा हरी पाटील, २) शांताराम हरी पाटील, ३) शरद हरी पाटील, ४) सुरेखा दत्तात्रेय पाटील, ७) गोरखनाथ आत्माराम म्हात्रे, ६) सुर्यकांत आत्माराम म्हात्रे, ७) विजय आत्माराम म्हात्रे, ८) मच्छिंद्र उर्फै मच्छिंद्रनाथ आत्माराम म्हात्रे, ९) राजश्री राजेंद्र नाईक, १०) दिपश्री दिलीप गावंड, ११) सुगंधा उर्फ सुनंदा दत्तात्रय पाटील, १२) लक्ष्मी दत्तात्रय पाटील, १३) चंद्रकला दत्तात्रेय पाटील, १४) अनंत दत्तात्रेय पाटील, १५) नम्रता नरेश म्हात्रे, १६) साक्षी सुधीर कावजी व १७) प्राची प्रकाश जोशी, रा. मु. पो. गोंधळपाडा, ता. अलिबाग, जि. रायगड यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे व विद्यमान मालकांनी रितसर साठेकरार आमचे अशिलांच्या लाभात स्वाक्षरीत करून दिलेले आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | सर्व्हे नं. | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| गोंधळपाडा | ६७/३/ब | ०-२०-०० / पो.ख. ०-०१-०० / ०-२१-०० | ४.७५ |
| गोंधळपाडा | ६७/४ | ०-३१-१० / पो.ख. ०-०४-०० / ०-३५-१० | ६.०० |

सदरच्या मिळकती हया त्यांचे निर्वेध मालकी हक्कांच्या व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून त्या विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतींवर अथवा त्यांचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, रस्त्याच्या वहिवाटीचा निरंतर हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरच्या मिळकती या विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांच्या आहेत व त्यांचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
तारीख : २४/०२/२०२६

सही/-
**ॲड. गणेश गोविंद पाटील.**
ए/१,२, तळमजला,
'श्रुतीसारंग' को.ऑप.हा.सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राह्मणआळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

## जाहीर नोटीस

**मे.तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो.. माणगाव यांचे न्यायालयात**

प्रस्ताव मृ.क्र.०६/२०२६

१. उर्मिला उमाजी डोंगरे, — अर्जदार
रा.आमडोशी, ता.माणगाव, जि.रायगड

विरुद्ध

१. निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी — सामनेवाले
कडापे, ग्रामपंचायत पेण तर्फे तळे,
ता.माणगाव, जि रायगड
२. गटविकास अधिकारी, पंचायत समिती,
माणगाव जि. रायगड

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की.

निबंधक जन्म-मृत्यू-विवाह नोंदणी अधिकारी, निबंधक जन्म-मृत्यू-विवाह नोंदणी अधिकारी, ग्रामपंचायत पेण तर्फे तळे, ता. माणगाव यांचेकडील जन्म मृत्यू अधिनियम, १९६९ चे कलम १३ (३) व सुधारित अधिनियम, २०२३ अन्वये या कार्यालयाकडे विलंबाने मृत्यू नोंद होणेकामी प्रस्ताव क्र. ९७/२०२५, दि. १८/१२/२०२५ दाखल झाला आहे. त्यान्वये त्यांनी नामदेव यशवंत घुलघुले, रा. आमडोशी, ता. माणगाव, जि. रायगड यांचा मृत्यू दि. १२/०६/१९७७ रोजी आमडोशी, ता. माणगाव, जि. रायगड येथे झाला असल्याचे नमूद केले आहे.

नामदेव यशवंत घुलघुले, रा. आमडोशी, ता. माणगाव, जि. रायगड यांचा मृत्यू दि. १२/०६/१९७७ रोजी आमडोशी, ता. माणगाव, जि. रायगड येथे झाला आहे. तरी नामदेव यशवंत घुलघुले, रा. आमडोशी, ता. माणगाव, जि. रायगड यांचा मृत्यू दि. १२/०६/१९७७ रोजी आमडोशी, ता. माणगाव, जि. रायगड येथे झाला असून अर्जदार यांना त्यांचे मृत्यू प्रमाणपत्र आवश्यक होते. परंतु सदर नोंद ग्रुप ग्रामपंचायत पेण तर्फे तळे, ता. माणगाव, जि. रायगड यांचे अभिलेखामध्ये आढळून आलेली नाही. त्यामुळे निबंधक जन्म-मृत्यू-विवाह नोंदणी अधिकारी, ग्रुप ग्रामपंचायत पेण तर्फे तळे, ता. माणगाव यांनी त्यांच्या जन्माची विलंबाने नोंद होणेकामी आदेश मिळणेबाबत प्रस्ताव दाखल केला आहे.

तसेच नामदेव यशवंत घुलघुले यांच्या मृत्यूची विलंबाने नोंद होणेकामी निबंधक जन्म-मृत्यू नोंदणी, ग्रामपंचायत पेण तर्फे तळे यांचेकडील प्रस्तावही या कार्यालयास प्राप्त झाला आहे. तरी सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे? हे तपासण्याकरिता सदरची जाहीर नोटीस अर्जदार यांचेमार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरिता पंधरा दिवसांचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहित मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास नामदेव यशवंत घुलघुले, रा. आमडोशी, ता. माणगाव, जि. रायगड यांचा मृत्यू दि.१२/०६/१९७७ रोजी आमडोशी, ता.माणगाव, जि.रायगड येथे झाला असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

ठिकाण : माणगाव
दिनांक : १२/०१/२०२६

सही/-
**(विपीन लोकरे)**
**कार्यकारी दंडाधिकारी,**
**माणगाव, जि. रायगड**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी खालील वर्णनाच्या बागायत मिळकतीतील अविभक्त हिस्सा, मिळकतीचे विद्यमान मालकांकडुन सर्व हक्कांगासह विकत घेण्याच्या ठरविलेल्या आहेत.

**मिळकतींचे वर्णन**

| मौजे | सर्व्हे नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पैसे.) |
|---|---|---|---|
| थळ, ता.अलिबाग, जि.रायगड. | ८५/५ | ०-३०-३० / पो.ख. ०-०३-४० / एकूण ०-३३-७० | ९.२० |
| थळ, ता.अलिबाग, जि. रायगड. | ८५/७ | ०-३०-३० / पो.ख. ०-०३-४० / एकूण ०-३३-७० | ९.२० |

सदरहु मिळकतीतील अरूणा नंदकुमार सुंकले, विणा वसंत ओक, अनघा नंदकुमार सुंकले व अंजली नंदकुमार सुंकले यांच्या अविभक्त हिश्याचे क्षेत्र,

सदरहू बागायत मिळकती निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकती निर्वेध आहेत, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : २३/०२/२०२६

**(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता-श्रुती सारंग को. ऑप. हौ. सो., ए विंग,
रूम नं.५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी,
अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

## जाहीर नोटीस

**मे तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो. माणगाव यांचे न्यायालयात**

प्रस्ताव मृ. क्र. ०७/२०२६

१. उर्मिला उमाजी डोंगरे, — अर्जदार
रा. आमडोशी, ता. माणगाव, जि. रायगड

विरुद्ध

१. निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी — सामनेवाले
कडापे, ग्रामपंचायत पेण तर्फे तळे.
ता. माणगाव, जि. रायगड
२. गटविकास अधिकारी, पंचायत समिती, माणगाव
जि. रायगड

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की.

निबंधक जन्म-मृत्यू विवाह नोंदणी अधिकारी, ग्रामपंचायत पेण तर्फे तळे, ता. माणगाव यांचेकडील जन्म मृत्यू अधिनियम, १९६९ चे कलम १३ (३) व सुधारित अधिनियम, २०२३ अन्वये या कार्यालयाकडे विलंबाने मृत्यू नोंद होणेकामी प्रस्ताव क्र. ९८/२०२५, दि. १८/१२/२०२५ दाखल झाला आहे. त्यान्वये त्यांनी लक्ष्मीबाई यशवंत घुलघुले, जि. रा. आमडोशी, ता. माणगाव, जि. रायगड यांचा मृत्यू दि. १०/०५/२०१७ रोजी वडगाव कोड, ता. माणगाव, रायगड येथे झाला असल्याचे नमूद केले आहे.

लक्ष्मीबाई यशवंत घुलघुले, रा.आमडोशी, ता.माणगाव, जि. रायगड यांचा मृत्यू दि. १०/०५/२०१७ रोजी आमडोशी, ता. माणगाव, जि. रायगड येथे झाला आहे. तरी लक्ष्मीबाई यशवंत घुलघुले, रा. आमडोशी, ता. माणगाव, जि. रायगड यांचा मृत्यू दि. १०/०५/२०१७ रोजी आमडोशी, ता. माणगाव, जि. रायगड येथे झाला असून अर्जदार यांना त्यांचे मृत्यू प्रमाणपत्र आवश्यक होते. परंतु सदर नोंद ग्रुप ग्रामपंचायत पेण तर्फे तळे, ता. माणगाव, जि. रायगड यांचे अभिलेखामध्ये आढळून आलेली नाही. त्यामुळे निबंधक जन्म-मृत्यू-विवाह नोंदणी अधिकारी, ग्रुप ग्रामपंचायत पेण तर्फे तळे, ता. माणगाव यांनी त्यांच्या जन्माची विलंबाने नोंद होणेकामी आदेश मिळणेबाबत प्रस्ताव दाखल केला आहे.

तसेच लक्ष्मीबाई यशवंत घुलघुले यांच्या मृत्यूची विलंबाने नोंद होणेकामी निबंधक जन्म-मृत्यू नोंदणी, ग्रामपंचायत पेण तर्फे तळे यांचेकडील प्रस्तावही या कार्यालयास प्राप्त झाला आहे. तरी सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे? हे तपासण्याकरिता सदरची जाहीर नोटीस अर्जदार यांचेमार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरिता पंधरा दिवसाचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहित मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास लक्ष्मीबाई यशवंत घुलघुले, रा. आमडोशी, ता. माणगाव, जि. रायगड याचा मृत्यू दि. १०/०५/२०१७ रोजी आमडोशी, ता. माणगाव, जि. रायगड येथे झाला असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

ठिकाण : माणगाव
दिनांक : १२/०१/२०२६

सही/-
**(विपीन लोकरे)**
**कार्यकारी दंडाधिकारी,**
**माणगाव, जि. रायगड**

## जाहिर नोटिस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमुद केलेली जमीन मिळकत कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. तशा आशयाची बोलणी विद्यमान मालक श्री.वैभव हरिश्चंद्र वादळ यांचेसोबत चालु आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व बोजा विरहित असल्याचा भरवंसा आमचे अशिलांस विद्यमान मालक यांनी दिला असून सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे,

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| महाळुंगे बुद्रुक ता. मुरूड | २५/३ | २-८९-०० पैकी ०-२०-०० | ०.२२ |

वर नमुद केलेल्या मिळकतीचे एकुण क्षेत्र २-८९-०० हे. आर. पैकी श्री. वैभव हरिश्चंद्र वादळ यांच्या हिश्याची ०-२०-०० ही मिळकत खरेदी-विक्री करण्यापूर्वीच्या जाहिर नोटिशीचा विषय आहे.

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या १४ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

अलिबाग
दिनांक : २३/०२/२०२६

सही/-
**ॲड. राकेश नारायण पाटील**
रा.आगरी पॅलेस, मु.पो.चिंचोटी
ता.अलिबाग, जि.रायगड
मो.नं. ९२७२६२०००५

# वाकस गावाच्या हद्दीत सांडपाण्याचे लोट

## ।। ओल्या रस्त्यावरून विद्यार्थ्यांची पायपीट ।। स्थानिकांचे आरोग्य धोक्यात

**। नेरळ । प्रतिनिधी।**

कर्जत तालुक्यातील उरण-पनवेल-नेरळ भीमाशंकर राज्यमार्ग रस्त्यावर असलेल्या वाकस गावाच्या हद्दीत असलेल्या रस्त्यावरून दिवसरात्र सांडपाणी वाहत आहे.रस्त्यावरून वाहणारे सांडपाण्यांमुळे स्थानिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. याच सांडपाण्याचे ओल्या राहणाऱ्या रस्त्यावरून शाळांचे विद्यार्थी दररोज पायपीट करीत असतात. मात्र, तरी देखील ग्रामपंचायत प्रशासनाला त्याचे काही देणे-घेणे नसल्याचे दिसून येत आहे.

वाकस गावामधून जाणाऱ्या रस्त्यावर घाणीचे साम्राज्य पाहायला मिळत आहे. नेरळ कशेळे हा मार्ग भीमाशंकरकडे जाणारा रस्ता ओळखला जातो. या रस्त्यावरून दररोज शेकडो वाहने ये-जा करीत असतात. नेरळकडून कशेळेकडे जाणाऱ्या रस्त्यावर वाकस येतील आदिवासी वाडीमधून येणारे सांडपाणी वाहत-वाहत रस्त्याने जात असते. त्या वाहत्या पाण्यामुळे अनेक वाहनांच्या ये जा करताना रस्त्याची बाजूने चालणाऱ्या वाटसरु यांच्या अंगावर पाणी उडत आहे. वाहन आल्यानंतर रस्त्याने चालणारे वाटसरु यांना त्या घाण पाण्यापासून स्वतःच बचाव करण्याची काळजी घ्यावी



लागते. समोरून वाहन आले तर रस्त्याने चालणारे प्रवासी किंवा वाहन चालकांच्या अंगावरती ते सांडपाणी उडत असते. त्यात त्या सांडपाण्याला दुर्गंधी असल्यामुळे याचा त्रास प्रवाशांना होत आहे. तसेच रस्त्यालगत गुरांचे शेण आणि घरातील कचरा टाकत असल्याने ही घाण रस्त्यावरती असून रस्त्यावरती घाणीचे साम्राज्य पाहायला मिळत आहे. या रस्त्यावर येणाऱ्या सांडपाण्यामुळे प्रवाशांना नाहक त्रास होते आहे.

या समस्येवर कोणीही आवाज उठवायला तयार नाही असे पाहायला मिळत आहे. कारण हे पाणी अनेक वर्षांपासून रस्त्यावरून वाहत असते. या सांडपाण्याचा स्थानिक ग्रामस्थ आणि वाहनचालकांना त्रास तर होत आहे.

शिवाय लाखो रुपये खर्चून तयार केलेला रस्ता देखील लवकर खराब होण्यास हे सांड पाणी कारणीभूत ठरणार आहे. वाकस येतील आदिवासी वाडीमधून येणारे सांडपाणी हे रस्त्यावरती न येण्यासाठी वाकस ग्रामपंचायतीमधील ग्रामस्थ व ग्रामपंचायतीमध्ये असलेले प्रशासकांना या समस्येबाबत आपली कैफियत सांगितले. त्यावेळी प्रशासक यांच्याकडून ग्रामसभेमध्ये या सांडपाण्याबाबत नियोजन करण्यात आले नाही. या सांडपाण्याकडे वाकस ग्रामपंचायतीमधील प्रशासक यांच्याकडून वारंवार सांगून देखील याकडे दुर्लक्ष करण्याचे काम केले जात आहे. रस्त्यावर येणारे सांडपाणी आणि वर्षानुवर्षे सांडपाण्या होणारा प्रवास कधी संपणार असाही प्रश्न प्रवाशांकडून विचारला जात आहे.

### गटार काढण्याची मागणी

नेरळ कशेळे मार्गावर वाकस येथे प्रवाशांकडून नाराजी व्यक्त केली जात आहे. आदिवासीवाडीमधून येणारे सांडपाणी हे रस्त्याच्या बाजूने गटार काढून ते सांडपाणी रस्त्यावर येणार नाही याची काळजी स्थानिक ग्रामपंचायतीकडून घेण्याची गरज आहे.

---

## निवडक

### खांदा वसाहतीत आढळली दुर्मिळ अळी

**पनवेल :** खांदा वसाहतीत ओलिअंडर हॉक मॉथ या जातीची पतंगाची अळी आढळली आहे. तिच्या डोक्याजवळ दिसणारे मोठे डोळ्यासारखे ठिपके हे शत्रूला घाबरवण्यासाठी असतात. ही अळी प्रामुख्याने कणेर (ओलिअंडर) सारख्या झाडांवर आढळते. पनवेल परिसरात ओलिअंडर हॉक मॉथ या पतंगाची दुर्मिळ व आकर्षक अळी आढळून पाहण्यासाठी निसर्गप्रेमींनी गर्दी केली होती. हिरवट-करड्या रंगाची व डोक्याजवळ मोठे डोळ्यासारखे ठिपके असलेली ही अळी नागरिकांचे लक्ष वेधून घेत आहे. कणेरसारख्या झाडांवर ती प्रामुख्याने आढळते. शत्रूपासून संरक्षणासाठी डोळ्यासारखी चिन्हे ही तिची खास वैशिष्ट्ये आहेत. पर्यावरणातील जैवविविधतेचे हे एक सुंदर उदाहरण असल्याचे निसर्गप्रेमींनी सांगितले आहे.





### पनवेल वाहतूक पोलीस दलाचा सत्कार

**पनवेल :** पनवेल रेल्वे स्टेशन परिसरात फॉर्च्युनर कारमधून बेकायदेशीर पिस्तूल हस्तगत करण्याची धाडसी कारवाई तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे मोटरसायकल स्कुटीच्या डिक्कीतून गांजा जप्त करण्याची उल्लेखनीय कामगिरी पनवेल शहर वाहतूक पोलीस दलाने केली. या कारवाईमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना अधिक दृढ झाली आहे. सदर कारवाईत पनवेल वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर पाटील, पोलीस उपनिरीक्षक जीवन शेरखाने, पोलीस हवालदार आमिर मुलाणी, पोलीस हवालदार युवराज येळे, पोलीस नाईक राकेश राजपूत व पोलीस शिपाई महेंद्र बुट्टे यांनी सक्रिय सहभाग घेत महत्त्वाची भूमिका बजावली. या उल्लेखनीय व धाडसी कामगिरीबद्दल मिलिंद भारंबे, पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांच्या हस्ते संबंधित अधिकारी व अंमलदारांचा विशेष प्रमाणपत्र व बक्षीस देऊन गौरव करण्यात आला. पोलीस प्रशासनाच्या या प्रभावी कारवाईमुळे गुन्हेगारी प्रवृत्तींना स्पष्ट संदेश मिळाला असून कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस दल कटिबद्ध असल्याचे पुन्हा अधोरेखित झाले आहे.

### महाआरोग्य शिबिराला प्रतिसाद

**श्रीवर्धन :** रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन येथे शिवसेना व जिजाऊ शैक्षणिक व सामाजिक संस्था, महाराष्ट्र (रायगड विभाग) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित भव्य मोफत महाआरोग्य शिबिर व नेत्र तपासणी शिबिर उत्साहात संपन्न झाले. उपजिल्हा रुग्णालय, श्रीवर्धन येथे सकाळी १०.०० पासून पार पडलेल्या या शिबिरास नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या महाआरोग्य शिबिरात जनरल सर्जरी, बालरोग, कॅन्सर, किडनी, एमडी मेडिसिन, स्त्रीरोग, ऑर्थोपेडिक तसेच हृदयरोग विभागातील तज्ज्ञ डॉक्टरांनी नागरिकांची तपासणी करून आवश्यक मार्गदर्शन केले. मधुमेह, उच्च रक्तदाब, दमा, किडनी स्टोन, स्तनाचा कॅन्सर, प्रोस्टेट, गर्भाशयाशी संबंधित आजार, फ्रॅक्चर, स्पाईन समस्या तसेच अँजिओग्राफी व अँजिओप्लास्टी संदर्भातील सल्ला देण्यात आला. बालकांसाठी विशेष तपासणी सुविधा तसेच नवजात शिशूंसाठी मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यात आले. नेत्र तपासणी विभागात डोळ्यांची सखोल तपासणी करण्यात आली असून गरजू रुग्णांना मोफत चष्म्यांचे वाटप करण्यात आले. दृष्टीदोष असलेल्या अनेक नागरिकांना या उपक्रमाचा विशेष लाभ झाला. या शिबिरासाठी पिंट्या वेश्वीकर, सावन तवसाळकर, देवेंद्र भुसाने, उपजिल्हा रुग्णालय श्रीवर्धन प्रशासन तसेच सर्व पदाधिकारी यांचे विशेष सहकार्य लाभले आयोजकांच्या वतीने सर्व उपस्थित नागरिक, वैद्यकीय अधिकारी, स्वयंसेवक आणि सहकार्य करणाऱ्या सर्व घटकांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले असून भविष्यातही अशाच समाजहिताच्या उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली.


### क्लासिफाईड
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- **हॉस्पिटलमध्ये काम करण्यास हवे आहेत.** १) नर्स ANM/GNM २) नर्स PRIVATE NURSING COURSE ३) मुले/मुली १२ वी पास ४) X-Ray साठी मुले ५) मावशी/आयाबाई आधारकार्ड व अनुभव असल्यास प्रमाणपत्र आणावे. अंजली हॉस्पिटल अलिबाग. ७७४५०५००२५/९११९५६५०२२/९३२१३०३९३८
- **शिवाजी पेटशॉप अलिबाग /चोंढी**/ पेण येथे कामासाठी कमीत कमी १२ वी पास मुलगी पाहिजे. ९२७२३८३४७६

**जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१**


---

### संजय भोईर यांना पितृशोक

**पाली /बेणसे :** पेण पंचायत समितीचे माजी सभापती तथा विद्यमान पंचायत समिती सदस्य, संजय भोईर यांचे वडील धाया भोईर यांचे वयाच्या ८३ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या



पश्चात १ मुलगा, सून, २ मुली, जावई, नातवंडे पतवंडे असा मोठा परिवार आहे. धाया भोईर हे अनेक वर्ष नोकरीनिमित्त मुंबईत वास्तव्यास होते. त्यांच्या अंत्ययात्रेस सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, राजकीय, शासकीय विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. धाया भोईर यांच्या रूपाने ज्येष्ठ मार्गदर्शक हरपल्याची शोकाकुल प्रतिक्रिया उपस्थित मान्यवरांकडून देण्यात आली.

### जेएसएममध्ये राज्यशास्त्र विषयावर व्याख्यान

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

जे.एस.एम. महाविद्यालयात राज्यशास्त्र विभागाद्वारे राज्यशास्त्र विषयातून करिअरच्या संधी या विषयावर व्याख्यान आयोजीत करण्यात आले होते. या व्याख्यानासाठी वीर वाजेकर महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. संदीप घोडके प्रमुख व्याख्याते म्हणून उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. आय पी. कोकणे, उपप्राचार्य डॉ. प्रविण गायकवाड, डॉ. पंकज घरत, प्रा. मोनिका पाटील व विद्यार्थी उपस्थित होते.



सदर कार्यक्रमाचे आयोजन जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष ॲड. गौतम पाटील व महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सोनाली पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. डॉ. संदीप घोडके यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले कि, राज्यशास्त्र विषयातुन विद्यार्थ्यांना भविष्यात विविध क्षेत्रांमध्ये करिअरच्या संधी उपलब्ध आहेत.

विविध स्पर्धा परीक्षामध्ये विद्यार्थ्यांना राज्यशास्त्र विषयाची विशेष मदत होते. तसेच प्रा. डॉ. संदीप घोडके यांनी विद्यार्थ्यांनी समाजातील एक जागरूक नागरिक म्हणून आपले हक्क आणि कर्तव्य काय आहेत याची जाणीव ठेऊन वर्तन करावे असे आवाहन केले. प्रास्ताविक राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. आय. पी. कोकणे यांनी केले तर सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन डॉ. पंकज घरत यांनी केले होते.

### पनवेलमध्ये सुक्या मिरच्यांची रेलचेल

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

शहरातील प्रसिद्ध मिरची गल्लीमध्ये उन्हाळा सुरू होताच विविध प्रकारच्या सुक्या मिरच्यांची रेलचेल पाहायला मिळत आहे. लालभडक मिरच्यांचे ढीग, मसाला बनवण्याची लगबग आणि दरवळणारा तिखटाचा सुगंध यामुळे संपूर्ण परिसर गजबजला आहे. बाजारात गुंटूर सन्नम, तेजा, ब्याडगी, काश्मिरी, लवंगी, संकेश्वर, ज्वाला, धनी तसेच कोल्हापुरी लवंगी अशा विविध मिरच्या विक्रीसाठी उपलब्ध आहेत. रंगासाठी ब्याडगी व काश्मिरी मिरचीला मागणी असते, तर जास्त तिखटपणासाठी गुंटूर सन्नम आणि तेजा मिरचीची खरेदी केली जाते. मात्र, यंदा मोठ्या प्रमाणावर झालेल्या पावसामुळे विशेषतः आंध्र प्रदेशातील मिरची पिकांवर परिणाम झाला आहे. त्यामुळे घाऊक बाजारात दर वाढले असून त्याचा परिणाम किरकोळ विक्रीवरही दिसून येत आहे. तरीही



मसाला तयार करण्यासाठी आणि वर्षभराच्या साठ्यासाठी नागरिकांची खरेदी सुरूच आहे. पनवेलची मिरची गल्ली पुन्हा एकदा लाल तिखटाच्या रंगात न्हाऊन निघाली असून वाढलेल्या किमतींनाही न जुमानता ग्राहकांचा उत्साह कायम आहे.

### स्मशानभूमीतील निवारा शेड नादूरुस्त

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

श्रीवर्धन येथील मठाच्या स्मशानभूमीमध्ये असलेली नागरिकांना मयतावर आल्यावर बसण्यासाठी तयार केलेली निवारा शेड गेल्या अनेक दिवसांपासून पूर्णपणे मोडून गेली आहे. त्यावरील छप्पर तुटून पडून गेले आहे. याबाबत अनेक वेळा नगरपरिषद प्रशासनाकडे तक्रारी देखील करून झाल्या. परंतु नगरपरिषद प्रशासनाकडून निवारा शेडची दुरुस्ती करण्यासाठी कोणत्याही प्रकारची कारवाई करण्यात येत नाही. मठाची स्मशानभूमी या ठिकाणी श्रीवर्धन नगरपालिकेसह



आराठी ग्रामपंचायत हद्दीतील मेटकर्णी, आराठी परिसरात कोणाचेही मयत झालास त्यांचा अंत्यविधी करण्यासाठी मयत मठाच्या स्मशानभूमीमध्ये आणले जाते.

तसेच गावातील देखील सर्वात जास्त अंत्यविधी याच स्मशानभूमी मध्ये केले जातात. त्या ठिकाणी तीन लाकडाने जाळण्याच्या शवदाहिन्या असून नगरपालिकेने कोट्यावधी रुपये खर्च करून गॅस शवदाहीनी देखील बांधली आहे. परंतु शहरातील नागरिकांकडून केवळ अंधश्रद्धेपोटी गॅस शवदाहीनीचा वापर होताना दिसत नाही. लाकडाने अंत्यविधी करण्याच्या शवदाहिन्यांचे लोखंडी पोल पूर्णपणे वाकून गेले आहेत. त्याचीही दुरावस्था झालेली आहे. त्याचप्रमाणे या ठिकाणी मयतावर येणाऱ्या जेष्ठ नागरिकांना किंवा वृद्ध लोकांना उन्हात किंवा पावसात उभे राहावे लागते. याकडे अनेक वेळा लक्ष वेधून सुद्धा नगरपरिषद प्रशासन पूर्णपणे जाणीवपुर्वक दुर्लक्ष करत असल्याचे दिसून येत आहे.

### छ.शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिरास प्रारंभ

**। सुधागड-पाली । प्रतिनिधी ।**

महसूल व वन विभागाच्या निर्देशानुसार रायगड जिल्ह्यात 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर' अभियानाच्या टप्पा क्र. १ ची अंमलबजावणी सुरू करण्यात आली आहे. या अभियानाचे आयोजन रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे व निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के यांच्या मार्गदर्शनाखाली, तहसीलदार तथा सुधागड तालुका कार्यकारी दंडाधिकारी उत्तम कुंभार यांच्या नेतृत्वाखाली मंडळ स्तरावर करण्यात येत आहे.




अभियानाचे प्रमुख उद्दिष्ट नागरिकांच्या महसुली तक्रारींचे तात्काळ निराकरण करणे, प्रलंबित प्रकरणांचा आढावा घेऊन जलदगतीने निर्णय करणे, प्रशासन व नागरिक यांच्यात थेट संवाद प्रस्थापित करणे तसेच विविध दाखल्यांशी संबंधित अडचणी दूर करणे हे आहे. सातबारा उतारे, फेरफार नोंदी, नामांतरण व वारस नोंद प्रक्रिया, उत्पन्न, जाती व निवासी दाखले यांसारख्या सेवांचे निवारण या शिबिरांमधून करण्यात येणार आहे. सुधागड-पाली तहसीलदार उत्तम कुंभार यांनी नागरिकांनी संबंधित कागदपत्रांसह शिबिरात उपस्थित राहून शासनाच्या या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे.

अभियानांतर्गत १८ फेब्रुवारी ते ५ मार्च २०२६ या कालावधीत पूर्व तयारी करण्यात येणार असून प्रत्यक्ष शिबिरांची सुरुवात ७ मार्चपासून होणार आहे.

### सोन्याच्या हंड्यांच्या अफवेला पूर्णविराम

**। रोहा । प्रतिनिधी ।**

रोहा तालुक्यातील वरसे येथील अनंत दगडू पवार व त्यांची बहीण शीतल पवार यांची आई निर्मला पवार यांचे हृदयविकाराने निधन झाल्यानंतर घरातील काही साहित्य नकळतपणे नाल्यात टाकण्यात आले होते. या दरम्यान परिसरात खेळणाऱ्या काही मुलांना नाल्यात पडलेले साहित्य संशयास्पद वाटल्याने नागरिकांनी तात्काळ ही बाब पोलिसांच्या निदर्शनास आणून दिली. माहिती मिळताच पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी भेट देऊन तपासणी केली असता त्यामध्ये सुमारे १० तोळे वजनाचे सोन्याचे दागिने आढळून आले. दागिन्यांमध्ये घरचा पत्ता व नावाची ओळख सापडल्याने पोलिसांनी संबंधित कुटुंबाचा शोध घेऊन चौकशी केली. खात्री



झाल्यानंतर सदरचे मौल्यवान दागिने रविवारी (दि.२२) रोजी आनंद पवार व शीतल पवार यांना सुपूर्द करण्यात आले. अशा रितीने चार सोन्याचे हंड्यांच्या अफवेला अखेर पूर्णविराम लागला आणि साऱ्यांनी सुटकेचा निःश्वास सोडला.

या प्रकरणात मुलांची जागरूकता आणि पोलिसांची तत्पर कार्यवाही दिसून आल्याने पवार कुटूंबीयांचे मोठे नुकसान टळले असून दागिने परत मिळाल्याने पवार कुटुंबीयांनी रोहा पोलिसांचे आभार मानले.

### तळ्यात रिसर्च कोर्स वर्कचे आयोजन

**। तळा । प्रतिनिधी ।**

द.ग. तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालय तळा राज्यशास्त्र संशोधन केंद्राच्या माध्यमातून पीएच.डी कोर्स वर्कचे आयोजन ५ ते २८ फेब्रुवारी या कालावधीत करण्यात आले आहे. हा रिसर्च कोर्स वर्क पीएचडी पदवीसाठी प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांना करणे अनिवार्य असते.

या कोर्स वर्कच्या माध्यमातून संशोधनातील वेगवेगळ्या पैलूंचा, त्या दृष्टीने असणाऱ्या पद्धतींचा, संशोधनाची शिस्त बाळगण्यासाठी आवश्यक असणाऱ्या घटकांचा व संशोधन करत असताना वापरण्यात येणाऱ्या विविध तंत्रांचा कसा वापर करावा, त्याचा कसा आधार घ्यावा याची इत्यंभूत माहिती देण्यात येत आहे.

या वर्कचे उद्घाटन मुंबई विद्यापीठ राज्यशास्त्र अभ्यास मंडळाच्या चेअरमनप्राचार्य डॉ अमृता देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी की नोट स्पीकर म्हणून सीनियर प्राध्यापक डॉ.गायकवाड (पुणे) हे उपस्थित होते.

कोर्स वर्कससाठी देशभरातील ९ विद्यापीठातील संशोधक विद्यार्थी, प्राध्यापकांसह ११० पेक्षा प्राध्यापक, संशोधक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला असून या सहभागी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी देशातील ८ विद्यापीठातील रिसर्चच्या क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या वेगवेगळ्या मान्यवरांचे मार्गदर्शन आयोजित करण्यात आलेले आहे.

या रिसर्च कोर्सचे कन्व्हीनर म्हणून वीर वाजेकर महाविद्यालय फुंडे, द. ग. तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालय राज्यशास्त्र रिसर्च सेंटरचे संशोधन मार्गदर्शक डॉ संदीप घोडके, डॉ भगवान लोखंडे, डॉ. तृप्ती थोरात, प्राचार्य डॉ नानासाहेब यादव यांनी मेहनत घेतली आहे. संस्थेचे विश्वस्त नंदकुमार वेदक, मारुती शिर्के, विठ्ठल जोशी, मंगेश देशमुख, पुरुषोत्तम मुळे, महेंद्र कजबजे, चंद्रकांत रोडे, संस्थेचे सर्व पदाधिकारी, महाविद्यालय विकास समितीचे सदस्य या सर्वांनी या रिसर्च कोर्सच्या यशस्वी आयोजनाबद्दल रिसर्च सेंटरचे मनापासून कौतुक केले आहे.

### म्हसकरवाडी शैक्षणिक साहित्य वाटप

**सुतारवाडी :** राजिप प्राथमिक शाळा म्हसकरवाडी, ता. रोहा येथे शैक्षणिक साहित्याचे वाटप लता जाधव, सुमन जाधव त्यांच्या वतीने करण्यात आले. सुरुवातीला शाळेचे शिक्षक गो. पु. मोटे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. वही, पेन, पेन्सिल, कंपास, पाऊच, तसेच खाऊ वाटण्यात आले. त्यावेळी शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा, मंगल म्हसकर, सागर पाटेकर, प्रमोद पवार, सुनील सावंत, तसेच माता पालक वर्ग, सर्व सदस्य माजी विद्यार्थी ग्रामस्थ उपस्थित होते. हर्षदा मंचेकर यांनी उपस्थित त्यांचे आभार मानले.

---

#### गावठी वालाच्या शेंगांचे खास आकर्षण | हॉटेल,कॉटेजच्या मेनूमध्ये याचा समावेश

## रायगडात मडक्यातील पोपटीची मेजवानी

**। पाली /बेणसे । प्रतिनिधी ।**

पाली सुधागडसह रायगड जिल्ह्यात पोपटी प्रसिद्ध आहे. सध्या येथे पोपटीचे वेगवेगळे ट्रेंड देखील सुरू आहेत. या अनोख्या प्रकारच्या पोपटीची मागणी देखील खूप आहे. शाकाहारी व मांसाहारी पोपटी उपलब्ध आहे. विशेष म्हणजे मडक्यात वाफेवर पदार्थ शिजवलेल्या या पोपटीची चव इतकी भारी की, फाईव्ह स्टार हॉटेलच्या पदार्थाला चवीत मागे टाकले जाईल. याच लज्जतदार पोपटीची रायगडात मेजवानी सुरु झाली आहे.

विदर्भात, खानदेशात ज्याप्रमाणे ज्वारी व बाजरीच्या कणसांना भाजून केलेला हुरडा प्रसिद्ध आहे. त्याप्रमाणेच



जिल्ह्यामध्ये गावठी वालाच्या शेंगांची वैशिष्ट्यपूर्ण व लज्जतदार पोपटी प्रसिद्ध आहे. वालाच्या शेंगा भामरुडाच्या पाल्यात मडक्यामध्ये मोकळ्या आगीवर विशिष्ट पद्धतीने शिजवल्या जातात. यालाच पोपटी असे म्हणतात. काही ठिकाणी मडक्या ऐवजी पत्र्याचा डब्बा सुद्धा वापरला जातो. पोपटीत वालाच्या शेंगांबरोबर कांदा, बटाटा, रताळी तसेच अंडी, चिकन, मसाळी व चिंबोऱ्या घालून लज्जत वाढवली जाते. वालाबरोबर मटारच्या शेंगा देखील टाकतात. ठिकठिकाणी शेतावर तसेच मोकळ्या जागेवर, फार्म हाऊस व घराबाहेर मोकळ्या जागेत आदी ठिकाणी या पोपटी पार्ट्यांची धूम पाहायला मिळते. काही ठिकाणी काव्यसंमेलन रंगतात तर गप्पा गोष्टींच्या मैफिलीमध्ये सुखदुःखाची देवाणघेवाण सुद्धा होते.याशिवाय येथील काही हॉटेल व कॉटेज व्यवसायिकांनी आपल्या मेनूमध्ये पोपटीचा समावेश केला आहे. सध्या पर्यटनाचा हंगाम सुरू असल्याने पर्यटक देखील पोपटीची मजा लुटतात.

> **“ शेतात लावलेल्या पावट्याच्या शेंगा वापरून पोपटी बनवली आहे. कारण अजून गावठी वालाच्या शेंगा येण्यास वेळ आहे. पोपटी पार्टीच्या निमित्ताने घरातील सर्व मंडळी एकत्र येतात. महिला, ज्येष्ठ व लहानमुले विशेष आनंद घेतात. पोपटीचा आस्वाद घेता घेता गप्पा गोष्टी रंगतात. या हंगामात दरवर्षी कुटुंबियांसोबत पोपटीचा बेत केला जातो. -किशोर ठाकूर, शिहू तरशेत ”**

### गावठी वालाच्या शेंगा

जिल्ह्याच्या मातीत पिकविलेल्या चवदार टपोऱ्या दाण्याच्या गावठी वालाच्या शेंगांच्या पोपटीला अधिक पसंती आहे. मात्र स्थानिक गावठी शेंगा येत आहेत. मात्र त्या खूप महाग आहेत. शिवाय काही शेतकऱ्यांनी आपल्या शेतात लावलेल्या पावट्याच्या शेंगा सुद्धा पोपटीसाठी वापरतात. स्थानिक गावठी वालांच्या पोपटीतील वालाच्या शेंगा कितीही खाल्या तरी त्या पोटाला बाधत नाही हे त्यांचे वैशिष्ट आहे.

### भांबुर्डीच्या पाल्याचे विशेष महत्व

याला गोरखमुंडी, वसई-विरारमध्ये बोडथोला, काही ठिकाणी कोंबडा तर रायगडमध्ये भांबुर्डी किंवा भामरुड असे म्हणतात. या पाल्यात औषधी गुणधर्म असतात. पोपटीमध्ये हा पाला टाकल्याने पाणी नसतांना देखील याच्या वाफेवर शेंगा चांगल्या शिजतात. तसेच वालच्या शेंगा पोटाला बाधत नाहीत आणि लज्जतदार चव देखील येते.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटिशीद्वारे कळविण्यात येते कि, आमचे अशील यांनी खालील वर्णनाची जमीन मिळकत, मिळकतीचे मालक श्री.मदन धर्मा दरणे व इतर यांचे सामाईक मालकीची मिळकत विकत घेण्याचे ठरविले असून तशी बोलणी चालू आहेत. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| पाझर | ५७ | ०-४४-९० पो.ख. ०-०३-८० एकूण ०-४८-७० | १०.३६ |

सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी दिलेला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकारार, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क, व हितसंबंध वा दुरान्वये संबंध असल्यास अशा व्यक्तीनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात, कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार याजकडे हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसाचे मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कोणाचीही, कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध असून तिचे मार्केटेबल टायटल क्लिअर आहे, असे समजून खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करू. व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारची हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग
दि. २१/०२/२०२६

**(ॲड.वैभव गिरीधर पाटील)**
जिल्हा न्यायालय अलिबाग, रायगड
मु.सांबरी, पो. कुर्डुस,
ता. अलिबाग, जि. रायगड
मो.नं. ८८०५५१८०६८

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की आमचे अशिल यांनी खालील नमूद केलेल्या मिळकतीमधील क्षेत्र कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे विद्यमान मालक यांचेसोबत मिळकतीच्या विक्री व्यवहार बाबत चर्चा झालेली आहे. सदरच्या मिळकती ह्या निर्वेध व बोजाविरहीत असल्याचा भरवसा आमचे अशिलांस विद्यमान मालक यांनी दिला असून सदर मिळकतींचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमच्याकडे दिलेले आहे. त्या मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकारणी (रु. पैसे) |
|---|---|---|---|
| पोयनाड ता. अलिबाग जि.रायगड | १३९/२ | ०.७९.७० पो.ख. ०.१४.४० एकूण क्षेत्र ०.९४.१० | १९.०० |
| श्रीगांव ता. अलिबाग जि. रायगड | २८२ | ०.७३.०० पो.ख. ०.१६.०० एकूण क्षेत्र ०.८६.०० | १.३१ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीमधील १) भुमापन क्र व उपविभाग क्र.१३९/२ मधील श्री. दिपक अशोक चवरकर ह्यांच्या मालकी हिश्याचे क्षेत्र ०.३९.८० हे.आर पो.ख. ०.०७.२० हे. आर एकूण क्षेत्र ०.४७.०० हे.आर आकार रू.९.३९ पैसे २) भुमापन क्र. व उपविभाग क्र. २८२ मधील श्री. दिपक अशोक चवरकर ह्यांच्या मालकी हिश्याचे रस्तासाठी वापरात असलेले क्षेत्र ०.०५.०० हे.आर आकार रू ०.०९ पैसे ह्यापैकी ०-०२-५० हे.आर इतक्या क्षेत्राच्या मिळकती जाहीर नोटीसचा विषय आहे. संदर्भित मिळकतींत अन्य कोणाच्याही, कसल्याही तऱ्हेचे कायदेशीर हक्क, अधिकार व हितसंबंध असल्यास अगर सदर मिळकती बाबत साठेकरार, बयाणापावती, तारणगहाण, दान, बक्षिस खरेदीखत, अगर कोणत्याही मार्गाने गुंतविलेली असल्यास त्यांनी त्यांची हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ७ (सात) दिवसांचे आत खाली सही करणार ॲडव्होकेट यांचे पत्त्यावर अथवा रजिस्टर्ड पोस्टाने किंवा प्रत्यक्ष भेटून कळवाव्यात.

जर वरील मुदतीत कुणाचीही लेखी हरकत प्राप्त न झाल्यास सदर जमिन मिळकत ही निर्वेध आहे असे गृहित धरून मागाहून आलेल्या हरकती जाणीवपूर्वक सोडून दिलेल्या आहेत असे गृहित धरून आमचे आशिल सदरहू जमिन मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. यांची नोंद घ्यावी. हे कळावे

ठिकाण : अलिबाग
दिनांक : २३/०२/२०२६.

**डॉ.ॲड. निहा अनिस राऊत**
लब्बैक, इस्त्रायल आळी अलिबाग
मो.नं. ९८२२०६८५२६

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी सुधागड यांचे न्यायालयात

क्र. फौजदारी/कात-९/आवक क्र. ४१७/२०२५

श्री.चंद्रकांत रामभाऊ सुतार, रा.गोमाशी पो. नांदगाव ता. सुधागड. जि. रायगड — वादी

विरुद्ध

ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत गोमाशी ता. सुधागड. जि. रायगड — प्रतिवादी

**जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ मधील कलम १३ (३) प्रमाणे जन्म-मृत्युबाबत**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविणेत येते की, श्री. चंद्रकांत रामभाऊ सुतार, रा. गोमाशी पो.नांदगाव ता. सुधागड जि. रायगड यांनी त्यांचे वडील रामभाऊ गौरु सुतार यांचा मृत्यू दिनांक ०३/०८/१९९९ रोजी मौजे गोमाशी ता. सुधागड जि. रायगड येथे झाला आहे. परंतु त्याची नोंद अद्यापपर्यंत ग्रामपंचायत कार्यालयात केली नाही. असे प्रतिज्ञापत्रात नमुद करून त्यांच्या मृत्यू नोंदीचा आदेश मिळणेबाबत अर्ज तहसिल कार्यालय सुधागड येथे सादर केला आहे.

सदर रामभाऊ गौरु सुतार यांच्या मृत्यू नोंदीच्या तारखेबाबत कोणाची हरकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत तहसिल कार्यालय, सुधागड पाली येथे स्वतः अथवा आपल्या प्रतिनिधीमार्फत लेखी स्वरूपात हरकत दाखल करावी. जर सदर मुदतीत हरकत न आल्यास अर्जदार यांनी सादर केलेल्या पुराव्याच्या आधारे मृत्यू नोंद करण्याचे आदेश पारीत करणेत येईल. असे या जाहीर नोटीसीद्वारे प्रसिद्ध करणेत येत आहे.

ठिकाण :- सुधागड पाली
दिनांक :- ११/०२/२०२६

सही/-
**(उत्तम कुंभार)**
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी सुधागड**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरिता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरु आहे. सदरील मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे झुगरेवाडी, ता. कर्जत, जि.रायगड**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| ३०/१ | एकूण क्षेत्र ०-११-०० हे.आर. | ०.०३ |

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून तीन दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक :-२४/०२/२०२६

**ॲड. रोहित रो. मानकवळे**
मो.नं. ९०२८८१७९३०
पत्ता:- हाउस नं.१४१-बी, हनुमान मंदिर जवळ,
मु.पो. कामार्ली, ता.पेण, जि.रायगड पिन नं.४०२१०७

## कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)

सादर सेवा

**खुली ई-निविदा आमंत्रण सूचना**

प्रधान मुख्य अभियंता, कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लि., आयआरईपीएस पोर्टलवर ई-निविदा द्वारे एकल बोली प्रणाली अंतर्गत पात्र कंत्राटदारांकडून खालील कामासाठी खुल्या निविदा मागवित आहेत. **कामाचे नाव:** महाराष्ट्र राज्यातील वरिष्ठ प्रादेशिक अभियंता, रत्नागिरी विभागाच्या कार्यक्षेत्रातील कि.मी. 0/800 ते 378/100 दरम्यान चिन्हांकित पट्ट्यांवर 52 किग्रॅ., 260 मीटर रेल पॅनलसह 26 ट्रॅक कि.मी. (टिकेएम) लांबीसाठी रेल नूतनीकरण करणे. **निविदा सूचना क्र.: केआर-डब्ल्यू-1-58-2025-28. अंदाजित किंमत:** ₹1,89,69,104/- (जीएसटी वगळून). बंद होण्याची दिनांक/वेळ: 17.03.2026 रोजी 15:00 वाजेपर्यंत ऑनलाइन ऑफर/बोली सादर करण्यासाठी. **पूर्णत्व कालावधी:** तीन महिने (मान्सून कालावधी वगळून). मॅन्युअल ऑफर स्वीकारल्या जाणार नाहीत. तपशील/सहभागासाठी कृपया https://ireps.gov.in या संकेतस्थळास भेट द्या. शुद्धीपत्रक / परिशिष्ट केवळ याच संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येतील.

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**अपर तहसिलदार कार्यालय पनवेल**
दुसरा मजला, प्रशासकीय भवन, कर्मवीर भाऊराव पाटील चौक, आद्य क्रांतीकारक वासुदेव फडके नाट्यगृहच्यासमोर, ता. पनवेल, जि. रायगड
पिनः ४१०२०६ Email : uppertahsildarpanvel@gmail.com

पत्र क्र.मशा/फौजदारी/कात-८/ मृत्यू/६७७५/२०२६ दि.१३/०२/२०२६

**'नोटीस'**

विषय:- उशिरा मृत्यू नोंद करणेबाबत.
संदर्भ :- अर्जदार सौ.सिंधु उर्फ शेवंता नारायण म्हात्रे पूर्वाश्रमीचे शेवंता महादु कमाणे,यांचा दि. ११/१२/२०२५ रोजीचा अर्ज.

उपरोक्त विषयाकामी अर्जदार सौ. सिंधु उर्फ शेवंता नारायण म्हात्रे पुर्वाश्रमीचे शेवंता महादु कमाणे, रा.मु. चिरनेर, ता.उरण, जि.रायगड रायगड यांनी त्यांची आई कै. फशी महादु कमाने यांचा उशिरा मृत्यू नोंदीचा आदेश मिळणेकामी अपर तहसिलदार कार्यालय पनवेल यांच्या कार्यालयाकडे अर्ज केला आहे.

प्रकरणी सदर अर्जाकामी दिनांक १३/०३/२०२६ रोजी सकाळी १२.०० वाजता या कार्यालयाकडे सुनावणी ठेवण्यात आलेली आहे. सबब सदर मृत्यू नोंदीस आपली हरकत असल्यास, सदरची हरकत लेखी स्वरुपात अपर तहसिलदार कार्यालय पनवेल यांचेकडे सुनावणी पुर्वी सादर करावी. सुनावणी नंतर हरकत प्राप्त झाल्यास मान्य करण्यात येणार नाही. हरकत प्राप्त न झाल्यास आपणांस काही एक सांगायचे नाही हे गृहीत धरुन अर्जदार यांच्या अर्जाकामी पुढील नियमोचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**अपर तहसीदार पनवेल करिता**

## जाहीर नोटिस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल वैभव कृष्णा धाकवल हे खालील वर्णनाच्या मिळकती सदर मिळकतीच्या विद्यमान मालक अपुर्वा गणेश कानडे, राजू कोंडीराम मोरे, मालकांकडून कायम खरेदी करणार असून तशी बोलणी आमचे अशिल व खालील वर्णन केलेल्या मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेमध्ये सुरु आहे.

**मिळकतीचे वर्णन : -**
**मौजे दहिगाव, तालुका सुधागड, जिल्हा रायगड येथील**

| सर्वे नंबर | क्षेत्र | आकार |
|---|---|---|
| ८/४ | १-२१-०० पैकी प्लॉट नंबर १ लिहून देणार यांच्या हिश्याची ०-२०-० गुंठे | ०-३१ |

वरील मिळकत पूर्णपणे निर्वेध असल्याची खात्री मिळकतीच्या मालकांनी आमचे अशिलांस दिली असून, मिळकतीचे मालक आमचे अशिलांचे लाभांत खरेदीखत करून देणार आहेत. तरी पैकी वरील मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही भाडेकरार, साठेकरार, फरोक्त, वारसा, गहाण, दान, बक्षीस, वहीवाट, पोटगी, मृत्यूपत्रान्वये अथवा अन्य हक्क असल्यास अशा व्यक्तींनी त्यांच्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून (७) दिवसांचे आत कळवाव्यात. सदर मुदतीमध्ये कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

दि. २४/०२/२०२६
ठिकाण- पाली सुधागड

सही /-
**ॲडव्होकेट. तुषार गणेश कानडे**
कार्यालय-कळंब रोड कॉर्नर,
जवळ हॉटेल अन्नपूर्णा, जांभुळपाडा, तालुका सुधागड, जिल्हा रायगड पिन-४१०२०५
मोबाईल नंबर-९१६८८०१०४८

## नोटीस

सर्व जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे नमुद मौजे भोईघर, ता. मुरूड, जि. रायगड येथील मिळकत आमचे अशिल यांनी विद्यमान मालक सचिन मधुकर पाटील यांचेकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी, या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत, दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/गहाण इ. स्वरूपाचे हक्क व हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पूर्ण करतील व तद्नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे

**मौजे भोईघर, ता. मुरुड, जि. रायगड**

| मौजे | गट क्रमांक व उपविभाग | एकुण क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु. पैसे) |
|---|---|---|---|
| भोईघर ता. मुरूड | ११३ | क्षेत्र ०-३५-१० पो.ख. ०-००-२० एकूण क्षेत्र ०-३५-३० | ५.४४ |

वर नमुद मिळकतीमधील खाते क्र. ५३२ श्री. सचिन मधुकर पाटील यांच्या नावे असलेले क्षेत्र ०-२०-०० हे.आर., आकार ३.१०/- रु. पैसे या जमिन मिळकतीबाबतचे

दिनांक २४/०२/२०२६

अशिलांची सही

**ॲड. समीर सुरेश नाईक**
जिल्हा न्यायालय रायगड अलिबाग
ऑफिस पत्ता : फ्लॅट नं. १०३, पहिला मजला,
बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट जे. एस. एम कॉलेज
जवळ, अलिबाग- रायगड मोबा. ९७६७०१०९०२

## जाहिर नोटीस

सर्व संबंधितांना याद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी मौजे किहिम, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जिरायत जमिन मिळकत ही कायमस्वरूपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून व त्या आशयाचा साठेकरार दिनांक ०९.०४.२०२५ रोजी संदर्भित मिळकतीचे विद्यमान मालक व कब्जेदार श्री. अनंत दत्तात्रेय पेडणेकर वगैरे ५ यांच्या बरोबर स्वाक्षरीत झालेला आहे.

संदर्भित मिळकत ही पूर्णतः निर्वेध, बोजाविरहीत व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालक व कब्जेदाराने माझ्या अशिलांना दिला आहे. सदर जमीन मिळकत ही भोगवटादार वर्ग २ असून त्याची विक्री परवानगी विद्यमान मालक व कब्जेदार यांनी घेतलेली आहे. या उपरही सदर मिळकतीत अन्य कोणाच्याही कसल्याही तऱ्हेचे हक्क, अधिकार व हितसंबंध असल्यास तसेच गहाण, दान, बक्षिस, साठेकरार, वहिवाटहक्क, फरोक्तखत असल्यास त्यांनी त्यांची हरकत ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून १४ दिवसांच्या कालावधीत लेखी पुराव्यानिशी माझी खात्री पटवून द्यावी.

विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास माझे अशिल निम्नलिखीत मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील. तद्नंतर मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

**-: मिळकतीचे वर्णन : -**

| मौजे | भूमापन क्र. | उपविभाग | क्षेत्र (हे.आर) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|---|
| किहिम ता. अलिबाग जि. रायगड | २८३ | २/३ | १-०५-१० पो.ख.०-२६-५० एकूण १-३१-६० | १३.३६ |

सदर वर नमूद जमीन मिळकतीपैकी पूर्वेकडील ०-२०-०० हे.आर ही या जाहीर नोटीसीचा विषय आहे.

ठिकाण : अलिबाग,
दिनांक :- २४/०२/२०२६.

**ॲड. सुधाकर पी. प्रभू**
'साईलिला' सी.एच.एस., 'ए विंग' रूम नं. १०३,
चेंढरे,ता. अलिबाग, रायगड
मोबाईल नं. ९८२२७९६८३०

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांची खालील वर्णनाची मिळकत, मिळकतीचे विद्यमान मालक श्री.संजीव सुरेंद्र गोखले, रा.मालाड (पश्चिम) मुंबई यांचेकडुन कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे. सदरची मिळकत निर्वेध बोजाविरहीत असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र हे.आर., | आकार |
|---|---|---|---|
| चौल ता.अलिबाग | १४४२ | क्षेत्र ०-२०-२० पो.ख. ०-०१-०० एकूण क्षेत्र ०-२१-२० | ११.८८ |

वरील वर्णनित मिळकतीपैकी ०-०५-१० हे.आर., इतके बागायत क्षेत्र व त्या मिळकती मधील ग्रुप ग्रामपंचायत चौल कार्यालयीन दप्तरी असलेले १४०० चौ.फुटचे घर मिळकत क्र.३०३४.

वरील मिळकती संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, भाडेपट्टा, लिज, फरोक्त, साठेकरार, कोर्टात दावा, मृत्यूपत्र, अखत्यारपत्र, भागीदारी, वहीवाट, पोटगी करार अथवा अन्य हक्क असल्यास अशा व्यक्तींनी त्यांच्या लेखी स्वरुपाच्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासहीत खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत कळवाव्यात.

येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व विनाजोखीमची आहे. असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

ठिकाण: अलिबाग
दिनांक: २३/०२/२०२६

सही/-
**ॲड. जयेश मोतीराम पाटील**
रा.मु.आगरसुरे, पो.चोंढी,
ता.अलिबाग, जि.रायगड
मो.नं.९६२३९२७४४३

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने नविन डिझाइन्स



**मोत्याचे दागिने– तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने– मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड– कुंदन– पोलकी– सेट– मॅचिंग बांगड्या– कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.**

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**



# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

ज्ञानगंगा घरोघरी

ज्ञानगंगोत्री, गोवर्धन, गंगापूर धरणाजवळ, नाशिक- ४२२२२२
☎ : (०२५३) २२३१७१४ | २२३१७१५ | २२३०१०६ | २२३०४५९

ACCREDITED WITH GRADE A NAAC
नॅक मानांकित 'अ' श्रेणी

शैक्षणिक सत्र जानेवारी २०२६
**ऑनलाईन प्रवेश सुरू**
अंतिम तारीख २८ फेब्रुवारी २०२६

**तुमच्या उज्ज्वल भवितव्याचे प्रवेशद्वार**




सर्वोत्कृष्ट संस्थेसाठी कॉमनवेल्थ ऑफ लर्निंगच्या आंतरराष्ट्रीय गुणवत्ता पुरस्काराने सन्मानित

वैशिष्ट्ये: रोजगाराभिमुख शिक्षण, वेब रेडिओ, दृक-श्राव्य माध्यम आणि मोबाईलद्वारे मार्गदर्शन

**आता रेग्युलर पदवीसोबत दूरशिक्षणाद्वारे अधिकची एक पदवी मिळवा !**

**तसेच मुक्त विद्यापीठातूनच एकाच वेळी दोन शिक्षणक्रमास प्रवेश घेण्याची संधी उपलब्ध !**

### मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा
- प्रमाणपत्र: ❖ मानवी हक्क ❖ संमंत्रक प्रशिक्षण ❖ पाली
- पदविका: ❖ वृत्तपत्रविद्या व जनसंज्ञापन ❖ गांधी विचारदर्शन
- पदवी: ❖ बी.ए. (मराठी, उर्दू माध्यम) ❖ बी.ए. जनसंज्ञापन व वृत्तपत्रविद्या ❖ ग्रंथालय व माहितीशास्त्र (B.Lib. & I.Sc.)
- पदव्युत्तर पदवी: ❖ एम.ए. मराठी ❖ एम.ए. हिंदी ❖ एम.ए. इंग्रजी ❖ एम.ए. उर्दू ❖ एम.ए. इतिहास ❖ एम.ए. अर्थशास्त्र ❖ एम.ए. राज्यशास्त्र (मराठी/इंग्रजी) ❖ एम.ए. समाजशास्त्र (मराठी/इंग्रजी) ❖ एम.ए. लोकप्रशासन ❖ एम.ए. जनसंज्ञापन व पत्रकारिता (MA MCJ) (इंग्रजी माध्यम) ❖ ग्रंथालय व माहितीशास्त्र निष्णात (M.Lib. & I.Sc.)

### संगणकशास्त्र विद्याशाखा
- प्रमाणपत्र: ❖ Advanced Excel ❖ Advanced Computerised Financial Accounting ❖ Data Analytics ❖ Extended Reality and Artificial Intelligence
- पदविका: ❖ Computerised Financial Accounting ❖ Cyber Crime Investigation
- पदवी: ❖ Bachelor of Computer Application (BCA)
- पदव्युत्तर पदवी: ❖ Master of Computer Applications (MCA)

### आरोग्य विज्ञान विद्याशाखा
- प्रमाणपत्र: ❖ रुग्णसहायक ❖ Nutrition & Dietetics
- पदविका: ❖ योगशिक्षक ❖ Diploma in Nutrition & Dietetics ❖ Advance Diploma in Nutrition & Dietetics
- पदव्युत्तर पदवी: ❖ M.A. in Yoga

### वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा
- प्रमाणपत्र: ❖ Industry Connect Internship ❖ Building Employability Skills ❖ Innovation & Entrepreneurship
- पदविका: ❖ Diploma in Event Management ❖ सहकार व्यवस्थापन ❖ सहकार व्यवस्थापन (बँकिंग) ❖ एव्हीएशन, हॉस्पिटॅलिटी आणि ट्रॅव्हल व टुरिझम मॅनेजमेंट ❖ ट्रान्सपोर्ट मॅनेजमेंट
- पदवी: ❖ बी.कॉम.(मराठी/इंग्रजी माध्यम) ❖ B.A. in Facility & Services Management ❖ B.B.A. in Event Management ❖ B.B.A. in Accounting & Financial Management
- पदव्युत्तर पदवी: ❖ एम.कॉम. ❖ एम.बी.ए.(ह्युमन रिसोर्स / फायनान्स/मार्केटिंग)

### शिक्षणशास्त्र विद्याशाखा
- प्रमाणपत्र: ❖ बालसंगोपन आणि रंजन शिक्षण ❖ स्वयं–सहायता समूह प्रमाणपत्र शिक्षणक्रम : मूलभूत ❖ मूल्य शिक्षणाची मूलतत्त्वे : मूलभूत ❖ घरकामगार कौशल्य विकास ❖ परसबाग

### ग्रामीण विकास व उद्योजकता विद्याशाखा
- प्रमाणपत्र: ❖ शेतकरी उत्पादक कंपनी व्यवस्थापन ❖ ग्राम रोजगार सेवक कौशल्य ❖ स्पर्धा परीक्षा पूर्वतयारी प्रमाणपत्र शिक्षणक्रम

### व्यावसायिक शिक्षण व कौशल्य विकास विद्याशाखा
- प्रमाणपत्र: ❖ Certificate in Repair & Maintenance of Heavy Earth Moving Machines

### ललित कला केंद्र
- पदविका: ❖ Diploma in Dramatics

### निरंतर शिक्षण विद्याशाखा
- प्रमाणपत्र: ❖ German ❖ French ❖ English ❖ Beauty Parlour ❖ Drone System Introductory Programme ❖ Drone System Intermediate Programme ❖ Adv. Drone System Programme ❖ DGCA certified Drone Pilot
- पदविका: ❖ Interior Design & Decoration ❖ Electrician & Domestic Appliances Maintenance ❖ Fitter ❖ Civil Supervisor ❖ Computer Hardware Maintenance & Networking ❖ Fire & Safety ❖ Interior Design ❖ Adv. Dip. in Interior Design ❖ Automobile Techniques ❖ Hospitality Studies ❖ Adv. Dip. in Hospitality Studies ❖ Dip. in Shipping and Logistics ❖ Adv. Dip. in Shipping & Logistics ❖ Dip. in Local Self Government ❖ Diploma in Local Government Financial Management ❖ Diploma in Advance Analytical Instruments ❖ Diploma in Regulatory Affairs and Quality Assurance ❖ Diploma in Mechanical Techniques (V12) ❖ Diploma in Office Assistant (Judicial) Clerical Cadre (D130)
- पदवी: ❖ B.Sc. (Media Graphics and Animation) ❖ B.Sc. (Hospitality Studies) ❖ B.Sc. (Hons) Fire & Industrial Safety

### स्कूल ऑफ डिजिटल एज्युकेशन
- प्रमाणपत्र: ❖ मूल्य शिक्षणाची मुलतत्त्वे : मूलभूत (मराठी/इंग्रजी माध्यम) ऑनलाईन ❖ IBM Certificate Programs in Emerging Technologies

### महाज्ञानदीप
- प्रमाणपत्र: ❖ भारतीय ज्ञान प्रणाली : सामान्य (IKS Generic) ऑनलाईन

"सायबर सुरक्षा (Cyber Security) अभ्यासक्रम हा एक ऑडीट कोर्स असून पदवी व पदव्युत्तर स्तरावरील शिक्षणक्रमांना अनिवार्य करण्यात आला आहे. त्यानुसार मूळ शिक्षणक्रम पूर्ण करण्यापूर्वी सायबर सुरक्षा (Cyber Security) अभ्यासक्रम उत्तीर्ण करणे आवश्यक आहे."

**ऑनलाईन प्रवेशासाठी खालील क्यूआर कोड स्कॅन करा किंवा खालील संकेत स्थळाला भेट द्या.**

**यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाची विभागीय केंद्र**

| अमरावती | छत्रपती संभाजीनगर (०२४०) | मुंबई (०२२) | नागपूर |
|---|---|---|---|
| ९५९५१९७०९९ | २३१०६६/७७/८८, ८३७९९९०२३६ | २३८७४१८०/८७, ९९६९०१३८८६ | ९४२२२४७२९५ |
| **नाशिक (०२५३)** | **पुणे (०२०)** | **कोल्हापूर (०२३१)** | **नांदेड** |
| २३१७०६३, ९४२२२४७२९७ | २४४९११०७, ८३२९२५६७३६ | २६०७०२२/२३, ९४२३९७९७५०, ९४२३९७९६४५ | ९४२२२५८५५७ |

● www.ycmou.ac.in ● http://ycmou.digitaluniversity.ac डॉ. गोविंद कतलाकुटे, कुलसचिव (प्र.)

HELPLINE ☎ (०२५३) २२३०५८० | २२३१७१५ | २२३०१०६ | २२३१७१४ ✉ nondani@ycmou.digitaluniversity.ac
📱 9307579874 | 9307567182 | 9272046725

K-P25-125

विनायक दळवी

# भारतीय क्रिकेट संघ 'बॅकफूटवर'

क्रिकेट या खेळाचे संस्कृती काय असते याची प्रचिती मुंबईत सामने पाहताना येते,चेन्नईला क्रिकेटच्या लढती पाहताना येते, किंवा बंगळुरू किंवा कोलकाता येथे क्रिकेटचा संघर्ष आणि झिंग अनुभवताना प्रेक्षक दिसतात. याउलट अलीकडच्या काळात अहमदाबादच्या क्रिकेट स्टेडियम वर चित्र पाहायला मिळतं. २०२३ च्या ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या अंतिम सामन्याच्या वेळी भारतीय क्रिकेट संघ संथ गतीने धावा काढत असताना, स्टेडियम वरील ८० हजाराहून अधिक प्रेक्षक शांत चिडीचूप होते. ती कमालीची भयाण शांतता अस्वस्थ करणारी होती. त्या भयाण शांततेत भारताचा संभाव्य पराभव लपलेला होता. त्याच घटनेची पुनरावृत्ती काल रविवारी, अहमदाबादच्या क्रिकेट स्टेडियमवर झाली. दक्षिण आफ्रिके विरुद्ध सामना सुरू असताना, भारताला आव्हान पेलविता येणार नाही असे वाटायला लागल्यानंतरच, स्टेडियम मध्ये चित्र भयाण होतं. भयाण यासाठी की, एखादा गल्लीतला क्रिकेटचा सामना देखील सुरू असला की, चौकार षटकार किंवा विकेट पडल्यानंतर प्रचंड आवाजाचा गलका होतो. प्रेक्षका ंचे आवाज ऐकू येतात. अहमदाबादला मात्र रविवारी उलटी परिस्थिती होती. 'डीजे' ला कळत नव्हतं नेमकं काय करायचं. तो प्रेक्षकांना प्रोत्साहित करण्याचा आटोकाट प्रयत्न करत होता. प्रेक्षक मात्र मौन बाळगून, गप्प बसले होते.

कोणताही खेळ खिलाडूवृत्तीने पाहायचा असतो. पराभव स्वीकारायचा असतो आणि पचवायचा देखील असतो. दुर्दैवानं ही क्रीडासंस्कृती आमदाबाद मध्ये अजून रुजलेली दिसत नाही. त्याचाच प्रत्येक वारंवार भारतीय संघ जेव्हा पराभूत होतो असं वाटतं त्या प्रत्येक वेळी येतो. पराभवाचे शल्य प्रत्येक भारतीयाला आहे. मात्र पराभव स्वीकारण्यासाठी देखील खिलाडूवृत्ती लागते. भारतीय प्रेक्षकांनी देखील, ती जोपासायला शिकलं पाहिजे. विशेषतः आमदाबाद सारख्या ठिकाणी, जिथे जबरदस्तीने भारताच सगळं आंतरराष्ट्रीय क्रिकेट लादलं जातंय तिथल्या प्रेक्षकाने पराभव स्वीकारायला शिकलच पाहिजे.

सुपरहिट स्पर्धा सुरू झाली. या सुपरहिटमध्ये एखादी लढत गमावणे म्हणजे फक्त शून्य गुण मिळवणे एवढ्या पुरतीच मर्यादित गोष्ट नाही. तर शून्य ऐवजी ते मायनस दोन गुण आहेत. ही गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे. कारण दुसऱ्या गटातील देखील संघ पुढे येऊ शकतात विशेषतः न्यूझीलंड आणि पाकिस्तान यांच्यातील सामना पावसामुळे न झाल्यामुळे दोन्ही संघांना एक एक गुण मिळाला आहे. यापैकी म्हणजे पावसामुळे मिळालेला हा एक गुण नेहमी त्यांना सतत पुढे ठेवणार आहे. हीच गोष्ट पाकिस्तानची देखील. त्यांनी देखील सामना रद्द झाल्यामुळे मिळालेला एक गुण या सुपरएट मध्ये निर्णय ठरू शकतो. भारताच्या गटात भारताचे अजून दोन सामने शिल्लक आहेत त्यापैकी दुसरा सामना चेन्नईमध्ये झिंबाब्वे विरुद्ध होणार आहे. झिंबाब्वेता संघ यावेळी लाईटली घेण्यासारखा नाही. कारण या संघाने गेल्या वर्षा दीड वर्षात अतिशय चांगली काम गिरी सातत्यपूर्णरित्या केलेली आहे. या संघाला कसं जिंकायचं हे हळूहळू ज्ञात झालेला आहे. त्यांच्याकडे सिकंदर रझा हा धूर्त कप्तान देखील आहे. त्यांच्याकडे फिरकी गोलंदाज आहेत आणि वेगवान गोलंदाज देखील आहेत. त्यामुळे भारताला या संघाला देखील कमी लेखून चालणार नाही. दुसरीकडे भारताचा तिसरा आणि निर्णायक सामना वेस्टइंडीज विरुद्ध कोलकाता येथे होणार आहे वेस्ट इंडिज संघाला कोलकता येथे नेहमीच प्रेक्षकांचं पाठबळ मिळत राहिल आहे. या संघाची कोलकत्ता येथील यशाची सरासरी उत्तम आहे. त्यामुळे भारताला तो सामना खेळताना आर या पार अशा अवस्थेत उतरावे लागणार आहे. त्याचे दडपण निश्चितच भारतीय संघावर येणार आहे.

असं म्हणतात, ''वेल बिगिनिंग इस हाफ द बॅटल''.

आपली सुरुवातच पराभवाने झाली आहे. म्हणून आपण सुपरहिट मध्ये पिछाडीवर आहोत. दोन्ही गटातील म्हणजे एकूण आठ संघांची विजयाची गुणसंख्या निर्णायक ठरणार आहे. आठ पैकी पहिल्या चार क्रमांकावरचे संघ उपांत्य फेरीत दाखल होतील. सध्याचा भारतीय संघ हे दडपण घेण्यायोग्य क्षमतेचा आहे का? याची प्रचिती वारंवार अलीकडे आलेली आहे. आपण या विश्वचषकाचा अमेरिका विरुद्ध सामना देखील अडखळतच जिंकलो होतो. कप्तान सूर्यकुमारची धडाकेबाज खेळी भारताला त्यावेळी विजयाची धावसंख्या गाठून देणारी ठरली होती. मात्र अखेरच्या सामन्यात हॉलंड संघाने देखील भारताला सहज यश मिळू दिले नव्हते. भारतीय संघ त्या सामन्यात अतिशय 'कॅज्युअल' खेळला असंच म्हणावं लागेल. खरं तर अहमदाबादला आफ्रिकेविरुद्ध सामन्याची पूर्वतयारी म्हणून भारताने आपली सारी शस्त्र अधिक धारदार करणे गरजेचे होते. त्याऐवजी आपण तो सामना जेमतेम जिंकण्यात धन्यता मानली. खरंतर आफ्रिके विरुद्ध लढतीचा तो एक पूर्वतयारीचा सामना म्हणून भारताला वापरता आला असता. भारताने ती संधी गमावली आणि आफ्रिकेविरुद्ध सामन्यात आपण बेसावध राहिलो.

भारताचे अनेक कच्चे दुवे आहेत. जे दूर करण्याइतपत भारताचे खेळाडू आणि प्रशिक्षक सक्षम आहेत का? या प्रश्नाचे उत्तर देखील नजीकच्या काळात मिळणार आहे. कोहली किंवा रोहित शर्मा यांच्यासारख्या अनुभवी खेळाडूंना संघात स्थान न देणे कदाचित भारताला यावेळी महागात ठरू शकेल असं वाटतंय.कारण त्यांच्याकडे तरुणाई नसली तरी कोहलीसारखा खेळाडू अजूनही संघातील तरुण खेळाडूनपेक्षा अधिक फिट वाटतो. त्यांच्यातील परिपक्वता, ड्रेसिंग रूममधील वातावरण बदलण्यासाठी निश्चितच उपयोगी पडणारी आहे. त्यांचे उपस्थिती नवोदित खेळाडूंना चांगली कामगिरी करण्यासाठी प्रोत्साहित करणारी आहे. भारताला ज्येष्ठ खेळाडूंच्या धीरोदात्त सल्ल्याची इथे कमतरता जाणवते, असं वाटतं.

# टीम इंडिया संकटात

## उपांत्य फेरीचा मार्गही कठीण



। मुंबई । वृत्तसंस्था ।

टी-२० वर्ल्ड कपमध्ये सर्वात मजबूत संघ मानला जात असलेला भारत अचानक अडचणीत सापडला आहे. कर्णधार सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखालील टीम इंडियाला सुपर-८ फेरीत दक्षिण आफ्रिकेकडून तब्बल ७६ धावांनी पराभव स्वीकारावा लागला. टी-२० वर्ल्ड कपच्या इतिहासात एवढ्या मोठ्या धावांच्या फरकाने भारताचा हा सर्वात मोठा पराभव झाला आहे. या धक्कादायक निकालाने भारताची विजयी मालिका खंडित झालीच, पण उपांत्य फेरीचा मार्गही कठीण झाला आहे.

अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियम येथे झालेल्या या सामन्यात भारताची फलंदाजी आणि गोलंदाजी दोन्ही निराशाजनक झाली. गोलंदाजांनी सुरुवातीला चांगली झुंज देत दक्षिण आफ्रिकेला १८७ धावांवर रोखले होते. मात्र या स्पर्धेत सुरुवातीपासूनच लय सापडत नसलेली भारतीय फलंदाजी पुन्हा एकदा कोसळली आणि संघ केवळ १११ धावांवर गारद झाला. परिणामी, दक्षिण आफ्रिकेने दणदणीत विजय मिळवला.

या पराभवानंतर भारत आता 'करो या मरो' स्थितीत पोहोचला आहे. सुपर-८ फेरीत प्रत्येक संघाला तीन सामने खेळायचे आहेत. भारताने पहिलाच सामना गमावला असल्याने आता पुढील दोन्ही सामने जिंकणे अनिवार्य झाले आहे. भारताचा पुढील सामना २६ फेब्रुवारीला झिम्बाब्वेविरुद्ध, तर १ मार्चला वेस्ट इंडिजविरुद्ध होणार आहे. हे दोन्ही सामने जिंकले, तर भारताच्या खात्यात चार गुण जमा होतील. मात्र केवळ दोन विजय मिळवणे पुरेसे ठरणार नाही. उपांत्य फेरीत पोहोचण्यासाठी भारताला इतर संघांच्या निकालांवरही अवलंबून राहावे लागेल. दक्षिण आफ्रिका, वेस्ट इंडिज आणि झिम्बाब्वे यापैकी किमान दोन संघांनी आपले दोन सामने गमावणे भारतासाठी आवश्यक आहे. अशा परिस्थितीत भारत आणि आणखी एक संघ चार किंवा सहा गुणांसह पुढे जाऊ शकतील. जर या गटात तीन संघ चार-चार गुणांवर समान स्थितीत राहिले, तर निर्णय नेट रनरेटवर होईल. आणि इथेच भारताची अडचण आहे. ७६ धावांच्या मोठ्या पराभवानंतर भारताचा नेट रनरेट -३.८०० इतका घसरला आहे, तर दक्षिण आफ्रिकेचा +३.८०० आहे. इतक्या मोठ्या फरकामुळे भारतासाठी पुढील सामन्यांत मोठ्या अंतराने विजय मिळवणे आवश्यक झाले आहे. गुण समान असतील तर प्रथम विजयांची संख्या पाहिली जाते. तीही समान असल्यास नेट रनरेट निर्णायक ठरतो. त्यामुळे भारताने उर्वरित दोन्ही सामन्यांत केवळ विजयच नाही, तर शक्य तितक्या मोठ्या फरकाने विजय मिळवणे आवश्यक आहे. अन्यथा सुपर-८ फेरीतूनच बाहेर पडण्याचा धोका आहे.

# टी-२० वर्ल्डकपमध्ये भारताचा पराभव

## दक्षिण आफ्रिकेने ७६ धावांनी हरवले

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था।

टी-२० विश्वचषकाच्या तिसऱ्या सुपर ८ सामन्यात गतविजेत्या भारताला दक्षिण आफ्रिकेकडून ७६ धावांनी पराभव पत्करावा लागला. संघाने २० षटकांत ७ गडी बाद १८७ धावा केल्या. प्रत्युत्तरात भारतीय संघ १८.५ षटकांत १११ धावांवर सर्वबाद झाला. मार्को यान्सनने ४ विकेट, केशव महाराजने ३ विकेट, कॉर्बिन बॉशने २ विकेट आणि एडेन मार्करामने १ विकेट घेतली. शिवम दुबेने सर्वाधिक ४२ धावा केल्या.यापूर्वी दक्षिण आफ्रिकेकडून डेव्हिड मिलरने ३५ चेंडूत ६३ धावा केल्या, तर डेवाल्ड ब्रेव्हिसने ४५ धावा केल्या. ट्रिस्टन स्टब्सने २४ चेंडूत नाबाद ४४ धावा केल्या. जसप्रीत बुमराहने ३ आणि अर्शदीप सिंगने २ विकेट घेतल्या.

दक्षिण आफ्रिकेची सुरुवात चांगली झाली नाही. संघाने २० धावांत त्यांचे पहिले तीन बळी गमावले. क्विंटन डी कॉक, एडेन मार्कराम आणि रायन रिकेल्टन बाद झाले. त्यानंतर, डेव्हिड मिलरने डेवाल्ड ब्रेविससह फक्त ५० चेंडूत ९७ धावा जोडल्या, ज्यामुळे धावगती प्रति षटक सुमारे १० धावांवर पोहोचली. या भागीदारीमुळे दक्षिण आफ्रिकेने भारतासमोर १८८ धावांचे लक्ष्य ठेवले. हार्दिक पंड्याने डावाच्या शेवटच्या षटकात २० धावा दिल्या. १८८ धावांच्या प्रत्युत्तरात पॉवरप्लेमध्ये भारताने तीन बळी गमावले. तिलक वर्मा देखील फक्त १ धावा काढून बाद झाला. अर्धशतकीय भागीदारी झाली नाही. ७ ते १५ च्या मधल्या षटकांमध्ये भारताने फक्त ५७ धावा केल्या आणि पाच विकेट गमावल्या. १५ व्या षटकात केशव महाराजने हार्दिक, रिंकू आणि अर्शदीप यांना त्याच षटकात बाद करून भारताचा पराभव निश्चित केला.

# जितेश अन यशला राज्यस्तरीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत सुवर्णपदक



। खरोशी । वार्ताहर ।

वडाळा मुंबई येथे झालेल्या राज्यस्तरीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत सुहित जीवन ट्रस्ट, पेण संस्थेतील विद्यार्थी जितेश साजेकर याने ५३ किलो वजन गटामध्ये सुवर्णपदक तसेच यश पांगत याने ७४ किलो वजन गटामध्ये सुवर्णपदक मिळवून आपल्या पालक, शिक्षक व संस्थेचे नाव उज्ज्वल केले आहे.

या स्पर्धेत महाराष्ट्रातील अनेक दिव्यांग प्रतिस्पर्धी विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. सुहितमधील विद्यार्थ्यांनी अथक मेहनत व सरावाचे उत्कृष्ट प्रदर्शन करत या स्पर्धेत आपल्या क्रीडा कर्तृत्वाने सुवर्णपदक मिळवून संस्थेचे व त्यांचे प्रशिक्षक राजेश अनगत व अमोल काईनकर यांचे नाव उंचावले आहे.

# मोहोपाडा येथील दिव्यांग स्पर्धेत रायगड दिव्यांग संघ विजेता



। रसायनी । प्रतिनिधी ।

कुलाबा दिव्यांग सोशल फाउंडेशन इंडिया व कुलाबा दिव्यांग क्रिकेट असोसिएशन आयोजित मैत्री चषक २०२६ मुंबई रायगड, नवी मुंबई, ठाणे या चार संघामध्ये मोहोपाडा एनआयएसएम मैदानावर खेळविण्यात आल्या.

या स्पर्धेचे उद्घाटन माजी सरपंच संदीप मुंढे यांच्याहस्ते करण्यात आले.यावेळी रोटरी क्लब ऑफ पाताळगंगा माजी अध्यक्ष गणेश वर्तक, अमित शहा, सुनील भोसले, नागेश कदम उपस्थित होते. महाराष्ट्र राज्य अपंग कर्मचारी संघटनेचे राज्याध्यक्ष तथा सदस्य दिव्यांग कल्याण मंत्रालय साईनाथ पवार व जिल्हाध्यक्ष शैलेश सोनकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या स्पर्धेत रायगड संघ आणि नवी मुंबई संघात अंतिम सामना झाला. यात रायगड संघाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करत नवी मुंबई संघाने १० षटकात ७ विकेट ५६ धावा केल्यातर रायगड संघाने ९ विकेटने विजय प्राप्त केला.

या स्पर्धेत रायगड संघाचे प्रसाद मॅन ऑफ द सिरीजचा मान ऋषिकेश पाटील, उत्कृष्ट फलंदाज म्हणून कल्पेश ठाकूर उत्कृष्ट गोलंदाज व नवी मुंबई संघाचे महेश वसावे, उत्कृष्ट क्षेत्ररक्षकचा मानकरी ठरले.या स्पर्धेचे आयोजन कुलाबा दिव्यांग फाउंडेशन इंडियाचे अध्यक्ष शशांक हिरवे कार्याध्यक्ष तथा सहकार्य अपंग कल्याणकारी संस्थेचे सचिव शिवाजी पाटील, सचिव सुनील पाटील, खजिनदार अरुण घोडके, स्वामीज्ञ फाउंडेशनचे अध्यक्ष अंजली घोडके, कल्पेश तवले, मंगेश पारटे, नागनाथ घोडके, रुपेश पवार, चंद्रकांत पवार, रवी भोईर यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी योगेश खाने, प्रफुल विचारे, नंदकुमार मोरे चौक, तानाजी खंडागळे, उद्योजक अभिजित देशमूख, जगदीश हातमोडे, निखिल मालुसरे राज नंदबार,शिवाजी पाटील यांनी आभार व्यक्त केले.

## रायगड जिल्हा अजिंक्यपद कबड्डी स्पर्धा

# ओमकार वेश्वी अजिंक्य

। अलिबाग । प्रतिनिधी ।

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ, पनवेल आणि रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने उलवे नोड येथील रामशेठ ठाकूर मैदानावर प्रौढ महिला व पुरुष गट जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत पुरुष गटात ओमकार वेश्वी संघाने, तर महिला गटात कर्नाळा स्पोर्ट्स अकॅडमी संघाने विजेतेपद पटकावले.

२० ते २२ फेब्रुवारीदरम्यान तीन दिवस रंगलेल्या या स्पर्धेत जिल्ह्यातील १२८ पुरुष व ३२ महिला संघांनी सहभाग घेतला. पंचांची निष्पक्ष कामगिरी आणि प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद यामुळे स्पर्धेला भव्य यश लाभले.

पुरुषांच्या अंतिम सामन्यात ओमकार वेश्वी संघाने शिवाई बांधण संघाचा पराभव करून अजिंक्यपद मिळवले.



शिवाई बांधण संघ उपविजेता ठरला. जय बजरंग रोहा संघाने तृतीय, तर जयभवानी वाशी-पेण संघाने चतुर्थ क्रमांक मिळविला.

महिला गटात कर्नाळा स्पोर्ट्स अकॅडमीने विजेतेपद पटकावले. पनवेल स्पोर्ट्स क्लब उपविजेता ठरला, तर ओमकार वेश्वी व दत्तात्रेय क्रीडा पनवेल यांनी अनुक्रमे तृतीय व चतुर्थ क्रमांक मिळवला.

यावेळी कबड्डी हा आपल्या मातीतला अभिमानाचा खेळ असल्याचे अधोरेखित करण्यात आले. माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे कबड्डीशी असलेले अतूट नाते स्मरून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यांच्या प्रेरणेने कबड्डीचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प उपस्थितांनी व्यक्त केला.

## आयटीएफ टेनिस स्पर्धा

# पुण्याच्या वैष्णवी आडकरला उपविजेतेपद

**पुणे :** बेंगळुरू येथे झालेल्या आयटीएफ टेनिस स्पर्धेत महिला एकेरीच्या अंतिम फेरीत पुण्याच्या वैष्णवी आडकरला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. या स्पर्धेत वाइल्ड कार्डद्वारे प्रवेश मिळविणाऱ्या पुण्याच्या वैष्णवी आडकरला अंतिम फेरीत १२४ व्या क्रमांकावर असलेल्या बेल्जियमच्या हॅने वांडेविंकेलने जोरदार खेळ करीत पराभूत केले. वैष्णवी आडकर जागतिक क्रमवारीत ६९० व्या क्रमांकावर आहे. उपविजेत्या वैष्णवी आडकरला ८,१४७ अमेरिकन डॉलरचे पारितोषिक मिळाले.

# सूर्यवंशीचं वैभव आणखी वाढलं

## बिहार सरकारकडून ५० लाखांचं बक्षीस



। बिहार । वृत्तसंस्था ।

वैभव सूर्यवंशीचं नाव आजकाल प्रत्येक भारतीय क्रिकेट चाहत्याच्या ओठांवर आहे. १९ वर्षांखालील विश्वचषकात त्याच्या उत्कृष्ट कामगिरीने केवळ भारतीय संघाला विजेतेपद मिळवून दिले नाही तर वैभवने अनेक वैयक्तिक विक्रमही प्रस्थापित केले. हा काळ वैभवसाठी कामगिरी आणि आर्थिक लाभाच्या बाबतीत उल्लेखनीय ठरत आहे. टीम इंडियाच्या विजयानंतर बीसीसीआयच्या बक्षिसांव्यतिरिक्त त्याला आयपीएलमध्ये राजस्थान रॉयल्सने १.१ कोटी रुपयांसह रिटेन केलं होतं, आता त्याला ५० लाखांची लॉटरीच लागली आहे.

ऐतिहासिक कामगिरीबद्दल बिहार सरकारने वैभव सूर्यवंशीचाही सन्मान केला. अलिकडेच वैभवने बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार, उपमुख्यमंत्री सम्राट चौधरी आणि क्रीडा मंत्री श्रेयसी सिंह यांची मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानी भेट घेतली. यावेळी मुख्यमंत्र्यांनी वैभवला त्याच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल ५० लाख रुपयांचे बक्षीस दिले. यापूर्वी बीसीसीआयने संपूर्ण भारतीय अंडर-१९ संघासाठी ७.५० कोटी रुपयांचे रोख बक्षीस जाहीर केले होते.

वैभव सूर्यवंशीची एकूण संपत्ती आता ५ कोटींच्या जवळपास पोहोचली आहे. गेल्या वर्षी आयपीएल लिलावात १.१ कोटी रुपयांना खरेदी केल्यानंतर, त्याने रणजी ट्रॉफी आणि कूचबिहार ट्रॉफी सारख्या देशांतर्गत स्पर्धांमध्ये सातत्याने चांगली कामगिरी राखली आहे.

# सुंदर-मिलर यांच्यात वाद

**नवी दिल्ली :** दक्षिण आफ्रिकेने उत्कृष्ट कामगिरीच्या बळावर २०२६ च्या टी-२० विश्वचषकात भारताला पराभवाचा धक्का दिला. टी-२० विश्वचषकातील हा भारताचा पहिला पराभव आहे. या सामन्यात भारतीय फलंदाज अपयशी ठरले आणि ज्यामुळे टीम इंडियाला ७६ धावांनी दारुण पराभव पत्करावा लागला. मिलर द. आफ्रिकेच्या विजयाचा हिरो ठरला. पण या सामन्यात सुंदर व मिलर यांच्यात वाद पाहायला मिळाला.

# महाराष्ट्र राज्य कबड्डी संघाचा सराव आवासमध्ये



। खारेपाट । प्रतिनिधी ।

महाराष्ट्र कबड्डी संघाचा सराव आवास येथे झाला.महाराष्ट्र राज्य कबड्डी संघाचे कोच रमेश भेंडीगिरी यांनी सर्व खेळाडूंना मार्गदर्शन केले व रणजीत राणे व अभिजीत राणे यांनी चांगली व्यवस्था केल्याबद्दल त्यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले तसेच कबड्डी संघाच्या सरावाकरिता मॅट टाकण्याकरिता जागेची व्यवस्था जोगळेकर कॉटेजचे मालक जोगळेकर यांनी करून दिल्याबद्दल गणेश राणे यांनी त्यांचे धन्यवाद मानले.

महाराष्ट्राचा कबड्डी संघ सरावाचा सांगता समारोप प्रसंगी आवास येथील प्रसिद्ध देवस्थान नागेश्वर मंदिर, जोगेश्वरी माता मंदिर, सोमेश्वर मंदिर येथे जाऊन दर्शन घेतले.

अस्लम इनामदार ठाणे ग्रामीण, अजित चौहान पुणे ग्रामीण, अदित्य शिंदे अहिल्यानगर, शिवम पटारे अहिल्यानगर, सौरभ राऊत अहिल्यानगर, सौरभ फगारे कोल्हापूर, दादासो पुजारी कोल्हापूर, सुरेश जाधव पुणे ग्रामीण, साईप्रसाद पाटील कोल्हापूर, अल्केश चव्हाण छत्रपती संभाजीनगर, संकेत सावंत मुंबई शहर पूर्व, अनुज गावड पुणे ग्रामीण, जयेश महाजन नंदुरबार, अदित्य पोवार कोल्हापूर, रमेश भेंडीगिरी (प्रशिक्षक) अक्षय जाधव (व्यवस्थापक) यांनी यावेळी सराव केला.

# माणगाव उतेखोलवाडी शाळेत विविध स्पर्धा उत्साहात



। माणगाव । प्रतिनिधी ।

माणगाव नगरपंचायत हद्दीतील पीएमश्री शाळा उतेखोलवाडी शाळेत श्री गुरु तेग बहादूर यांचे ३५० व्या समागम कार्यक्रम निमित्ताने वक्तृत्व स्पर्धा, प्रश्न मंजुषा, हिंद दि चादर गीत गायन मुलांचे घेण्यात आले.

यावेळी प्रश्न मंजुषा स्पर्धा आदर्श शिक्षिका विनया जाधव यानी घेतली. गीत गायनमध्ये सर्व विद्यार्थी व शिक्षक सहभागी झाले. सदर कार्यक्रमास मुख्याध्यापक शोभा तालीमकर, शिक्षिका डोळस, खुशी बुटे, आदर्श शिक्षिका विनया जाधव उपस्थित होत्या.

## विल जॅक्सला ३ विकेट, साल्टची फिफ्टी | टी-२० वर्ल्डकप सुपर-८ सामन्यात इंग्लंड ५१ धावांनी विजयी

# श्रीलंका संघ ९५ धावांत ऑलआऊट

। कँडी । वृत्तसंस्था ।

टी-२० विश्वचषकाच्या दुसऱ्या सुपर ८ सामन्यात इंग्लंडने श्रीलंकेचा ५१ धावांनी पराभव केला. कँडी येथील पल्लेकेले आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर खेळल्या जाणाऱ्या या सामन्यात श्रीलंकेने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. रविवारी, प्रथम फलंदाजी करणाऱ्या इंग्लंडला २० षटकांत ९ गडी गमावून केवळ १४६ धावा करता आल्या.



सलामीवीर फिल साल्टने ४० चेंडूंत ६२ धावांची जलद खेळी केली, ज्यामध्ये ४ चौकार आणि २ षटकारांचा समावेश होता. विल जॅक्सने २१ धावांचे योगदान दिले, परंतु इतर फलंदाज २० धावांचा टप्पा ओलांडू शकले नाहीत.

प्रत्युत्तरादाखल, श्रीलंकेची सुरुवात खराब झाली आणि त्यांचा संघ १६.४ षटकांत ९५ धावांवर बाद झाला. कर्णधार दासुन शनाकाने सर्वाधिक ३० धावा केल्या. इंग्लंडकडून विल जॅक्सने तीन विकेट्स घेतल्या, त्याने पवन रत्नायके (०) आणि कुसल मेंडिस (४) यांना लागोपाठ चेंडूत बाद केले. पथुम निसंका (९) ला जोफ्रा आर्चरच्या चेंडूवर जेमी ओव्हरटनने झेलबाद केले.

पल्लेकेले येथील खचाखच भरलेल्या स्टेडियमसमोर श्रीलंकेचा डाव संपला. इंग्लंडने या फॉरमॅटमध्ये श्रीलंकेवर सलग १२ वा विजय मिळवला. इंग्लंडची फलंदाजी सामान्य होती, परंतु गोलंदाजांनी सामना एकतर्फी केला.

रशीदने १६.४ षटकात दिलशान मदुशंकाला बाद करून सामना संपवला. गुगलीने मदुशंकाला पूर्णपणे फसवले आणि चेंडू त्याच्या बॅट आणि पॅडमधून गेला आणि स्टम्पवर लागला. तो दोन चेंडूत शून्यावर बाद झाला.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, आर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)